# माणूस

साप्ताहिक

१५ ऑक्टोबर १९६६


चाळीस पैसे



कृण्वन्तो विश्वमार्यम्

'पुरुषार्थ' साधक

पं. सातवळेकर


किंमतीने एवढा लहान !
कलेने एवढा महान—
साप्ताहिक माणूस
दिवाळी अं
चैतन्याने सळसळणारी एक वेगळीच
शब्द आणि चित्रसृष्टी . . .

# माणूस

**एक समग्र साप्ताहिक**

*वर्ष — सहावे*
*अंक : पंधरावा*
*किंमत : चाळीस पैसे*
*वार्षिक वर्गणी : वीस रुपये*

**संपादक**
श्री. ग. माजगावकर

**संपादक मंडळ**
*अ. मा. साधू*
*दिलीप माजगावकर*
*सौ. निर्मला पुरंदरे*

**व्यवस्था विभाग**
*अ. वा. गंधे*
*अ. वि. गणपत्ये*

*पत्ता — ४९९ नारायण, पुणे २.*

*दूरध्वनी — ५७३५९*

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

## अभिवादन !

एका बाजूला देशातील संतसाधुसज्जन गोरक्षेसाठी निर्वाणीचे मार्ग अनुसरीत आहेत, तर सारा उत्तर भारत विद्यार्थ्यांच्या दंगलींनी पेटल्यामुळे देशातील शिक्षणतज्ज्ञ व विचारवंत मंडळी सचिंत होत्साती उपाययोजनेचा शोध घेण्यात गर्क झाली आहेत. एकीकडे परंपरेचा अभिमान आहे, तिच्या रक्षणाचा अट्टाहास आहे, दुसरीकडे परंपरेच्या विध्वंसनातच आनंद मानण्याची उसळती प्रवृत्ती आहे. एकीकडे केवळ भक्ती आहे. दुसरीकडे केवळ शक्ती. शक्ती-भक्तीची भेट नाही. त्यामुळे योग नाही, सिद्धी नाही, यश नाही.

शक्ती आणि भक्ती जेथे एकत्र नांदतील असा एक योग पं. सातवळेकर यांनी गेली अनेक वर्षे भारतासमोर ठेवण्याचा निष्ठेने प्रयत्न चालविला आहे. या योगाचे नाव आहे 'पुरुषार्थ.' पंडितजींनी तो ज्या स्वरूपात मांडला त्याच स्वरूपात तो सर्वांना स्वीकारार्ह वाटेल असा याचा अर्थ नाही. अधिक संशोधन, नवे प्रयोग, शास्त्रीय मांडणी येथेही अवश्य आहे. ही एक परिपूर्ण मानवी जीवनाची भारतीय कल्पना आहे आणि ती मूळच्या भव्योदात्त स्वरूपात आजच्या तरुण पिढीसमोर उभी केली तर हे सळसळणारे चैतन्य आजच्यासारखे वाया जाणार नाही. पौरुषाचे काही नवेच चमत्कार येथे घडून येतील.

आणि असे घडले, तर पंडितजींनी जीवनभर केलेल्या कार्याचा अधिक चांगला गौरव दुसरा कोणता असू शकेल !

**— संपादक**

# मुक्ताफळे...

## □ आता ' हेअर ' कंट्रोल

मराठीतील नियतकालिकांत मुख्यतः दोन भाग आहेत. पुरुषांची मासिके आणि स्त्रियांची मासिके. खरे पाहता सर्वच मराठी मासिके ही सध्या मुख्यतः, सुशिक्षित स्त्री-वर्गाच्या आश्रयाखाली चालू आहेत. वर्तुळ वाचनालयातून मासिकांचे अंक बदलण्यासाठी गर्दी असते ती मुख्यतः स्त्रियांची. काही मासिके अशी आहेत की, जी ' स्त्रियांनी स्त्रियांसाठी ' चालवलेली आहेत, असा भास होतो. आतील सर्व मजकूर जवळ जवळ स्त्रियांनी लिहिलेला असतो. मराठी अंकातील हे स्त्री-साहित्य पृष्ठ-संख्येने आता इतके विपुल झाले आहे की पुष्कळ पुरुष लेखकांचा कोंडमारा होत आहे. केवळ स्त्री-दाक्षिण्यामुळे पुरुष लेखक या गोड कोंडमाऱ्याच्या विरुद्ध तूर्त बोलताना दिसत नाहीत.

खास स्त्रियांकरता असलेली मासिकांतली सदरे म्हणजे ' स्वयंपाकघरातील पदार्थ, ' ' तुमच्या बाळाचे आरोग्य ' आणि ' केशरचना. ' या तीन गोष्टींकरता स्त्री-वाचक मराठी मासिके विंचरताना दिसतात. यातील 'केशरचना ' या विभागावर मोठे गंडांतर येऊ घातले आहे. ' केशरचना ' हा शब्द उच्चारणे हे समाजहितविरोधी ठरण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. ' अष्टपुत्रा सौभाग्यवती भव ' हा आशीर्वाद जसा आता हद्दपार झाला आहे, त्याचप्रमाणे ' केशकलाप ,' ' केशरचना ' या गोष्टी लवकरच परागंदा होणार आहेत. कचपाशाच्या कल्पना विनाश पावणार आहेत. स्त्री-सौंदर्याचे वर्णन करताना कादंबरीकारांच्या तोंडात फेस येणार आहे.

याचा अर्थ केसांची वाढ थांबणार आहे असा नाही. केस वाढणारच आहेत. याउलट टकलावरदेखील केस उगवावे, यासाठी आपल्याला प्रयत्न करावे लागतील. न्हाव्याच्या धंद्याचे मात्र जबरदस्त अवमूल्यन होण्याची शक्यता आहे. याचे कारण ?

आपल्या देशात माणसे भरपूर आहेत, केस भरपूर आहेत; परंतु डॉलर कमी आहेत !

डॉलर मिळवायचा तर निर्यात वाढवावी लागेल ! केसांची निर्यातही वाढवावी लागेल ! ' स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ' हा जो भारताचा मोठा वाणी आहे, त्याच्या डायरेक्टरसाहेबांनी नुकतेच कालिकतला सांगितले की, १९७० सालापर्यंत तीन कोटी रुपयांचे केस आपल्याला निर्यात करावयाचे आहेत.

लहानपणापासून प्रत्येक मुलाला हा प्रश्न पडतो की, न्हाव्याकडे जाऊन न्हाव्याला केसही द्यायचे आणि शिवाय कापण्याबद्दल पैसेही द्यायचे ? ह्या पद्धतीत काहीतरी घोटाळा असला पाहिजे ! आता गाडे नीट वळणावर येणार आहे. जुने कपडे, रिकाम्या बाटल्या किंवा रद्दी मागणाऱ्या लोकांप्रमाणे पुनश्च घोपटी अडकवून केश-कर्तक दाराशी येऊन आता विचारणार आहेत की – "साहेब, केस देणार काय ?"

साहेब विचारणार,

"काय भाव ?"

"तुमच्याकडून काय साहेब जास्त घेणार ? नेहमीच्या रेटमध्ये घेतो. रुपया शेर देणार काय ?"

केसांचा भाव असाच वाढू लागला तर भाववाढ रोखण्यासाठी सरकारला केसांचे दर ठरवून द्यावे लागतील. काळेभोर, लांबसडक, पाच फूट उंचीचे केस–इथपासून तो पांढऱ्या एक इंची केसांपर्यंत हे भावफलक प्रत्येकाला घरात ठेवावे लागतील.

'वेणीदानासारखे पुण्य नाही,' 'देशासाठी केस द्या,' 'तो केस वाढवितो, कारण तो देशाचा शत्रू आहे !' अशी सरकारी सचित्र भित्तिपत्रके एव्हाना तयारदेखील होऊ लागली असतील. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनमधल्या अधिकाऱ्यांना एवढेदेखील सुचणार नाही की काय ?

'अंबातूर' येथे सरकारी कॉर्पोरेशनने निरनिराळ्या रंगांचे, छटांचे, आकारांचे टोप व गंगावने तयार करण्यासाठी कारखाना काढला आहे; त्याची प्रचंड वाढ आता करण्यात येणार आहे. आजच अमेरिकेच्या ९० लाखांच्या ऑर्डर्स नुसत्या पडून आहेत, कारण – केस कमी पडत आहेत !

तिरुपति, पलाणी येथील देवस्थानांच्या ठिकाणा जी वेणीदाने व जावळे होतात, तेथून फक्त आजच्या घटकेला केस पुरवठा होत असतो. लवकरच नाशिक, आळंदी इत्यादी ठिकाणी होणारा केसांचा अपव्यय थांबविण्यासाठी महाराष्ट्र सरकारलाही काहीतरी करावे लागेल. यासाठी पुढील मंत्रिमंडळात एक 'कुंतलमंत्री' नेमला जाण्याचीही शक्यता आहे. देशाला अधिक डॉलर मिळावे, निर्यात वाढावी यासाठी सर्वांनी कंबरा कसण्याची जरुरी नसली, तरी सर्वांनी ठराविक कालाने डोकी तासण्याची आवश्यकता आहे. केस साधारणत: 'बीटल' एवढे वाढले की खुणेपुरती शेंडी ठेवून बाकीचा सर्व भार उतरला गेला पाहिजे.

नेहमीप्रमाणे परधर्मीयांना सूट मिळेल. 'गोल्ड कंट्रोल' ऑर्डरप्रमाणे 'हेअर कंट्रोल ऑर्डर' सुटेल, तेव्हा सर्वांनी साथ दिली पाहिजे.

तिरुपति येथून एका महिन्यात सरकारला एक लाख दहा हजार रुपयांचे केस मिळतात. प्रत्येक गावाने मनावर घेतले तर हे उद्दिष्ट साधणे प्रत्येक गावाला शक्य आहे. हे एक असे 'केशदान' कार्य आहे की, ज्यात स्त्रियांना, पुरुषांना, मुलांना, श्रीमंतांना, गरिबांना सहभागी होता येईल.

सलून कामगारांचे मासिक वेतन रु. १७५ नुकतेच कुठे झाले होते, तोच त्यांच्यावर हे गंडांतर यावे याचे कुणालाही दुःख होईल. परंतु त्याहीपेक्षा बी. ए. बी. टी. होऊनही खेड्यांतून महिना रु. १७५/– मिळत नाहीत म्हणून ज्यांनी विद्यादानाचे काम सोडून, केशकर्तनाकडे लक्ष देण्याचे ठरवून असलेल्या नोकऱ्या सोडल्या असतील, त्यांच्यावर तर हा दुर्धर प्रसंग होय ! या सर्वांना सहानुभूती म्हणून त्यांना स्वातंत्र्य-सैनिकांप्रमाणे सरकारी नोकऱ्यांत प्राधान्य मिळेल, अशी आशा करू या. केसाने गळा कापावा, असे कुणालाच वाटत नाही !

## □ मोरया-मोदक वगैरे

सगळ्या हिंदूंचा देव कोणता ? दत्ताचे दैवत फार कडक. पुष्कळ जणांना त्याची फार भीती वाटते. मारुतीबद्दल स्त्रियांना जरा कमीच प्रेम. शंकराच्या उपासनेत शैव–वैष्णवांचा झगडा. उरले पांडुरंग, राम, कृष्ण आणि गणपती ! महाराष्ट्रात पंढरपुरीत वारकरी प्रतिवर्षी एवढा मोठा गजर करतात, की पंढरपुराबाहेर पांडुरंगाचे आस्तित्वच मनाला पटत नाही. तेव्हा पांडुरंग पंढरपुरातच अडकून पडलेला. राम, कृष्ण आणि गणपती यांच्यांतच खरी निवडणूक चुरस होती. शूरांची व आरंभशूरांची गणपती ही देवता असते, हे लोकमान्यांनी बरोबर ओळखले व गजमुद्रेचा, परंतु तुंदिलतनू, गणांचा पती असून मातीच्या पिंडाचा असा हा मोदकभक्त गणपती सार्वजनिक उत्सवाकरता निवडला. बिचाऱ्याने कधी कसल्या रावणवधात किंवा महाभारतात भाग घेतलेला नाही ! हिंसेपासून सर्वस्वी अलिप्त ! आता सार्वजनिक गणपती उत्सवाबरोबरच शिवाजी उत्सवही लोकमान्यांनीच सुरू केला. परंतु लोकमान्यांचे काय सगळेच ऐकायचे ? लोकांनी शिवाजी उत्सवाकडे फारसे लक्ष दिले नाही व गणपतीउत्सव मात्र धडाक्याने स्वीकारला।

मारुतीवरून होणारे दंगे तत्क्षणी इतिहासजमा होऊन जातीयवादाचा पुरस्कर्ता या आरोपातून या ब्रह्मचाऱ्याची सुटका झाली. जातीय दंग्याला कारणीभूत झालेला 'सोन्या मारुती' हा अखेरचा 'मारुती'! मारुतीचे वैर अहिन्दूंनी सोडले हनुमानाने शेपटी कपाळाला लावली !

मुसलमान बंधूंच्या मनांत विद्येच्या माहेरघरी – खुद्द पुण्यात – या विद्येच्या देवतेसंबंधी धास्ती निर्माण व्हावी ही गोष्ट योग्य नाही. पुण्याचा गणपती–उत्सव यंदा शांततेने पार पडला ही गोष्ट या दृष्टीने चांगली झाली.

मोदक हा पदार्थ महाराष्ट्र सरकारने सरकारी खर्चाने सर्व मुसलमान बंधूंना एकदा खाऊ घालावा. पातळ पारीचा, भरपूर पुरणाचा असा एक एक मोदक या आमच्या बंधूंच्या मुखांत एकदा विरघळू द्या– पुनः म्हणून गणपतीच्या मिरवणुकीवर कधी हल्ला होणार नाही. प्रत्येक मशिदीपुढे निदान शंभर मोदकांची मागणी सुरू होईल. परंतु सध्याच्या अन्नपरिस्थितीत तांदळाचा कुठलाच पदार्थ अशा रीती

वाटणे परवडणारे नाही. परंतु आमच्या तोंडचा घास काढूनही ही गोष्ट सरकारने करावीच.

वस्तुत:, मुसलमान बंधूंनी गणपतीच्या मिरवणुकी काढणाऱ्या हिंदू बंधूंची मुळीच भीती बाळगण्याचे कारण नाही. गणपती ही विद्येची देवता आहे. माणूस सुशिक्षित झाला की, जास्त अहिंसक बनत जातो, असा लष्करी सेनानींचा अनुभव आहे. याचा अर्थ उगाच रक्तपात करणे तर त्याला त्याज्य वाटतेच, परन्तु आवश्यक तेथेही रक्तपात करण्यापूर्वी त्याच्या मनात असंख्य 'चक्रे' सुरू होऊन तो काहीही करत नाही! या गजाननाचे रूप थोडेसे शक्तिमान असले– मारे हत्तीचे ससोंड मुख त्याच्या स्थूल शरीरावर असले तरी सोंडेने एकाच वेळी दहापंधरा मोदकांची उचल-बांगडी करण्यापलीकडे मोरया काही करू शकणार नाही, ही गोष्ट मुसलमानबंधूंनी ध्यानात घ्यावी. द्याल त्या वाहनावर बिचारा बसतो. उंदीर हे त्याचे लाडके वाहन! या वाहनावरून काही करणे शक्य आहे का? सर्वच दृष्टींनी हिंदुसमाज पुरुषाचा प्रतिनिधी शोभावा असा हा मोरया आहे. जसा देव तशी माणसे!

मारुतीच्या उपासनेसारखे 'करि डळमळ भूमंडळ' किंवा 'कडाडिले ब्रह्मांड' असे या दैवताच्या उपासनेत काही नाही बरं! 'धनार्थी लभते धनं', 'पुत्रार्थी लभते पुत्रं,' 'मोक्षार्थी लभते गतीम्' असे जो जे वांच्छिल ते ते देणारे हे दैवत आहे. मांडवलदारांना, मजुरांना, चोरांना, फकिरांना, साधूंना ज्याप्रमाणे काँग्रेस, तशी तमाम भक्तांना ही 'मोरया मूर्ति' आहे. अशा या दैवताचा द्वेष कुणी करू नये. म्हणूनच यापुढे या दैवताची धास्ती मनातून काढून टाकून सर्व मुसलमान बंधूंनी पुढील वर्षापासून गणपती विसर्जनाला निघाला की बांग द्यावी– 'गणपती बाप्पा मोरया– पुढल्या वर्षी असेच या!'

महाराष्ट्र सरकारच्या पोलिसांना यंदा फारच त्रास झाला. प्रत्येक गणपतीपुढे चार–चार पोलिसांनी अहोरात्र बसून राहायचे ही काय शिक्षा? या दृष्टीने या पुढे पुण्यातील व प्रमुख शहरातील सार्वजनिक गणपतीच पोलिस चौकीतून बसविल्यास अधिक सोईचे होईल. रस्त्यावर मांडव घालून दहा–दहा दिवस रस्त्यावरील नागरिकांची होणारी गैरसोय तरी टळेल.

आता गणपतीसमोरच कार्यक्रम होऊ शकणार नाहीत, ही गोष्ट खरी. परंतु नव्याण्णव टक्के गणपतीसमोर कार्यक्रम म्हणजे काय असतात? ते काय कुठेही केले तरी चालतील. यंदा एका सार्वजनिक गणपतीपुढे तर व्यवस्थापक मंडळाने अशी पाटी लावली होती–

"जागेअभावी गणपतीपुढील कार्यक्रम गणपती विसर्जनानंतर होतील."

आपल्या भारतात जे फार थोडे सुखी लोक आहेत, त्यांत 'पोलिस' हे आहेत. निदान महाराष्ट्र राज्यात तरी पोलिसांना हे नाकारता येणार नाही. सतत दहा दिवस 'गणपती ड्यूटी' करण्यापासून पुढील वर्षी जनतेने त्यांची मुक्तता करावी. गणपतीच चौकीवर न्यावा.

– ग्यानबा ●

# अंतरकर अंतरले !!

## वसंत सहस्रबुद्धे

अंतरकर गेले! होय 'हंस'चे संपादक अनंत अंतरकर गेले. 'मोहिनी'ने महाराष्ट्राला खुदुखुदू हसायला लावणारे अंतरकर काल दुपारी तीनचे सुमारास या दिवाळी अंकाचे धामधुमीचे दिवसांत 'हंस' 'मोहिनी' 'नवल' या अपत्यांना मागे ठेवून कायमचे अंतरले!

डोळ्यांनी त्यांचे सर्व अंत्यसंस्कार पाहूनही अंतरकर निधन पावले, हे मला खरे वाटत नाही. ते अजूनही आहेत असंच वाटतं. वाटतं... आता ते दरवर्षीप्रमाणे टॅक्सी करून येतील, घाईघाईने वर येऊन म्हणतील, "सहस्रबुद्धे, आता काम झपाट्याने चालू द्या– ...... दिवस थोडे राहिलेत. तीन अंकांचं चित्राचं काम व्हायचंय्– रोज दोन-दोन, तीन–तीनही चित्रं मला लागतील. ..मी आता ठोकळांकडे चाललो आहे. आज त्यांची कथा मिळायची आहे! छे, छे, चहा वगैरे आता काही नको! मग येईन मी सावकाशपणानं तुमच्याकडे... मग बोलूच आपण ... तुम्हांला पुढच्या काही अंकांच्या योजना सांगेन ... बरं ऽऽ अच्छा ऽऽ." निळा सूट घातलेली त्यांची कृशमूर्ती जशी घाईघाईने आली ... तशी निघून जाईल ..... त्यांच्या 'चार मिनार'चा तिखट धूर रेंगाळत मागे राहील...

पण आता यांपैकी काही व्हायचं नाही— ते अंतरकर–पर्व संपलं आहे!

म्हणजे दि. ४–१०–६६ रोजी, काल दुपारी तीन साडेतीन वाजता मी काही कामासाठी किर्लोस्कर प्रेसमध्ये गेलो ... श्री. तळवलकर यांच्याकडे काही काम होतं ... मला पाहताच तळवलकर काही काळ स्तब्ध राहिले. मग त्यांनी हलक्या आवाजात विचारलं, "अंतरकरांचेबद्दल तुम्हांला समजलंय् का काही ... ?" "नाही ... पण आजच त्यांना हॉस्पिटलमधून डिस्चार्ज मिळायचा होता ...." मी सांगू लागलो ... मला हाताने थांबण्याची खूण करून ते



सावकाश म्हणाले . . . " अंतरकर गेले, आताच गोखलेंना फोन आलाय !"

मी मटकन खुर्चीवर बसलो . . . डोकं भणाणून गेलं . . . डोळ्यांसमोर अंतरकरांना हॉस्पिटलमध्ये ५-६ दिवसांपूर्वी मी भेटायला गेलो असतानाचा चेहरा उभा राहिला . . . अंतरकर हसतमुखानं म्हणाले होते . . . " मी आठदहा दिवसांत घरी जातोच आहे, तुम्ही सर्व मंडळी नंदूला (अंतरकरांचे द्वितीय चिरंजीव) मदत करताच आहात– मी अंकाची आता काळजी करत नाही . . . त्याबाबतीत फिलॉसॉफिकल आउटलुक घेतला आहे मी . . ."

श्री. तळवलकर हॉस्पिटलमध्ये फोन करीत होते . . . बातमी खरी आहे ना, याची खात्री करून घेत होते. मनात विचार आला . . . अशा वाईट बातम्या क्वचितच खोट्या होत असतात. पण ही बातमी खोटी व्हावी . . .

संध्याकाळी सहाचे सुमारास अंतरकरांचे बंगल्यावर गेलो . . . बंगल्याचं आवार व रस्त्याचा काही भाग अंत्यदर्शनासाठी आलेल्या मंडळींनी फुलून गेला होता. आत गेलो. अंतरकरांना समोरच एका कॉटवर ठेवण्यात आलं होतं... हार घालताना त्यांच्या चेहऱ्याकडे पाहिलं . . . चेहऱ्यावर मंद हास्य तरळत होतं . . . शांतपणानं झोपलेल्यासारखे अंतरकर दिसत होते . . वाटलं चट्‌कन डोळे उघडून म्हणतील. . " हंऽऽ काय, आणलंत काय चित्रं . . . कथा कशी वाटली ?" पण तसं कुठलं व्हायला !

बाहेर येऊन आवारातल्या बागेत उभा राहिलो. माझ्या व अंतरकरांच्या गेल्या दहा वर्षांतल्या सहवासातले अनेक प्रसंग डोळ्यांसमोरून सरकत होते . . .

हाच बंगला नुकताच बांधून झाला होता. मला मुद्दाम बंगला पाहायला अंतरकरांनी बोलावलं होतं... एका रविवारी सायंकाळी मी या बंगल्याच्या आवारात उभा राहिलो होतो... धोतर

व पांढरा शर्ट घातलेले अंतरकर मला नवे घर हिंडून दाखवत होते...घर दाखवून झालं... घरापाठीमागे भाजीपाला लावला होता... अंतरकर अभिमानाने सांगत होते... "ही वांग्याची झाडं पाहिलीत ? परवाच आम्ही याची भाजी केली होती. हा कोथिंबिरीचा वाफा... या मिरच्या..." बाग पाहता पाहता बंगल्याला अर्धी प्रदक्षिणा झाली... अंतरकर माहिती सांगत होते, मी ऐकत होतो...सदासर्वदा 'हंस-मोहिनी-नवल' यांच्या व्यापात स्वत:ला विसरणारा हा माणूस मला स्वत:च्या बागेतल्या रोपांची माहिती देत होता...

निम्मी प्रदक्षिणा झाली होती... बोलण्याच्या नादात अंतरकर वळले व तोच भाग पुन्हा...दाखवत चालू लागले. चेहरा गंभीर ठेवत मी त्यांचेमागून गेलो ... घरापाठीमागचे दरवाजात आल्यावर मी म्हटले, "अंतरकर, आपण हीच अर्धप्रदक्षिणा दोनदा केली ! " अंतरकरांनाही हसू आलं..." बरं ऽऽ असं झालं काय ? बरं–बरं, आता पलीकडची प्रदक्षिणा करू"...ते म्हणाले. सर्व पाहून झालं... आत येऊन बसलो ...चहा घेताना मी म्हणालो, "अंतरकर, एका दृष्टीनं तुम्ही हे घर प्रेसपासून लांब अंतरावर बांधलंत हे बरं आहे. निदान घरात असाल त्या वेळी तरी प्रुफ़े...गॅल्या...फॉर्म यांपासून सुटका होईल...थोडा विरंगुळा मिळेल, विश्रांती मिळेल."

"छे ऽ छे ऽ विरंगुळा कसचा ? माझा विरंगुळा म्हणजे माझी मासिकं...अहो, मी फक्त शरीरानंच इथं असतो... पण माझं मन असतं प्रेसमध्ये. खरं म्हणजे मला प्रेसशेजारीच घर बांधायचं होतं– पण ते काही जमलं नाही, आणि खरं सांगू ? माझी मासिकं हेच माझं जीवन आहे...मी त्यांचेपासून वेगळा होऊच शकत नाही !"

आता पुढं काय बोलायचं ? मी मुकाट बसलो. मासिकांच्या व्यापात यांनी स्वत:-ला इतकं गुंतवून घेतलं होतं की सुटी.. विश्रांती हे शब्द त्यांचे दृष्टीने निरर्थक होते... मी स्वत: रविवारीही काम करतो, हे त्यांना सांगितल्यावर ते खूष झाले होते ! "सुटी घेऊन काय महत्कार्य करायचं असतं ! त्यापेक्षा आपलं कार्य करत राहावं ! " मुठीत 'चार-मिनार' धरून त्याचा दीर्घ झुरका त्यांनी सोडला–त्याच्या धुराच्या लोटातून त्यांचे शब्द आले होते.

आपल्याप्रमाणंच आपल्या कार्यालयातल्या लोकांनीही सारखं काम करत राहावं...फालतू गोष्टींत वेळ घालवू नये, असं त्यांना वाटायचं...त्या संदर्भात एक प्रसंग आठवला...काही वर्षांपूर्वी रशियन पंतप्रधान क्रुश्चेव्ह व बुल्गानिन यांनी भारतास भेट दिली होती. त्या दिवशी ते दोघे पुढारी पुण्यास भेट देणार होते...एस्. पी.'च्या मागील पटांगणात प्रचंड जाहीर सभा होणार होती. हे रशियन नेते उघड्या गाडीतून टिळक रोडवरून जायचे होते. त्यांना पाहण्यासाठी हजारो पुणेकर रस्त्याच्या दोन्ही बाजूंस गर्दी करून उभे होते. मीही अंतरकरांचे ऑफिससमोरच उभा होतो.

ऑफिसमधल्या कुणीही नोकरानं काम सोडून बाहेर जायचं नाही, असा फतवा अंतरकरांनी काढला होता... तरीही काही मंडळी अंतरकरांचा डोळा चुकवून बाहेर येऊन उभी राहिली... थोड्याच वेळात त्यांची गैरहजेरी अंतरकरांचे लक्षात आली. ते संतापले. त्यांनी ऑफिस-बॉयला बोलावलं. "शंकर, बाहेर कोण कोण गेले आहेत, त्यांना घेऊन ये बोलावून. त्यांना सांग तुमची इथली आजची कामं क्रुश्चेव्ह–बुल्गानिन करणार नाहीत–" खरोखरच शंकरकडून त्या सर्वांना त्यांनी आत बोलावून घेतले होते.

अंतरकरांची एक विशेष गोष्ट म्हणजे त्यांना पुण्यातले २-३ रस्ते सोडल्यास पुण्याची काहीही माहिती नव्हती. कुठे जवळही जायचे असल्यास ते टॅक्सी अगर रिक्षातूनच जात असत. फार काय पूर्वीच्या नारायण पेठेतल्या त्यांच्या बिऱ्हाडातून आपल्या ऑफिसमध्येही बरेच दिवस ते टॅक्सीने येत असत–पुढे पुढे ते कुणाला-तरी बरोबर घेऊन घरापर्यंत चालत जात. पुण्यात एकदा संपादकांची बैठक कुठल्याशा हॉलमध्ये भरावयाची होती...अंतरकरांची टॅक्सी थोड्या उशिराच तिथे येऊन पोचली. अंतरकरांना पाहताच कुणीसं विचारलं, "काय अंतरकर, पत्ता शेवटी सापडला वाटतं ? आम्हांला वाटलं तुम्ही तो शोधून इथे पोचेपर्यंत बैठक संपणार ! "

" त्याचं असं आहे, घरांचे पत्ते शोधून काढणं ही संपादकाच्या दृष्टीनं काही महत्त्वाची अचीव्हमेंटची गोष्ट नाही ! अहो, पत्ते काय...वर्तमानपत्रे टाकणारी पोरंही बरोबर शोधतात...पण मी जे काम करतो ते तुमच्यापैकी कोण करतो माझ्यासारखं ? " अंतरकरांनी ताड्कन उत्तर दिलं.

चित्रकार या नात्यानं माझा व त्यांचा संबंध रोज येत असे. जवळ जवळ रोज एक कथा चित्राला न्यायची व तिचे चित्र दुसरे दिवशी तयार करून द्यायचे व नवीन कथा घेऊन परत यायचे हा आमचा नित्यक्रम... चित्र देताना कथा कशी वाटली याबद्दलचे माझे मत त्यांना सांगावे लागे. मी त्यांना म्हणे, "अंतरकर, मला त्यातलं काय समजतंय–मी काय टीकाकार आहे ? "

"त्याचं मुख्यतः कारण असं की, अॅव्हरेज रीडरला ती गोष्ट कशी वाटते, हे मला पाहायचं असतं. बऱ्याच वेळा एखादी कथा मला स्वतःला आवडलेली नसते, पण ती वाचकांना आवडेल असा अंदाज मला येतो; मी कथा छापतो... माझा अंदाज बऱ्याच वेळा खरा ठरतो ! " ते म्हणायचे.

ते मूडमध्ये असले की खूप वेळा तासतास वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करायचे. त्यांचे विचार ऐकताना मला नेहमीच काही नवीन गोष्टी शिकण्याचा प्रत्यय येत असे. एखाद्या कथेची चर्चा–तिच्या बऱ्या-वाईट अंगांसंबंधी – करताना एखाद्या कथेमध्ये काय कमी आहे, काय हवं होतं, कोणता भाग सुंदर जमला आहे यांसंबंधी ते बोलू लागले म्हणजे त्यांचे विचार ऐकतच राहावं असं वाटायचं. ज्यांनी त्यांच्या चर्चा

ऐकल्या आहेत ते माझ्याशी सहमतच होतील.

कथेचं चित्र कसं असावं यासंबंधीच्या त्यांच्या कल्पना निश्चितपणे अभ्यासपूर्ण असत. चित्र हे प्रसंगावरच आधारलेलं असावं असा त्यांचा आग्रह असे. चित्राला प्रसंग नेमका कोणता घ्यावा या संबंधीच्या त्यांच्या सूचना मला नेहमीच अभ्यसनीय वाटत.

आपल्या अंकांतील प्रत्येक लेख जास्तीत जास्त शुद्ध छापला जावा, शब्द योग्य तेच व योग्य तिथंच पडले पाहिजेत याकरता व व्याकरणदृष्टचा मजकुरात काही चूक राहू नये यासाठी ते जिवापाड श्रम करत असत. लेखकांनी याकडे काटेकोर लक्ष द्यावे अशी त्यांची अपेक्षा असे. आजकाल 'सुंदर मराठी भाषाच लेखातून आढळत नाही,' म्हणून ते हळहळत.

नवीन पिढीतल्या लेखकांची अभ्यासू वृत्ती, भाषेचा काळजीपूर्वक अभ्यास नाहीसा होत आहे, अशी तक्रार ते करत असत.

लेखक 'द्रव्यनिष्ठ' होत आहेत, असे विधान त्यांनी जाहीरपणे केले होते. त्यावरून बरेच वादळ निर्माण झाले होते. त्याबद्दल मी त्यांना एकदा विचारले होते. ते म्हणाले होते, " ते पैसे मिळवण्याकरता लिहितात हे ठीक आहे. पैसा मिळावा असे सर्वांनाच वाटते; मीही त्यासाठीच हा पसारा मांडला आहे. तो काही केवळ साहित्यसेवा घडावी म्हणून नव्हे, हे मीही कबूल करतो...माझी तक्रार आहे ती ही की, त्यांच्याकडून लेखनाबाबत जी निष्ठा अपेक्षित आहे, ती कमी होत आहे...याबाबत अर्थातच मी काही म्हणू इच्छित नाही. तो माझा अधिकारही नाही."

सिनेमा वगैरे ठिकाणी अंतरकर क्वचितच दिसत. मात्र नाटके पाहण्याचा त्यांना बराच षौक होता. नवीन नाटक ते आवर्जून पाहत असत. एका नाट्यप्रयोगाचे वेळी त्यांनी मला तिथे पाहिले. दुसरे दिवशी त्यांनी मला विचारलं,

" तुम्हांलाही नाटकांची आवड आहे असं दिसतंय ! "

" होय--आहे, पण तुम्हांला आवड आहे हे मला माहिती नव्हतं " मी म्हणालो.

" अहो, नुसता पाहायचाच षौक नाही तर पूर्वी मी रंगभूमीवर भूमिकाही केल्या होत्या. मी जर संपादक झालो नसतो—तर बहुतेक नटच झालो असतो आणि माझ्या आताच्या स्वरूपावरून तुम्हांला खरं वाटायचं नाही, पण मी पूर्वी स्त्री भूमिकाही केल्या आहेत !" मिस्किलपणे हसत अंतरकरांनी माहिती दिली.

अंतरकरांचा हा पैलू मला नवीनच होता. सतत स्वतःच्या कामाच्या विचारांत बुडालेला हा माणूस अधूनमधून अशा काही मार्मिक कोटया करी की याचे खरे स्वभावदर्शन आपणांस झाले आहे की नाही याची शंका वाटावी. बऱ्याच वेळा बोलता बोलता ते थांबत व त्यांची स्वतःच्या विचारांशी तंद्री लागे. समोर कुणी बसला आहे याचेही भान त्यांना नसे. एकदा मी चित्राचे

कामासाठी त्यांचेकडे जाऊन बसलो. एक नवीन कथा माझ्यासमोर त्यांनी टाकली व "याचे एक मध्यमसर चित्र करा ..." असे म्हणून ते शून्यांत नजर लावून नुसते बसून राहिले . . . मी पाच–दहा मिनिटे चुळबुळत बसलो व उठून शेजारच्या एका मासिकाचे कार्यालयांत गेलो. त्यानंतर थोडया वेळात त्यांची तंद्री भंगली; समोर पाहिले–मी दिसलो नाही. "अरे ! हे सहस्रबुद्धे कुठं आहेत ? मध्येच कुठे निघून गेले" म्हणून त्यांनी मला शोधण्याकरता मनुष्य पिटाळला.

पानशेतच्या प्रलयात अंतरकरांचं अतोनात नुकसान झाले. अंगणात नुकताच ट्रकमधून उतरवलेला न्यूजपिंट पुराचे पाण्यात लगदा झाला. प्रेसमध्ये कमरेएवढे पाणी झाले. आसपासच्या लोकांनी आत शिरून यांना अक्षरश: उचलून बाहेर आणले. पुस्तके, जिवापाड जपलेल्या फाईल्स डोळ्यांसमोर नष्ट झाल्या. तिकडे नारायण पेठेत अंतरकरांचे बिऱ्हाड पाण्यात उभे होते. तिकडे जावे तर पोलिसांचा गराडा. त्यांना ब्रह्मांड आठवले. भ्रमिष्टासारखी स्थिती झाली. दुसरे दिवशी पूर ओसरताच आम्ही त्यांना भेटण्यास त्यांचे घरी गेलो. अंतरकर व त्यांची कुटुंबीय मंडळी गुडघाभर चिखलात वावरत होती. आमचे धीराचे शब्द घशातच अडकून राहिले. आम्हांला पाहताच अंतरकरांनी हात उंच करून अभिवादन केले. 'तयार कपडयांची दुकाने उघडी आहेत ना हो ?' म्हणून विचारले. कारण त्यांच्या अंगावरील कपडयांव्यतिरिक्त काही कपडे घरात शिल्लक राहिले नव्हते–

"बरं ऽऽ आता या कर्दमातून बाहेर पडलो की आपण पुन्हा झपाटयानं कामाला लागायचं हं !" असा त्यांनी आम्हांलाच धीर दिला. आता आम्ही काय धीर द्यायचा कपाळ ? मी त्यांच्या व्यक्तिमत्त्वानं प्रभावित झालो. ही जिद्द, ही व्यवसायावरची निष्ठा ही पुन्हा कुठे दिसेल ?

. . . बंगल्याच्या आवारात आता गर्दी वाढली होती. प्रेतवाहक गाडी येऊन दाखल झाली होती. अंतरकरांची अंत्ययात्रा सुरू झाली होती. . . आमचा सहवास संपला होता . . . भकास मुद्रेनं, शून्य मनानं स्मशानभूमीकडं मी निघालो. जगरहाटी थांबत नाही. रहाटगाडगं चालूच राहील. अंतरकरांचं कार्य पुढं चालू राहील–पण अंतरकर अंतरले. ते आता येणे नाहीत ! महाराष्ट्रातील एक नामवंत, अभ्यासू, निष्ठावंत संपादक नाहीसा झाला. एक साहित्य–तपस्वी निजधामास गेला.

अंतरकरांचे स्मृतीस त्रिवार वंदन! !

## विचारवारे — समीर

### □ आधुनिकतेला परंपरागत वळण

आशियाई देशांचा आर्थिक विकास ज्याने गेली बारा वर्षे अथपासून पाहिला आहे, अशा एका अमेरिकन तज्ज्ञाच्या मते आधुनिकतेच्या महापुरात कुठल्याही देशाची परंपरा, संस्कृती व मूल्ये वाहून जाता कामा नयेत. 'आशिया फाउंडेशन'चे भारतातील नवे प्रतिनिधी म्हणून श्री. रिचर्ड हेगी नुकतेच दिल्लीला आले आहेत व त्यांना वाटते, पश्चिमेकडून उसन्या घेतलेल्या तंत्रज्ञाला जर राष्ट्रीय स्वभावधर्म आणि देशातील सामाजिक व आर्थिक परिस्थिती यांना अनुकूल असे वळण लावले तरच प्रगतिशील देशांत आर्थिक नियोजन चांगले यशस्वी होऊ शकेल.

आशिया फाउंडेशनचे कार्यही स्थानिक गरजा व सामाजिक–आर्थिक–परिस्थिती लक्षात घेऊनच करावे लागेल. आशिया फाउंडेशन शिक्षण, समाजकार्य, नियोजन व संशोधन या क्षेत्रांत कार्य करीत असते व त्याचे उद्दिष्ट अगदी सूक्ष्म प्रमाणावर म्हणजे, एखाद्या जिल्ह्यात किंवा त्याहूनही लहान प्रमाणावर एखादी कल्पना अंमलात आणण्याचा प्रयोग करून पाहणे हे आहे. जर हा प्रयोग फाउंडेशनच्या पैशांवर व फाउंडेशनच्या जबाबदारीवर यशस्वी ठरला तर मग तो अधिक मोठ्या प्रमाणावर करण्यासाठी इतरांना सोपविण्यात येतो. शेतकीच्या क्षेत्रात फाउंडेशन नवीन दिशेने प्रगती करणार आहे, ती म्हणजे अधिक प्रांतांत शेतकी प्रशिक्षण केन्द्रे उघडण्याची शक्यता आहे. सिलोनमध्ये फाउंडेशनच्या वतीने शेती व सहकारी संस्था या विषयांचे शिक्षण देण्यासाठी एक दुय्यम शाळा उघडण्यात आली. या शाळेतल्या विद्यार्थ्यांचे केवळ पुस्तकी ज्ञानाने समाधान न झाल्याने त्यांनी स्वतः एक सहकारी दुकान उघडून कोंबड्या, वाटाणे इत्यादी विकणे सुरू केले आहे, अशी शाळा भारतातही काढता येईल.

### □ "युनेस्को"चे स्वरूप काय ?

पंडित नेहरूंच्या मौलिक विचारांचे मूल्यमापन करण्यासाठी बऱ्याच देशांतल्या विचारवंतांचा एक आंतरराष्ट्रीय मेळावा गेल्या आठवड्यात दिल्लीला भरला होता. त्यात नेहरूंच्या एका विधानावर विशेष विचारविनिमय झाला. म्हणजे "युनेस्को ही संस्था सबंध मानवी जगाची सदसद्विवेकबुद्धी आहे, असे म्हणता

येईल." प्रसिद्ध इंग्रजी कवी स्टीफन स्पेंडर म्हणाले. एखाद्या नोकरशाही संस्थेचे 'सदसद्विवेकबुद्धी' म्हणून वर्णन करता येणार नाही. अर्थात् एका अगदी अस्पष्ट अर्थाने या विधानात तथ्य आहे, पण हे विधान "कवी हे जगाचे खरे शासनकर्ते आहेत," अशा विधानासारखेच आहे. कवींच्याबद्दलचे हे विधान एका दृष्टीने अर्थपूर्ण असले तरी लौकिक अर्थाने ते उघड उघड असत्य आहे.

भारतातील ब्रिटिश हायकमिशनर जॉन फ्रीमन म्हणाले, "नेहरूंनी युनेस्को-बाबत वापरलेले शब्दप्रयोग काहीसे परस्परविरोधी आहेत. ते - म्हणजे "जगाची सदसद्विवेकबुद्धी" आणि "शांती ही माणसांच्या मनात असते." पण नेहरूंच्या स्वभावाचे क्रियाशील व चिंतनशील हे दोन्ही पैलू लक्षात घेतले की हा विरोधाभास नाहीसा होतो. युनेस्कोचा संबंध केवळ नैतिक मूल्यांच्या चिंतनाशी नसून प्रत्यक्ष कार्याशीही आहे. कुठल्याही संस्थेचा समाजाशी निकट संबंध असल्याखेरीज तिला 'सामाजिक सदसद्विवेकबुद्धी' प्राप्त होत नाही. युनेस्कोला जर नैतिक मूल्यांचा आधारस्तंभ म्हणून नाव मिळवायचे असेल तर तिने काही तरी भरीव सामाजिक कार्य करण्याची जबाबदारी तिने शिरावर घेतली पाहिजे.

## ☐ अमेरिकन अर्थकारणाची गुरुकिल्ली

प्रेसिडेंट ट्रूमनचे एक प्रमुख आर्थिक सल्लागार प्रा. केसरलिंग यांनी काही दिवसांपूर्वी दिल्लीला अमेरिकन अर्थकारणावर भाषण केले. तेव्हा म्हणाले की, 'न्यू डील' मुळे अमेरिकेतील राष्ट्रीय संपत्तीचे समान वितरण होण्यास फार मोठा हातभार लागला आहे. या समान वितरणासाठी जाणूनबुजून प्रयत्न केला गेल्यामुळेच अमेरिकन अर्थव्यवस्थेला कधी घसरण लागली नाही. 'न्यू डील' हे केवळ एक अर्थशास्त्रीय तंत्र नव्हते तर ती एक नैतिक व सामाजिक चळवळ होती. सध्या म्हणजे प्रेसिडेंट आयसेनहॉवरच्या काळापासून – अमेरिकन अर्थव्यवस्थेच्या वाढीचा वेग बराच मंदावला आहे. याचे मुख्य कारण म्हणजे सध्या चलनवाढ न होऊ देण्याकडे विशेष लक्ष पुरविण्यात येत आहे. शिवाय अर्थव्यवस्थेच्या एखाद्या अंगाची जोराने वाढ करायची व एकाद्या अंगाची वाढ मंदावू द्यायची, असा भेदभाव अमेरिकेत केला जात नाही. मात्र राष्ट्रीय उत्पन्नाची समान वाटणी करण्याचे तंत्र म्हणजेच आर्थिक वाढ असे नसते. पुनर्वितरणाच्या तंत्रामुळे अर्थिक विकासाला मदत होते इतकेच.

"अमेरिकेतही आम्ही दारिद्र्यासाठी लढा देत आहोत. पण याचा कोणी गैरसमज करून घेऊ नये. ज्यांच्याजवळ इतरांच्या मानाने कमी आहे त्यांची परिस्थिती सुधारण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत इतकाच त्याचा अर्थ आहे. मागासलेल्या देशांत दारिद्र्याला जो अर्थ आहे त्या अर्थाचे दारिद्र्य अमेरिकेत नाही."

## सय

नुस्त्या कानामात्रापरी
वाट वाट उमटली
ऊन पडे निपचित
तीळ फुली उखडली.

पान पान पेंगलेले
झाडी मातीशी झुकली
पाकोळ्यांना घेत कुशी
तळी छाया रेंगाळली.

दूर दूर आकाशात
फक्त एकान्त वर्तुळे
बांधलेले क्षण क्षण
झाले क्षणात मोकळे.

ओठ विसरले शाप
कथा टचकन् टिचली
तुझ्या जखमेची सय
पापणींत ओघळली !

*— राजा महाजन*

## वाटणी

माझे श्रम, तुझी सेवा
करू सोन्याचा दिवस
माझे सूर, तुझे गीत
काळी उजळू अवस

तुझी चिनी, माझे हात
दोघे न्हाऊया घामात
कामधेनु कायमची
एक बांधुया दारात

तुझे आसू, माझे ओठ
दु:ख पिऊया दोघात
तुझे माझे चार हात
सुख वाटूया लोकांत

*— सीताकांत पु. वालावलकर*

## आज वाटते......

आज वाटते पुनरपि व्हावी
सुमने सुकल्या निर्माल्याची
गतकालाच्या स्मृतीत शिरुनी
थांबावी ही कालगती

पुनरपि यावा कणाकणाला
चैतन्याचा नवा उजाळा
बहरावे वन, पुनरपि यावा
फुलाफुलाला नवा तजेला

वसंतऋतुच्या आगमनाचा
कुहूकुहू स्वर कानी यावा
हिरव्या नाजुक पर्णांमधुनी
जीवनरस भरुनी जावा

पुनरपि सरितेच्या काठी
गुलाल उधळित संध्या यावी
धुंद मनाने सखया पुनरपि
प्रीत आपुली रंगावी.

*— माधुरी कुलकर्णी*

# आस्वाद

अशीच दोन अक्षरांच्या मथळ्याची कविता ' सय ' एका वातावरणात वाचकाला घेऊन जाते. शांत व एकान्त वातावरणात आपल्या स्मृती उलगडून बसलेल्या प्रेमिकाचे वर्णन सुंदर आहे. पाकोळ्यांना छायांनी कुशीत घेणे आणि बांधलेले क्षण मोकळे होणे अशा कल्पनांनी कवितेला विशेष मुलायम केले आहे. प्रेमिक विव्हल आहे. पण प्रेमही काही तितके सुरक्षित राहिलेले नाही. कारण तिथे जखम आहेच. तिचीच तर ही सय. राजा महाजन यांनी एक-दोन ठिकाणी अस्पष्टता ठेवली असली, तरी एकंदर आविष्कार समजण्यासारखा आहे.

त्या दृष्टीने माधुरी कुलकर्णी यांनी काहीच गूढ ठेवलेले नाही. ' आज वाटते... ' ते सर्व त्यांनी समजावून सांगितले आहे. आज वाटते ते अगदी नवे नाही. एकदा घेतलेला मधुर अनुभव पुनः यावा, नव्हे पुनः पुनः यावा, असे कुणाला वाटत नाही ? ही कविता कुणालाही टीकाटिप्पणी वाचून समजेल, अशी आहे. कालगती थांबावी, असे वाटणे ही हुरहूर समजण्यासारखी आहे. रचनेच्या दृष्टीने २–३ ओळींत दोन–दोन मात्रांची काटकसर झाली आहे. अर्थात् कविता म्हणायला याची अडचण येत नाही हे वेगळे !

सीताकांत पु. वालावलकर यांनी केलेली ' वाटणी ' कुणीही पत्करील. म्हणजे आपल्या प्रियजनाला तो हेच म्हणेल. शेवटच्या कडव्यांत प्रियकर-प्रणयिनीच्या मिळून होणाऱ्या चार हातांची कल्पना अर्धवट सोडली गेली. प्रेमाचे अद्वैत म्हणजेच देवाचे स्वरूप. या देवाचे चार हात असे हे रूपक संपूर्ण नसते का करता आले ?

*— गोपीनाथ तळवलकर*

आमच्याकडे येणाऱ्या कवितांची संख्या पुष्कळच असते. त्यामुळे कवितांसंबंधीचा पत्रव्यवहार ज्या वेगाने व्हावा तसा होऊ शकत नाही. त्यातून दिवाळी १९६७ पर्यंतच्या कवितांची निवड आताच पूर्ण झालेली आहे. त्यामुळे यापुढे येणाऱ्या कवितांची दखल घेणे जवळ-जवळ अशक्य आहे, हे कृपया गृहीत धरावे.—संपादक

" पोरी, ती स्त्री आहे म्हणून ! निसर्गानेच तिला बंधनं घातली आहेत. तिच्या दुबळेपणात तिची शक्ती सामावली आहे.... "
प्रो. गायतोंडे सांगत होते.

## सौ. शकुन्तला पारपिल्लेवार

मी तेव्हा फायनल एम. ए. ला होते. माझे काही लेख व काही कविता नियतकालिकांतून आल्या होत्या. माझ्यात असलेल्या कलागुणांची जाणीव प्रोफेसर गायतोंडे ह्यांना झाली होती. गायतोंडे स्वतः पीएच्. डी. होते आणि प्रत्यही त्यांचं मार्गदर्शन मला लाभलं. त्यांनी दिलेल्या उत्तेजनामुळेच मी एक लेखमाला एका मासिकात सुरू केली होती. जवळ जवळ आठ-नऊ लेख प्रसिद्ध झाले होते. त्यांत आणखी एकाची भर टाकून एक पुस्तक छापावं, अशी माझी इच्छा. मी गायतोंड्यांना यासंबंधी बोलले. त्यांना कल्पना नुसतीच आवडली नाही तर त्यांनी त्या पुस्तकाला प्रस्तावना लिहायचं मला आश्वासन दिलं. मी कृतज्ञतेने भारावून गेले होते.


त्यानंतर तीनच दिवसांनंतर मी पुस्तकात समाविष्ट करण्यात येणारा शेवटचा लेख 'स्त्री-स्वातंत्र्य' त्यांना दाखवायला नेला. त्यांनी तो ठेवून घेतला. त्यांची त्यावरची प्रतिक्रिया बघायला मी फार उत्सुक होते. इतर लेख ते दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी परत देत. क्वचितच त्यांत थोडाफार फेरफार करावा लागे. मात्र ह्या लेखाच्या बाबतीत त्यांनी मला बरंच ताटकळत ठेवलं. आठ दिवस झाले. एक दिवस मनाचा हिय्या करून मी त्यांना विचारलंच,

" काय सर, लेख आवडला नाही ?"

" नाही ग, एवढ्यात वाचायच्या मनःस्थितीतच नाही मी. देतो एक-दोन दिवसांत. परत देतो हं !"

आणि खरं होतं. शिकवतानासुद्धा गायतोंडे पूर्वीसारखे हसतमुख दिसत नव्हते. एरव्ही क्लासमध्ये अधून मधून विनोद करून सगळा वर्ग हसता ठेवणारे हेच विद्वान् गायतोंडे होते का, अशी शंका यायला लागली होती. बोलतानासुद्धा सुरांत नैराश्य जाणवायचं. हसण्याचा ते प्रयत्न करायचे, पण खोटं हसू लपवता येत नव्हतं आणि ते पुनः गंभीर व्हायचे.

प्रोफेसर गायतोंड्यांनी एक दिवस बोलावलं, 'स्त्री-स्वातंत्र्य' हा लेख परत



केला. कुठे पेन्सिलीची खूण नव्हती अन् सुवारणा पण केली नव्हती. मी अधाशा-सारखी सगळी पानं चाळलीत. कुठेही त्यांनी एक रेघ ओढली नव्हती. मला वाटलं त्यांनी लेख वाचलाच नसावा. खात्री करावी म्हणून त्यांना म्हटलं, " सर, बरं नाही का तुम्हांला ?"

" का, बरा आहे की !"

" नाही, एवढयात जरा हरवल्यासारखे दिसता. मनावर कसलं तरी दडपण दिसतंय्."

" कशावरून म्हणत्येस ?"

" हेच बघा ना. एक महिना मी हा निबंध ठेवला तुमच्याकडे आणि तुम्ही तो वाचलाही नाहीत."

" नाही. तुझा निष्कर्ष चुकीचा आहे. मी वाचलाय् तुझा निबंध."

" अन् तुम्हांला त्यात काही फेरफार करावा, असं वाटलंच नाही ?"

" वाटलं ! त्यातल्या काही गोष्टींना माझा कडवा विरोध आहे."

" काय तुम्ही म्हणता हे ?"

" हो. तुला स्त्रीविषयी वाटणारी कळकळ, तिच्या दुबळेपणाचा घेण्यात येणारा गैरफायदा ह्या सगळ्या गोष्टी सत्य आहेत. विचार आणि आचार ह्या दोन भिन्न गोष्टी आहेत. स्त्रीपुरता विचार करायचा झाला तर तिनं नुसती विचारात उन्नती करून त्यानुसार आचार ठेवता येणार नाही. तिच्याकरिता काही एक वेगळी आचार-संहिता आहे. कर्तव्ये व जबाबदाऱ्या तिच्याकरिता महत्त्वाच्या आहेत."

" तिच्याकरिता ?" मी त्यांना थांबवीत म्हटलं. " पुरुष तरी इमानानं आपली कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडतात का ? मग स्त्रीवरच बंधन का ?"

" पोरी, ती स्त्री आहे म्हणून ! आनुवंशिक वारस आणि संस्कृती ह्यांनीच केवळ स्त्रीला मर्यादा घातल्या नाहीत. ह्या दोहोंपेक्षा श्रेष्ठ असा निसर्ग आहे.

त्यानंच तिला बंधनं घातली आहेत. आणि तिच्यां दुबळेपणात तिची शक्ती सामावली आहे."

"तर तुम्ही रूढीची बंधनं मानता? 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' ह्या मनुच्या उद्‌घोषाचा पाठपुरावा करता?"

"नाही. रूढीची बंधनं तोडून फेकावी असं मलाही वाटतं पण समजून उमजून. काही बंधनं स्त्रीला कवचासारखी आहेत, काही बंधनं स्त्रीचं पावित्र्य टिकावं म्हणून, तिच्या स्त्रीत्वाचं रक्षण व्हावं म्हणून नियतीनंच निर्माण केली आहेत. ती तरी तिनं मानावीत आणि तू मनुबद्दल म्हणत्येस? त्यानं तो उद्‌घोष कोणत्या संदर्भात म्हटला होता हे न समजता, त्यावर टीका करत्येस? तेच मला आवडत नाही. काय तू विसरलीस 'यत्र नार्यस्तु पूज्यते रमन्ते तत्र देवताः' हेसुद्धा मनूचंच वाक्य आहे?"

"माफ करा, सर! चुकलं असेल माझं."

आणि माझ्या स्वरांतली नरमाई पाहून तेही खजील झाले असावेत. ते म्हणाले, "ज्योत्स्ना, माझी सगळीच मतं तू ग्राह्य धरायला नकोत. प्रत्येक माणूस बऱ्या वाईटाच्या भेसळीचा नमुना आहे. माझ्यातलं वाईट-ईव्हिल-आहे ते हेच. मला जे पटत नाही ते स्पष्ट सांगायचं मी ठरवलं आहे. अँन्ड एव्हरीवन् मस्ट डू सो. इट् इज करेज. स्त्री आणि पुरुषाला पूर्णत्व प्राप्त झालं आहे काही विशिष्ट मर्यादांमुळं. ज्याला इंग्रजीत लिमिटेशन्स् म्हणतात. अँड् आय् प्रीफर् टू लिव्ह् विदिन् लिमिटेशन्स्."

"ऑल राईट सर. आज आनंद झालाय मला. वादामुळे तुमची स्पष्ट मतं तरी कळली."

"केवळ मी टीका केली म्हणून तुझा लेख टाकाऊ नाही! त्याचंही काही विशिष्ट मूल्य आहे आणि त्याचेही चाहते ह्या जगात आहेत. गो अहेड. यू आर् अॅट लिबर्टी."

"थँक्यू, सर!" मी म्हणाले. निघताना राहून राहून वाटत होतं, की गायतोंडे मूडमध्ये नाहीत. ते बोलत होते एका दडपणाखाली, कुठेतरी गडबड होती.

माझा लेख मी प्रसिद्धीकरिता एका मासिकाकडे पाठविला. संपादिकेनं त्या लेखाच्या अनुषंगानं त्याच महिन्याच्या अग्रलेखात सगळ्या स्त्री आणि पुरुष वाचकांना आव्हान केलं होतं. एक परिसंवाद आयोजित केला होता. त्यामुळं माझं नाव बरंच झालं.

विवाद्य विषयाला हात घातल्यामुळं मला आनन्दच होत होता. मात्र माझा तो शेवटचाच निबंध ठरला.

मध्यंतरी बरंच काही घडलं. माझ्या निबंधांचं पुस्तक कधीच बाहेर पडलं नाही. गायतोंड्यांनी त्याला प्रस्तावना लिहिली नाही. त्यांना प्रस्तावना लिहावीच लागली नाही!

बरेच दिवस दडपणाखाली वागणारे, वृत्तीनं बदललेले गायतोंडे तसं का वागायचे हे मला अचानक कळलं.

माझा लेख प्रसिद्ध झाल्यानंतर थोड्याच दिवसांत त्यांच्या सौभाग्यवतीनं आत्महत्या केली. त्यांच्या सौभाग्यवतींना हे करायला काय कारण होतं हे कुणालाच कळलं नाही. कुणी म्हणायचे, " प्रोफेसर गायतोंडे फार छळायचे तिला." तर कुणी म्हणालं, " नाही. तिला मूल नव्हतं. आपण आई कधीच होणार नाही, हा एकच विचार तिच्या मनात घोळायचा. ती वेडी झाली आणि आत्महत्या केली तिनं."

मी मिसेस् गायतोंड्यांना कधीच पाहिलेले नव्हते. पण ऐकून होत्ये त्या फार फार रूपवान आहेत म्हणून. फारशा शिकल्या नाहीत. पण घरचं वळण होतं. मिस्टर गायतोंडे ह्यांच्याविषयी लोक उलटं, सीधं काहीही बोलोत, मला मात्र माझा विश्वास सांगत होता, तिच्या आत्महत्येला निराळं कारण होतं. एक दिवस माझी मैत्रिण शीला मला कॉलेजच्या लॉनवर घेऊन गेली आणि म्हणाली, " माहीत आहे, कॉलेजमध्ये काय गोष्टी चालल्यात त्या ? "

" हो. आत्महत्येविषयी ! मिसेस् गायतोंड्यांच्या ! " – मी.

" तू भेटलीस प्रोफेसरांना ? "

" नाही. जायला पाहिजे. तरीच ते एवढ्यात असे वागत होते. त्यांचं दुःख कोणीच कमी करू शकलं नाही. बायको, जिला सहचारिणी, सहधर्मिणी म्हणतात, तिनंसुद्धा त्यांचं दुःख जास्तच वाढवलं. "

" लोक काय बोलतात, कळलंय का तुला ? "

" हो. काहीतरी वेड्यासारखं बोलतात ! तुला खरं वाटतं, गायतोंड्यांसारखा देवमाणूस कुणाचा छळ करील म्हणून ? "

" नाही ग ! "

" अन् म्हणे काय मूल होत नाही म्हणून बायकोनं आत्महत्या केली ? लोकांना पंधरा वर्षांनंतर मुलं झाल्याची उदाहरणं आहेत. तुला काय वाटतं, शीला ? किती वर्षं झाली असतील त्यांच्या लग्नाला ? "

" दहा की अकरा झाली असावीत ! "

" तू पाहिलं होतंस मिसेस गायतोंड्यांना ? "

" हो. एवढी देखणी बायको, लाखात एक होती ! "

" झालं तरी काय तिला असं करायला ? एवढा विद्वान् पीएच्. डी. नवरा ? "

" हो. लोक आणखी काही बोलतात. "

" काय ? "

" तुझ्यामागे क्लासमध्ये गोष्टी चालल्या होत्या. " ती भीतभीत, अडखळत काहीतरी सांगायचा प्रयत्न करीत होती.

" सांग ना ! " मी म्हणाल्ये.

" सांगत्ये ! तुझा आणि गायतोंड्यांचा संबंध लावताहेत सगळे. म्हणतात तू त्यांच्यावर प्रेम करायचीस. त्यांच्या बायकोला हे कळलं. "

"चुप. साफ खोटं आहे हे!" गोष्ट कुठल्या कुठे आली होती. कधी स्वप्नातही तसा विचार माझ्या मनात आला नव्हता.

"हो ग! खरंच! लोक बोलताहेत. कुणाच्या तोंडाला कुलूप लावणार तू? म्हणे हे प्रकरण मिसेस् गायतोंडयांना कळलं. उगीच मार्गात अडचण नको, म्हणून मार्ग मोकळा करून दिला तिनं. केवळ तुझ्याकरिता."

लोकांनी पराचा कावळा केला होता. शब्दानं शब्द वाढतच होता. लोकांना चांगलं पाहवत नाही म्हणतात तेच खरं. खुलासा करायलाच पाहिजे होता. मी प्रोफेसर गायतोंडयांना भेटायचं ठरवलं. स्त्रीकरिता ह्यो जगातली माणसं जीवन जगणं किती कठीण करून ठेवतात? नाही......मी असा धोपटमार्ग पत्करणार नव्हते. परिस्थितीला हिंमतीनं तोंड द्यायलाच पाहिजे होतं.

त्या दिवशी शीलाशी झालेल्या भाषणानंतर प्रत्येकजण माझ्याकडे साशंक नजरेनं बघतो आहे, असं वाटलं. कॉलेजमध्येच नाही, तर सडकेवर, दुकानात, चौकाचौकावर माझ्या बाजूनं जाणारा प्रत्येक माणूस 'हीच ती!' म्हणतोय् असं वाटलं. केव्हा एकदा घरी जाऊन तोंड लपवीन, असं मला झालं.

त्याच मनःस्थितीत मी घरी गेले. बाहेर झाला तेवढा छळ पुरे नव्हता म्हणून की काय, आईनं एक पत्र हातात दिलं. चांगलं जाड कव्हर होतं. सुंदर हस्तक्षरांत माझा पत्ता लिहिला होता. मागच्या बाजूला कुणी पाठवलं ते लिहिलं होतं. मी नाव वाचलं आणि पुनः वाचलं – सुशीला गायतोंडे. नावाच्या आधी "सौ." लिहिलं होतं. असं वाटलं ते पत्र मला खाणार की काय? सौ. सुशीला गायतोंडे? किती अंत पाहणार होते हे प्रसंग कुणास ठाऊक? मी ते पत्र तसंच ठेवून दिलं जड अंतःकरणानं. न वाचताही त्यातला मजकूर कुणीतरी मोठ्यानं माझ्या कानांजवळ उच्चारतो आहे असं वाटलं आणि एकदा वाटलं कुठे माझे कान फुटतील की काय? मी दोन्ही कानांवर हात ठेवून किंकाळीच मारली.

"काय झालं, पोरी?" आई गडबडीनं जवळ आली माझ्या. मी प्रसंग सांभाळला. "आई, डोकं दुखतं ग. चहा दे करून!"

वेडं व्हायची वेळ आली होती. हिंमत करून मी ते पाकीट फोडलं. भीतभीतच एकेक शब्द वाचायला सुरुवात केली आणि जेव्हा सगळं वाचून झालं तेव्हा माझा जीव भांड्यात पडला. पत्रात कुठेच माझ्या अन् गायतोंडयांच्या संबंधाचा उल्लेख नव्हता. पत्राच्या भाषेवरून तिच्यावरील संस्कारांचीच कल्पना येत होती. भाषेत लालित्य होतं. सांगण्यात समंजसपणा होता. उपदेशात विदुषीचं अवसान होतं. मला आलेल्या इतर अनेक वाचकांच्या पत्रांसारखेच ते एक होते. पण मिसेस् गायतोंडयांनी माझी पाठ थोपटली होती. माझ्या प्रसिद्ध झालेल्या लेखाबद्दल! पत्रातल्या तारखेवरून हे स्पष्ट होत होतं. तिनं पत्र आत्महत्या करायच्या दोनच दिवस आधी लिहिलं असावं.

माणसाच्या हस्ताक्षरावरून त्याच्या चारित्र्याचा अंदाज घेता येतो. आणि असं असेल, तर तिच्या चारित्र्याविषयी शंका घ्यायला जागाच नव्हती. प्रोफेसर गायतोंड्यांची मानसिक ठेवण नेहमीच चांगली असायची. त्यावरून त्यांचं वैवाहिक जीवन सुखी नव्हतं, असा निकर्ष काढणं मूर्खपणाचं होतं.

पत्र वाचल्यानंतर तर मला असं वाटलं जणू सौ. सुशीला गायतोंड्यांना आमची म्हणजे प्रोफेसरांची अन् माझी ओळख आहे की नाही हेही माहीत नाही. ' मन चिंती ते वैरी न चिंती ' म्हणतात ना ? पत्रात काही भाग असा होता– " तुम्हांला स्त्री-जातीविषयी वाटणारी कळकळ, त्यांच्या बंधनांची असलेली जाणीव आणि त्यांच्यासाठी काहीतरी बदल घडून आला पाहिजे, असे वाटण्याच्या मागची भावना ह्यांचं मी कौतुक करत्ये. बऱ्याचदा माझ्याही मनात घोळतं होतं कुणीतरी ह्या विषयाला हात घालावा म्हणून. आणि अचानक ते मासिक माझ्या हाती पडलं. लोक तुम्हांला काहीही म्हणोत, तुम्हांला जे बरं वाटतं ते तुम्ही सांगायचा प्रयत्न केला आहे. आणि तो प्रशंसनीय आहे. उत्तेजनार्ह आहे. तुमच्या म्हणण्याप्रमाणे जेव्हा स्त्री विचारस्वातंत्र्याचा विचार करू लागते, बरं बाईट ह्यांच्यामधल्या कडेवर उभी असते, तेव्हा तिच्यावर लग्नाचं बंधन घालण्यात येतं. तिला तिच्याकरिता बरं काय, वाईट काय हा विचार करायला उसंतच मिळत नाही. लग्नानंतर पतीचं प्रेम हेसुद्धा बंधनच असतं. केवळ तिला त्याच्याकडे ओढून ठेवणारं, आणि थोड्याच दिवसांत जेव्हा ती थोडी बंड करून उठायला पाहते तेव्हा तिच्याभोवती टाकले जातात ते पाश–ममतेचे. ती आई होते. आणि आई ही जबाबदार पाहिजे. उच्छृंखल राहून चालणार नाही. स्त्री केवळ तिच्यावर समाजानं टाकलेल्या बंधनांचं प्रतीक आहे. तिला काही होऊ द्यायच्या आधीच तिला मुरगळलं जातं आणि ती त्यातच तिच्या संसारात मुरते–रमते–रस घ्यायला लागते. " असं बरंच काही लिहिलं होतं. दोन पानांचं लांबलचक पत्र. विद्वान् गायतोंडे ह्यांची बायकोसुद्धा विदुषी होती असं मला वाटलं. एकाला बंधनं ही अभिमानाची बाब होती, तर दुसरीला संसारानंतरही ती बंधनं काढून फेकावीत असं वाटत होतं. तिला तिचं स्वत्व-इंडिव्हिज्युॲलिटी-अशी शरणागती पत्करू देत नव्हतं. त्याच शरणागतीचं नाव ॲडजस्टमेंट आहे. आणि त्यांच्यांत हीच ॲडजस्टमेंट नव्हती. शरणागतीपेक्षा मरण बरं असं तिला वाटलं असावं. पण नुसते उच्च विचार असून चालणार नाही. अन्यायाविरुद्ध चीड असली तर बंड करून उभं राहायची तयारी पाहिजे. परिस्थितीला हिंमतीनं तोंड देता आलं पाहिजे. पण मिसेस् गायतोंडे ह्यांनी अवलंबिलेला मार्ग योग्य नव्हता. परिस्थितीशी सांगड घालता आली नाही म्हणून आत्महत्या ?

आणि दुसऱ्या दिवशी मी प्रोफेसरांच्या घरी त्यांना भेटायला गेल्ये. आम्ही समोरासमोर होतो तेव्हा काय बोलावं हे कळत नव्हतं. त्यांच्या हातात एक पुस्तक होतं. " सफरिंग ॲज् ए रिलिजन्. " त्यांनी पुस्तक पान मोडून बाजूला

काढून ठेवलं. पुढे म्हणाल्ये, " बरं झालंय् ज्योत्स्ना, तू आलीस ! "

एकाच वाक्यांत त्यांनी त्याचं मन मोकळं करून ठेवलं. कुणीतरी यावं असं त्यांना वाटतच होतं. बोलून निदान थोडं दुःख कमी करता येण्यासारखं होतं. मी दुःख प्रदर्शित केले व पुढे म्हणाल्ये–

" मी आधीच येणार होत्ये. पण मीसुद्धा त्या मनःस्थितीत नव्हते. "

" कळलं मला. सारं कळलं. "

" लोक काय बोलतात ह्याची कल्पना आलीय् तुम्हांला ? "

" हो ! लोकलज्जेची तुझ्यासारख्या सुसंकृत आणि विचारी मुलीनं किंचितही पर्वा करू नये. "

" मी माझ्याबद्दल म्हणत नाही. "

" माझ्याकरिता तेच महत्त्वाचं आहे. ज्योत्स्ना, मला खरंच फार वाईट वाटतं, तुझं नाव उगाच झालेल्या घटनेशी गुंफण्यात आलं. जीवनात सगळ्या गोष्टींची भरपाई करता येते. माझ्याकरिता तुला कलंक लागावा हे पाहुन तर मला आणखी-नच वाईट वाटतं. त्यांची भरपाई करता येणार नाही. "

" कलंक ? त्यात कसला आलाय् कलंक ? लोकांचं काय, ते काही म्हणतील. " मी म्हणाल्ये. पण माझं मलाच कळत होतं. विषय बदलायच्या हेतूनं मी पुढं म्हणाल्ये–" मला लागणाऱ्या कलंकाविषयी मला तेवढं वाटत नाही जेवढं ते तुमच्याविषयी अन् तुमच्या मिसेस्‌विषयी अभद्र बोलतात ते ऐकून वाटतं. "

" बघ. ज्योत्स्ना, मला त्याविषयी मुळीच वाईट वाटत नाही. खरी वस्तुस्थिती मलाच माहिती. लोक काहीही बोलोत. डांगोरा पिटायला ते सदैव तयार असतात. मी पलीकडे पोचलो आहे. जेव्हा दुःख, व्यथा, यातना त्या गोष्टी माणसाला धर्म वाटतात तेव्हा त्यांना तोंड द्यायला सामर्थ्यही प्राप्त होतं. "

आमच्या इकडच्या तिकडच्या बऱ्याच गोष्टी झाल्यात. बराच वेळ ते बायको-विषयी बोलत होते. त्यांच्या प्रेमाविषयी बोलत होते. त्यांनी कपाटांतून बरीच पत्रं काढलीत, बरेच फोटो काढले. मी सगळं पाहिलं. सगळी पत्रं वाचणं शक्य नव्हतं. पण माझी खात्री पटली मिसेस् गायतोंड्यांचं प्रोफेसरांवर निस्सीम प्रेम होतं. ते मध्येच म्हणाले,

" तिच्या आठवणी हाच आता उरल्या आयुष्याचा आधार आहे ! "

मी परतल्ये एक ओझं घेऊन, एक दडपण घेऊन.


दुसऱ्या दिवशी मी मावशीकडे जायला निघाले. पुणे सोडून नागपूरला. मनात ठरवून पुनः कधी कधी पुण्यात यायचे नाही. स्त्रियांच्या स्वातंत्र्याविषयी पुनः कधीही काही लिहायचे नाही; हे नक्की झाले होते. गायतोंड्यांची प्रस्तावना आता नको होती. मी पुस्तक प्रकाशनाचा नाद सोडला होता.

• • •




अन् याला उपाय ?
निश्चित आहे.
पंजाब नॅशनल बँकेचे

**सेफ डिपॉझिट व्हॉल्टस्**



आपले दागदागिने, बॉण्डस्, महत्त्वाची कागदपत्रे आणि इतर मौल्यवान वस्तू सुरक्षित राहण्यासाठीं पंजाब नॅशनल बँकेच्या सेफ डिपॉझिट व्हॉल्टमध्यें ठेवा. त्यामुळें चोरी आग, वाळवी इत्यादीपासून त्यांचे संरक्षण तर होतेच आणि आपणहि चिंतामुक्त होता.

**पंजाब नॅशनल बँक**

स्वावलंबनाचा एकमेव मार्ग — उत्पादनवृद्धि

PR/PNB/6620/Mr/3

## ☐ प्रपंचातील आसक्ती कशी कमी होईल ?

आज आमची स्थिती कशी झाली आहे पाहा. प्रपंच आम्हांला सुटत नाही, भगवंताचे प्रेम आम्हांला पाहिजे आहे. प्रपंचावरचे प्रेम न सोडता आम्हांस भगवंताचे समाधान लाभावे अशी आमची इच्छा आहे. खरोखरच प्रपंचातील आमचे हे प्रेम व्यभिचारी आहे. प्रेम ही वस्तू अशी आहे की, ती एकाच ठिकाणी ठेवता येईल. एका म्यान्यात ज्याप्रमाणे दोन तलवारी राहू शकत नाहीत, त्याप्रमाणे आमचे प्रेम आम्हांला दोन ठिकाणी ठेवता येणार नाही. आमचे खरे सुख एका भगवंताजवळच आहे व ते मिळविण्यासाठी आम्ही प्रपंच सोडायलाच पाहिजे, असे नाही. प्रपंचातील आम्हांला वाटणारी आसक्ती ही मुख्यतः नाहीशी झाली पाहिज. शास्त्रातसुद्धा हेच सांगितले आहे. शास्त्र हे अनुभवाचे बनलेले आहे. आमचा अनुभव आम्ही शास्त्राबरोबर पडताळून पाहत नाही. प्रपंचाची खरी किंमत आम्हांला कळल्याशिवाय त्याच्याबद्दल वाटणारी आमची आसक्ती कमी होणार नाही. आज प्रपंचात सुख नाही हे अनुभवास येऊनही त्याची आसक्ती आम्हांला सुटत नाही. ती आसक्ती सुटण्याचा काय मार्ग आहे, तो आम्ही पाहणे अगदी जरूरी आहे. प्रपंचाची आम्हांला गरज किती आहे? एखादा मनुष्य फिरावयास जाताना हातात काठी घेतो. त्याला हातात काठी घेणे हे कोणी भूषण आहे असे म्हणत नाही. त्याप्रमाणे भगवंताकडे जाण्याला प्रपंचाची आम्हांला आधारापुरतीच गरज आहे. हा प्रपंच करत असताना त्याची आसक्ती कमी होऊन भगवंताचे प्रेम येण्यासाठी शास्त्रांनी घालून दिलेली बंधने आम्ही पाळली पाहिजेत व त्यासाठी आपले आचार, विचार, उच्चार आम्ही सांभाळणे जरूर आहे. प्रपंचात वागताना सदाचाराने वागावे. सदाचार हा मूळ पाया आहे. नीतिधर्माचे आचरण असावे. नीतिधर्माची बंधने ही आमचे विकार आवरण्यासाठीच आहेत. विचाराने अत्यंत पवित्र असावे. कोणाचा द्वेष, मत्सर करू नये व दुसऱ्याचे अहित चिंतू नये. उच्चार तर फार सांभाळले पाहिजेत. नेहमी सर्वांशी गोड बोलावे. ज्या जिभेने आपण भगवंताचे नाम घेतो त्या जिभेने दुसऱ्याचे अंतःकरण कधीही न दुखावेल याची खबरदारी घ्यावी. दुसऱ्याचे अंतःकरण दुखवीत असताना त्याच्या ठिकाणी वास करीत असलेल्या भगवंतालाच आपण दुखवीत असतो. दुसऱ्याचे अंतःकरण दुखविणे हे मोठे पाप आहे. एक वर्षपर्यंत दुसऱ्याचे अंतःकरण न दुखविता राहणाऱ्या माणसाला वाचासिद्धी येईल. यासाठी बोलणे गोड असावे, हे परधर्माचे एक उच्च साधन आहे.

●

## □ जेथे हाव कायम राहते तो प्रपंच

जगात दोन प्रकारचे रोग माणसाला नेहमी सतावीत असतात. एक रोग असा की त्याने भूकच लागत नाही. कितीही औषधपाणी करा, काही उपयोग नाही. अशा माणसाला पंचपक्वान्नांचे जेवण तयार असून काय फायदा ? तो म्हणतो, " खायला खूप आहे, परंतु मला भूकच नाही त्याला काय करू ? " दुसरा एक रोग असा की कितीही खाल्ले तरी खाण्याची हाव काही पुरी होत नाही. काहीही खा त्याचे भस्म होते, अशा माणसाला कितीही खायला घातले तरी पुरेच पडत नाही म्हणजे त्याची हाव कायमच राहते. तद्वतच आपले आहे. आपल्याला एक रोग नसून दोन्ही रोग आहेत. इतका परमार्थाचा थाट भरला आहे. भजनपूजन चालू आहे, परंतु आपल्याला त्याचे प्रेम नाही, त्याची आवडच वाटत नाही. आपल्याला त्यांची खरी भूकच लागलेली नाही. आपण दरवर्षी वारी करतो आणि जन्मभर वारी करीतच राहणार. परंतु परमेश्वराचे प्रेम मात्र काही लागतच नाही. खरोखर भगवंताने आपल्याला आपल्या कल्पनेपेक्षा कितीतरी जास्त दिले. बायको, मुलें, नोकरी, धंदा, घरदार इत्यादी कितीतरी गोष्टी की, ज्यांपासून सुख मिळेल असे आपल्याला वाटते, त्या गोष्टी पुरविल्या, परंतु अजून आपली हाव काही थांबली नाही. या सर्वांचे भस्म करून आपली हाव कायमच आहे. हे असे किती दिवस चालणार ? समजा, एखादा मनुष्य पुष्कळ फुगला परंतु त्याला जर मधुमेह असेल तर तो लठ्ठपणा काही खरा नव्हे. त्याचप्रमाणे मानवी जीवन सुखी झाले तर ती सुधारणा म्हणायची. उलट, आजची स्थिती पाहावी तर सुधारणा जितक्या जास्त तितका माणूस जास्त असमाधानी झाला आहे. आपण नुसते नीतिधर्माने चालतो. आपली वागणूक वाईट नाही हे खरे. याचे कारण आपल्याला वाईट वागण्याची भीती वाटते. वाईट वागल्यास लोक नावे ठेवतील अशी वरवरची सुधारणा, असा दिखाऊ चांगूलपणा काय कामाचा ! परमेश्वराचे प्रेम लाभल्याशिवाय व इतर गोष्टींची हाव कमी झाल्याशिवाय काही फायदा नाही. नाहीतर आपण जन्मभर वारीच करीत राहू. तीर्थक्षेत्रे, पूजा, भजन वगैरे केल्याने अंतरंग सुधारेलच असे नाही. आणि अंतरंग सुधारले नाही तर बाकीच्यांचा उपयोग नाही. **तीर्थक्षेत्रे ही परमार्थाची नुसती आठवण ठेवतील.** या सर्वांमध्ये प्रेम येण्यास भगवंताला अनन्य भावाने शरण जाऊन सांगा, " रामा, आता आम्ही आमच्या प्रारब्धाचे भोग आनंदाने भोगू, आम्हांला त्याबद्दल खंत नाही. परंतु तुझे प्रेम आम्हांला दे. तुझ्या प्रेमाशिवाय आता मला कशाचीही आवड नाही. " जो भगवंताच्या प्रेमात रमला तो खात्रीने सुखी झाला. नाम हे प्रेमरूप असल्याने आपण नाम घेतले तर भगवंताचे प्रेम आल्यावाचून राहणार नाही. ●

# असे हे दुष्काळग्रस्त सुपे

लेखक

रतनलाल भंडारी

जवळ जवळ वर्षापूर्वीची गोष्ट असेल. दुष्काळाच्या अस्मानी सुलतानी आपत्तीने महाराष्ट्राच्या इतर भागांप्रमाणे आमचा गावही चिंतेने जळत होता. परंतु इतर भागांच्या मानाने आमचा गाव या बाबतीत फारच लवकर जागृत झाला. दुष्काळाची ही चाहूल आमच्या सुप्याला लागल्याबरोबर आम्ही काही सुपे ग्रामपंचायतीच्या सभासदांनी सर्व शेतकऱ्यांची बैठक घेण्याचा औपचारिक निर्णय घेतला. सदरहू सभेची प्रसिद्धी वृत्तपत्रांतून आणि गावातून करण्यात आली. पण प्रत्यक्षात सभास्थानी विपरीत दृश्य दिसून आले. अपेक्षा अशी होती की, शेतकरी मोठ्या प्रमाणावर सभेला येतील. परंतु दुष्काळाच्या या संकटाची जाणीव जितक्या तीव्रतेने लोकांना व्हावयास पाहिजे तेवढी झालेली दिसली नाही. असे का घडले ? थोडाफार कानोसा घेतला तेव्हा ध्यानात आले की, लोकांचा असल्या प्रयत्नांवर मुळी काडीचाही विश्वासच नव्हता. त्यातच आठ वर्षांच्या काळात साधारणत: सहा वर्षे तरी दुष्काळ आमच्या भागातील लोकांच्या पाचवीला पुजलेलाच.

पंचायतीचे शिपाई पिटाळून, इकडून तिकडून पन्नास–साठ माणसे जमा केली. आमच्यापैकी एकाने डोके चालवून मामलेदार आणि गटविकास अधिकारी सभेला मुद्दाम हजर राहणार असल्याची आवई उठवली. त्यामुळे पाच-दहा प्रतिष्ठितही बैठकीत सामील झाले. त्यातच सी. आय. डी. चा एक खास इसमही लेखणी सरसावून दाखल झाला. ‘ शिआयडी ’ आला असे म्हणताच पाच-दहा

माणसांनी काढता पाय घेतला. त्यांना "अहो, तो वृत्तपत्रांचा बातमीदार आहे!" अशी थाप मारल्यावर ही मंडळी थांबण्यास तयार झाली. सभेत गाव-कऱ्यांची एक दुष्काळ निवारण समिती स्थापन केली. या समितीने आपल्या भागात कोणती दुष्काळी कामे सुरू करावीत, याची यादी करून झगडावयाचे निश्चित केले.

तो प्रसंग आठवला म्हणजे अजूनही हसू येते. या समितीत एका प्रतिष्ठिताचे मुद्दाम नाव घातले होते. हे महाशय सभेला हजर नव्हते. दुसऱ्या दिवशी त्यांना "का हो, तुम्ही सभेला आला नाहीत ?" म्हणून चौकशी केली तर हे महाशय चिरडीलाच गेले आणि "तुमच्या दवंड्या–फिवंड्यांनी बैठकीला येणारे आम्ही आहोत काय ?" म्हणून जोरातच निघून गेले. मी स्वतःलाच विचारले की, "माझ्या बाळाची मुंजविज होती की काय ?"

या समितीच्या एक-दोन सभाही घेण्यात आल्या. पण त्यात दुष्काळाच्या कामाबरोबर अनेक बाबतींत उखाळ्या-पाखाळ्याही निघत. राजकारणातल्या दुगाण्याही एकमेकांवर झाडण्यात येत. या समितीजवळ ना कुठला फंड, ना गावातल्या तथाकथित प्रतिष्ठितांचा सक्रिय पाठिंबा. सारे आपले "तुम्ही करताय ना..." म्हणून कौतुक करीत तर कधी हेच शब्द उपेक्षेने उच्चारीत. कौतुकाने क्षणभर तोळाभर मांस चढे तर उपेक्षेने मनावर निराशेची जाड साय पसरत असे. पण त्यातूनच पुढे चार-सहा कार्यकर्त्यांच्या

धडपडीची सरकार-दरबारी, वृत्तपत्रांतून दखल घेतली जाऊ लागली.

बारामती तालुक्याला नेहमी ' जाडया आणि रडया ' बैलांची उपमा द्यावी, असा नेहमीच मला मोह होत असे. कारण, या तालुक्यातील ४०–४२ गावे जिराईत भागातली. सदैव दुष्काळाच्या भयाने धास्तावलेली. या उलट २०–२२ गावांची स्थिती. कॅनॉलमुळे द्राक्षे आणि उसाच्या जोरावर गबर आणि मगरूर झालेली. त्यांचे प्रश्न, आपसातील हेवेदावे यांचेच प्रदर्शन तालुक्यात नेहमी होत असे. दुष्काळी भागातील कार्यकर्ते हे या बागाईतभागातील कोणाच्या ना कोणाच्या सावलीत सावटलेल्या रोपांसारखे खुरडणारे. त्यातून कधी जिराईत भागांचा प्रश्न कोणी निर्माण केला तर त्यांचा आवाज नेहमीच दबलेला असावयाचा. दुष्काळी कामांचा बारामतीला विचार करण्यासाठी कलेक्टरांच्या झालेल्या सभेत याचेच दर्शन प्रभावीपणे झाले.

त्या दिवशी कलेक्टरांची सभा आटोपून एस्. टी. तून परत येत असताना अनेक प्रश्नांचा मनात गोंधळ उडाला होता. अन्नधान्याची परिस्थिती दिवसेंदिवस नाजूक होत होती. मजुरांना काम नव्हते. शेतकऱ्यांना सरकारी मदत नव्हती. बाजारात येणारे धान्य पुरत नव्हते. सगळ्याच बाजूंनी नकारघंटा मनाच्या गाभाऱ्यात घणघणत होत्या. आश्वासनांचे हवाले अनेक वेळा शासनाने जनतेला दिलेले. पण प्रत्यक्ष सारा कारभार " दे रे शंखोबा नि घे रे शंखोबा " या स्वरूपाचा. वर्षा-सहा महिन्यांनी एखादा मंत्री आला, की त्याच्यापुढे आम्ही आपला पाढा वाचावयाचा आणि त्याने लांबलचक व्याख्यान झोडून चालते व्हावयाचे. या परिस्थितीवर मात कशी करावयाची ? ही भोळीभाबडी दुष्काळग्रस्त जनता ताठ उभी राहील का ? तिची जोरदार संघटना निर्माण होईल का ? जनतेच्यासाठी तळमळीने भांडणारे चार-दोन कार्यकर्ते शेवटपर्यंत निःस्वार्थीपणाने टिकून राहतील का ? हा सगळा कारभार म्हणजे " दसकी लकडी एकका बोजा. " प्रश्न अनेक होते आणि त्यांची उत्तरे भविष्याच्या धुक्यात गुरफटून बसलेली होती.

एस्. टी. ची चाके उजाड माळरानातून गावाच्या दिशेने सुसाट पळत होती. मागे एकदा मी केलेल्या कवितेतील शब्द कानांच्या पडद्यांवर राहून राहून आदळत होते –

" या गावाच्या माळावरती
दगड नि गोटे सुस्त पहुडले
स्पर्श अजुनी त्यांना नाही.
श्रीरामाच्या पदकमलांचा. "

चहुबाजूंनी उडालेल्या एस्. टी. च्या धुळीमुळे मागे जाणारा रस्ता अधिकच भेसूर दिसत होता.

आमच्या गावाची रचनाही मोठी विचित्र आहे. बारामती तालुक्याच्या शिवेवरचे हे गाव १०–१२ मैलांच्या परिसरात अस्ताव्यस्त पसरलेले. त्यांच्या सीमांनी एका बाजूला पुरंदरच्या सीमांशी लगट केली आहे. तर दुसऱ्या बाजूला आपल्या दरिद्री संसाराची लक्तरे त्याने दौंडच्या वेशीला टांगली आहेत. गावची वसती सुमारे ८,०००. त्यातच ही वस्ती १२ वाड्यांमध्ये विखुरलेली. प्रत्येक वाडी म्हणजे एक लहानसे गावच होते. सगळ्या शिवारात जिराईताची सर्वत्र चलती. अधून मधून कच्ची पक्की २,००० एकरांची बागाईत. बहुतेक बागाईत पावसाळी, हिवाळी स्वरूपाची. वरुणराजाची कृपा झाली तर काळवटात ज्वारीच्या पोत्यांची थप्पी लागायची. पण १०-१२ वर्षांमध्ये असं साल एखादंच उगवावयाचं.

सुप्यापासून पाच मैलांवर पर्जन्यमापनाची सामुग्री मोरगावला आहे. पण तिथं कोणी हा पाऊस मोजण्याचा त्रासच घेत नाही. जुने, जाणते सांगतात की, या भागात जेव्हा फड्या निवडुंगाची बनं होती तेव्हा पाऊस खूप पडायचा. अर्थात खूप म्हणजे 'खूपच'. या 'खूप'चा अर्थ फार तर २०-२५ इंचांपर्यंत ताणता येईल. सध्या मात्र माझ्या अंदाजाप्रमाणे १३-१४ इंच पाऊस पडत असावा. निवडुंग जळाला आणि आणि आकाशाची मायाही जळाली.

आपल्या पानशेतचा नवा कॅनॉल सोलापूर, पुणे रोडच्या कडेने जातोना, त्याच्या आणि कऱ्हेच्या दुबेळक्यात हा दुष्काळी प्रदेश अजगरासारखा पसरला आहे. दरिद्री जनतेमुळे या भागातल्या सुधारणा लोकवर्गणीअभावी धूळ खात पडल्या आहेत. या भागात नाजऱ्याच्या धरणाचे पाणीही पोहोचत नाही. सगळाच हरीवर हवाला.

दिवस जात होते. लोकांना रेशनवर २०० ग्रॅम, २५० ग्रॅम धान्याचे वाटप होत होते. मग ही माणसे जगत कशी होती ? आमच्या भागातली नवजवान, तिशीतली पोरं सायकलींवर थडीखाली जाऊन, १५-२० मैलांवरून ज्वारीची आवक सायकलवर करायची. अशी पन्नास-साठ पोरं गावाला पोसायची. एका खेपेला पन्नास किलोंची बोचकी दणक्याला आणायची. असे ३-४ महिने चालू होते. त्यांतली काही पोरं आजारी पडली तर दोन-चार पोरांना क्षयाची बाधा झाली. तरी हा हा गावपोषणाचा 'धंदा' अखंड चालूच होता. कारण, त्यामुळे पोरांना आठवड्याला ३०-४० रुपयांची प्राप्ती होत होती. सरकार तर 'धान्य नाही,' म्हणून ठणाणा करीत होते. मग हे धान्य येत होते कोठून ? पोरं अजूनही सांगतात, एका धन्याकडे ज्वारीचा एवढा मोठा साठा होता, की पन्नास पोरांनी रोज ज्वारी वाहिली तरी वर्ष-सहा महिने सुप्यासारखी ३-४ गावे एकट्याने पोसली असती. मग या आगीत त्याने घरावर सोन्याची कौलेच घालावयाची बाकी ठेवले नाही तर आश्चर्य कसले ? त्यातच या भागातल्या हातांच्या बोटांवर मोजता येणाऱ्या मोठ्या बागाईतदारांचं 'खुरपं' चालूच होतं.

अशातच दिवाळी आली. घराघरांतून होळी पेटलेलीच होती. पोरासोरांसाठी

केलेल्या गोडधोड अन्नातला कण नरड्याखाली उतरत नव्हता. वाडीतुडीतली अनेक घरंदारं उजाड झाली होती. कोणी फॅक्टरीवर कामाला गेले होते तर कोणी पुणे-मिरज ब्रॉड गेज लाईनवरची वेठबिगारी खुशीने पत्करत होते. कारण तिथे मजुरी-बरोबर स्वस्त दरांत ज्वारीही मिळत होती. मग या परिस्थितीतून मार्ग कसा निघणार ? सरकारच्या उदासीनतेबद्दल येणाऱ्या त्वेषाच्या भावनेबरोबरच मनांच्या गाभाऱ्यातून शब्द घुमत होते—

" नको देवराया । अंत आता पाहू ।।
प्राण हा सर्वथा । जाऊ पाहे ।। "

वृत्तपत्रांतील प्रचार चालू होता. या कामी पुण्याच्या ' प्रभात 'चे बहुमोल साहाय्य झाले. बाकीच्यांनी थोडाफार हातभार लावला, पण या भागातली व्यथा आणि कथा चावडीवर टांगण्याचे काम फक्त ' प्रभात 'ने केले.

या सर्वांचा परिणाम म्हणून की काय अथवा शासनाच्या कुंभकर्णाला जाग आल्यामुळे म्हणा, एकदा सुपे येथील गोडाऊनमध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी ग्रामीण दुष्काळी भागातील जनतेशी चर्चा करण्यासाठी दिवस मुक्रर केला. सरकारी यंत्रणे-तला सारा बाजारबुणगा जागा झाला. मग शिपाई शिलेदार ' होशार ' मध्ये तयार न झाले तरच नवल.

त्या दिवशी सुप्याचे गोडाऊन ठासून भरले होते. प्रथम मामलेदार साहेबांनी नियोजित कार्यक्रमाची रूपरेषा समजावून सांगितली. आणि नंतर या भागातील गरजांची गाऱ्हाणी सामान्य माणसेही स्पष्टपणे बोलू लागली. काही भाबड्या शेत-कऱ्यांनी सरकारी कारभारातील अनेक उणिवांचा जाहीर पंचनामाही करण्यास मागेपुढे पाहिले नाही. दुष्काळी भागातील पाझर तलावांच्या योजनांची शिरगणती करण्यात आली. काही रस्ते सुचविण्यात आले. कलेक्टरसाहेबांनी साऱ्यांची अतिशय काळजीपूर्वक नोंद घेतली. लोकांच्या अंतःकरणाला त्यांच्या साऱ्या कार्यपद्धतीत एक प्रकारचा ओलावा जाणवला. तालुक्याच्या दुष्काळ निवारण समितीचे सदस्यत्व तालुका पंचायत सदस्यांपुरतेच मर्यादित न ठेवता ते सर्व पक्षी- यांना खुले करण्यात आले.

गावातील सात तलावांची कामे होणार, या कल्पनेवर कोणाचाच विश्वास बसत नव्हता. पण जिल्हाधिकाऱ्यांनी या सर्व तलावांची तांत्रिक पाहणी करण्याचे आश्वासन दिलेले. अगोदर ५-६ दिवस इंजिनियर फडक्यांनी या तलावांची थोडक्यात पाहणी केली होतीच. त्यातच जिल्हा परिषद अध्यक्ष शंकररावजी उरसळ यांनी, " मी याबाबत जातीने लक्ष घालून तांत्रिक कारणांवरून या योजना धूळ खात पडणार नाहीत, अशी तजवीज करीन, " असे जाहीर आश्वासन दिलेले.—अशा हवेत फक्त २४ तासच मंडळी तरंगत होती. आणि मग दुसऱ्या दिवशी तो प्रकार घडला.

मला वाटते त्या दिवशी १७ तारीख असेल. मी त्या दिवशी गावात नव्हतो.

एकीकडे पुण्याला वृत्तपत्रांत जिल्हाधिकाऱ्यांच्या सभेचे वृत्त आम्ही बातमीदारांना कौतुकाने पुरवीत होतो. आणि कोणा एका अॅडिशनल कलेक्टरची गाडी सुप्यात जिल्हाधिकाऱ्यांनी जनतेच्या मनात निर्माण झालेल्या आकांक्षांवर बोळा फिरविण्यासाठी वाट चालत होती. कुठलीही आगाऊ सूचना न देता हे महाशय गावच्या चावडीत दत्त म्हणून हजर झाले आणि जनता गमेळा करण्यास कोतवाल आणि तलाठी यांना वेठीला धरले. त्या दिवशी दुर्दैवाने आम्हा ५-६ कार्यकर्त्यांपैकी फारच थोडे गावात होते.

साहेबांनी प्रथमच "कुठाय दुष्काळ ?" म्हणून सूर लावला. या सभेतील पुढील प्रश्नोत्तरे सभेचे स्वरूप समजण्यास मदत करतील.

गावकरी : चाऱ्याअभावीं जनावरे मातिमोलाने यवतच्या गुरांच्या बाजारला जात आहेत.

**साहेब** : यवतचा बाजार गेली किती वर्षे भरतो ?

**गावकरी** : गेली अनेक वर्षे.

**साहेब** : मग आताच यवतच्या बाजारात गुरे विक्रीला जातात, ही तक्रार का ?

**गावकरी** : दुष्काळामुळे लोक गाव सोडून जाऊ लागले आहेत.

**साहेब** : कोणत्या वाडीचे लोक गेले आहेत ? हे जर खोटे ठरले तर कायदेशीर इलाज करू.

सगळी सभा चिडचिप्प झाली. साहेबांच्या या सगळ्या थयथयाटाला लोकांनी प्रत्युत्तरे का दिली नाहीत ? सभेचा वृत्तांत ऐकून माझं तर माथं भडकून गेलं. म्हणजे हा अधिकारी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रज्वलीत केलेल्या आशेच्या ज्योतीवर फुंकर घालण्यासाठीच आला होता काय ? की एकाने पाठीवरून हात फिरवावयाचा आणि दुसऱ्याने ससेहोलपट करावयाची ? हेच सरकारी धोरण होते काय ?

या तिरीमिरीतच मी बारामतीला मुद्दाम मामलेदारसाहेबांना भेटावयास गेलो. या साहेबांच्या सभेचे खरमरीत वृत्त वृत्तपत्रांत प्रसिद्ध करावयासाठी फार मोठी ओढ लागली होती. पण..... पण मामलेदारसाहेबांनी शंका काढली. कदाचित त्यामुळे या साहेबांच्या हातात असलेली आपली कामे अडकून राहावयाची. नसता अडसर लागून रहावयाचा म्हणून अक्कलहुशारीने आपल्या भावना आवरण्याचा सल्ला मामलेदारसाहेबांनी दिला. आणि का कोणास ठाऊक तो मानावा, असा मनाचा कल झाला.

सबंध बारामती तालुक्याच्या दुष्काळी भागात २५–३० तळ्यांची कामे करावयाचा मानस शासनाने जाहीर केला होता. या कामाचा सर्व्हे करण्यासाठी, प्लॅन आणि एस्टिमेटस् तयार करण्यासाठी जिल्हा परिषदेजवळ तंत्रज्ञ नव्हते. त्यातच बारामती तालुक्यातील सर्वच विकास कार्यांबद्दल प्रथमपासूनच जिल्हा परिषद

उदासीन. याची बीजे बारामती तालुक्यातील शासनकर्त्या पक्षामधील सुंदोपसुंदी-मध्ये रुजलेली. तेव्हा या तलावांचे तांत्रिक कार्य कोण पूर्ण करणार? शेवटी कर्मधर्मसंयोगाने पुणे येथील श्री. फडके यांनी ही कामगिरी मोठ्या उत्साहाने शिरावर घेतली. बारामती येथील एका इंजिनियरचेही या संदर्भात नाव ऐकावयाला मिळत होते. पण नुसते नावच शेवटपर्यंत ऐकले. पण या तरुण इंजिनियरने एक-दाही आपला चेहरा दुष्काळ निवारण समितीमध्ये दाखविला नाही. मग सर्व्हे करण्याची गोष्टच फार लांबची.

पुण्याचे इंजिनियर फडके हे वयाने वृद्ध गृहस्थ, पण त्यांचा उत्साह एखाद्या तरुणाला लाजवील असा. पहाटे पाच वाजताच उठून अभ्यंगस्नान करून स्वारी तयार. सात साडेसातला म्हातारा आपल्या उद्योगाला लागलेला असावयाचा. जवळ जवळ सहा महिन म्हाताऱ्याने या भागात उन्हातान्हांत कष्ट केले. मा. कलेक्टर साहेबांनी दीड टक्क्यावारी या कामांची तांत्रिक बाजू पूर्ण करावी म्हणून त्यांच्या गळयात हे काम अडकविले. एक महिन्याच्या आतच १९५२ च्या दुष्काळी पद्धतीने त्यांनी तळयांच्या खर्चाची अंदाजपत्रके (एस्टिमेटस्) तयार केली. आणि जवळ जवळ सात कामे पूर्ण केली. येथून पुढेच फडक्यांना सरकारी अधिकाऱ्यांनी दप्तर-दिरंगाईचा कचका दाखविण्यास सुरुवात केली.

ही सर्व तळयांची कामे डेक्कन इरिगेशन, सर्कल दोन, दौंड यांच्यावर सोप-विण्यात आली. पूर्वी त्यांनी केलेली सर्व कामे अपुरी रद्द करण्यात आली. म्हातारा पुन्हा आपल्या तरुण पोरांना हाताशी धरून कामाला लागला. जोडीला डेक्कन इरिगेशनचा एक कानडी ओव्हरसियरही घेतला. पंधरा पंधरा दिवस एकेका योजने-वर खपून प्लॅन्स आणि एस्टिमेटस तयार केली. फडक्यांचे जुने ऑस्टीनचे मॉडेल 'आज इथे तर उद्या तिथे' असे करीत तालुकाभर रखडत धावू लागले. पुन्हा पुणे, बारामती, दौंड या वाऱ्या सुरू झाल्या.

दिवस जात होते. रेशनला धान्य मिळत नव्हते. पाझर तलावांचे काम सुरू होत नव्हते. दुष्काळ निवारण समिती हे आमचे न्यायालय बनले होते. अनेक तक्रा-रींना वाचा फोडण्याची ती चावडी झाली होती. या चावडीवर ओरडा करून गावातील सुपे ते वढाणे व सुपे ते बाबूर्डी हे दोन रस्ते आम्ही पूर्ण करून घेतले होते. पण पाझर तलाव हा आमच्या कार्याचा ध्येयबिंदू होता. बंडींगची कामे नेहमीप्रमाणे चालूच होती. लोकांना काम मिळत होते. पण धान्य? ते उघड्या काळ्याबाजारात खरेदी करून पोटाची खळगी भरावी लागत होती. या भुकेच्या आगीत हुलगा, मटकी, मका इत्यादींचा स्वाहा होत होता. या सर्व परिस्थितीवर तोडगा म्हणून बारामती मामलेदार कचेरीवर मोर्चा नेण्याचे ठरविण्यात आले. दिवस ठरला. १० मार्चचा मुहूर्त मुक्रर करण्यात आला.

बारामती तालुक्यात सर्वत्र चर्चा सुरू झाली. बारामती, कारखेल आणि सुपे

# पहिली छावणी


दिवाळीच्या सुमुहूर्तावर
नूतन वर्षारंभदिनी
**'माणूस' प्रतिष्ठान**
आपल्या ग्रामीण विभागातील
जलनिर्माण कार्याचा
शुभारंभ करीत आहे.



पहिला प्रकल्प, पहिले शिबिर —
**मुक्काम सुपे**
— पुण्यापासून सुमारे ४० मैलांवर...

सुप्याचे काही तरुण सामाजिक कार्यकर्ते
'माणूस' दिवाळी अंकाची
संकल्पित विक्री पूर्ण करण्यासाठी
लवकरच प्रचारदौऱ्यावर निघत आहेत.

**का ? कशासाठी ?**



# 'माणूस' दिवाळी अंक

## किंमत सव्वा रुपया

## एक रुपया पंचवीस पैसे

यांपैकी **२५** पैसे

'माणूस प्रतिष्ठान'कडे जमा होणार आहेत—
—ज्यातून सुप्याच्या पहिल्या प्रकल्पासाठी
अवश्य तो द्रव्यनिधी उभा राहील !
या सुपे-योजनेसाठी गरज आहे
दहा ते बारा हजार रुपयांची !
अंकामागे २५ पैसे—
तर या पहिल्या प्रकल्पासाठी
'माणूस' दिवाळी अंकाच्या
किती प्रतींची विक्री होणे अवश्य आहे ?

## —गणित सोपे आहे.

आणि २५ पैसे 'माणूस प्रतिष्ठान'कडे गेल्यावर
उरलेल्या एक रुपया किंमतीत
केवढे भरघोस साहित्य
'माणूस' दिवाळी अंकासाठी योजले आहे ?



### 卐 दिल्लीतील मराठी नेतृत्वाचे अंतरंग

श्री. यशवंतराव चव्हाण, स. का. पाटील व स. गो. बर्वे
—दिल्लीतील या तीन बड्या मराठी नेत्यांच्या
सत्तास्पर्धेच्या राजकारणाचे अंतरंगदर्शन

### 卐 कश्मीर : हिरवी स्वप्ने-लाल छाया

मेनन-सादिक यांच्या मुलाखती व काश्मीर दौरा
यांवर आधारित खास पुरवणी

### 卐 असे पती, असा पिता

श्रीमती ललितादेवी यांनी लाल बहादूर शास्त्री
यांच्यासंबंधी 'माणूस'कडे
लिहून पाठविलेल्या काही आठवणी

गंगाधर गाडगीळ, ब. मो. पुरंदरे, जयवंत दळवी,
द. मा. मिरासदार— आघाडीच्या लेखकांचे साहित्य

## आणि....

आणि ...............

चंदेरी
दुनियेतील काही
अस्सल चिजा

# ऊषा नाडकर



रंगल्या रात्री अशा....

अधिक ओळख पुढील अंकी....

अपेक्षित मोठी मागणी अल्पावधीत पूर्ण करणे अवश्य असल्याने या 'माणूस' दिवाळी अंकांची छपाई विशेष मोठ्या आकारात

**रोटरी यंत्रावर**

केली जाईल.

येथे जाहीर सभा घेण्याचेही ठरले. बारामतीला डॉ. आढाव, वैद्य, किल्लेदार या तोफा डागल्या. सुप्याला एस. एम. च्या तळमळीच्या भाषणाने वैचारिक स्फोट झाला. पण सगळ्यांत लक्षात राहिली ती कारखेलची सभा. सभेला १०–२० माणसे बळेबळे गोळा करावी लागली. त्यातच फडक्यांचे तेथील तलाव मोजण्याचे काम चाललेले. गावातल्या काँग्रेसप्रेमी लोकांनी या सभेला गेलात,



श्री. फडके

मोर्चात गेलात तर तळ्याच्या कामाला नख लागेल म्हणून दम भरलेला. त्या मंडळींना कितीही समजावून सांगितले तरी आज आपले काय अडले आहे ? म्हणून गावकरी मख्खच विशेष म्हणजे या गावातूनच शे. का. पक्षाने जिल्हा बोर्डाला आपला उमेदवार निवडून आणलेला होता. ते पाटीलबुवा तर आमचे तोंडही पाहायला तयार नव्हते.

कारखेलहून परत येताना आणखी एक आठवण मनात घर करून राहिली आहे. सायकलवर पाच–दहा मैलांची रपेट करून येताना मी थकून एका झोपडीत शिरलो. तहानेने जीव व्याकुळ झाला होता. ऊन रणरणत होते. मनात कारखेलच्या एकंदर प्रकारामुळे उदासीनता दाटलेली होती. झोपडीत पाणी मागितले तर त्या भोळ्या माणसांनी चहाचे आधण ठेवले. झोपडीत एक तरणाबांड गडी, त्याची आई आणि पत्नी असा परिवार. एक ४-५ वर्षांची मुलगी चुरुचुरू बोलत असलेली. म्हातारीने तर कमालच केली. चार घास खाच, म्हणून आग्रह धरून बसली. माझ्या पोटात कावळे कोकलतच होते. पुढ्यात ताट ओढून घेतले. कसलीतरी वाटलेल्या पानांची हिरवीगार चटणी होती. सुनेला वाढावयाचे फर्मान सुटले. पोरगा जेवावयाचा होता. पण अजून 'वखुत' झाला नाही म्हणून आढ्याकडे पाहत मी दिलेल्या 'हत्ती' ची लज्जत चाखत बसलेला. सूनबाईने आपला चेहरा लपवीत टोपलीतल्या एकुलत्या एका भाकरीला ताटात टाकले. मी वर पाहिले. बिचारीचे डोळे भरून आले होते. म्हातारी मात्र आपण त्या गावचेच नाही अशा आविर्भावाने मी कुठला अधिकारी आहे म्हणून चौकशी करीत होती. मी समजावयाचे ते समजलो आणि त्यातली कोरभर भाकर नरड्याखाली ढकलून तिरीमिरीनेच सुप्याचा रस्ता धरला.

सुप्याची सभा म्हणजे आमचा सगळा 'एकपात्री प्रयोग.' स्टेजसाठी टिपाडे गोळा

करण्यापासून सारे एकटयानेच करावयाचे. बारामतीहून आलेल्या कानिटकरांनी थोडाफार हातभार लावला. गावचे सरपंच आमच्या पक्षाचे सदस्य. ते नेमके सभेच्या वेळी उगवले. पण एस. एम. च्या स्फूर्तिदायक भाषणाने सर्व श्रमांचा परिहार झाला. सभेला गर्दी सुप्याच्या मानाने चिक्कार. एखाद्या मंत्र्याच्या सभेला जमते तशी. पण सारी आपुलकीने आलेली.

बारामतीचा मोर्चा दोन-एक हजारांचा होईल अशी अपेक्षा पण प्रत्यक्षात हजार-बाराशे माणसे मोर्चात सामील झाली. त्यात शेतकरी अथवा दुष्काळग्रस्त फार तर सात-आठशे असतील. मोर्चाकडे पाहिल्यावर तो एखाद्या सुस्तावलेल्या ऐसपैस अजगरासारखा वाटत होता. त्यात जोष नव्हता. त्वेषही नव्हता. सारा प्रकार दौंड-बारामती लाईनच्या साईड ट्रेनसारखा.

मामलेदारांनी आमचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले. आमच्या विनंतीला मान देऊन मोर्चापुढे 'सरकारी पद्धती'चे भाषणही केले. आपल्या मागण्या 'वर' कळवितो, असे आश्वासन दिलेच पण हळूच या मोर्चामुळे पाझर तलावांच्या मागण्यांना जोर आल्याचे प्रांजलपणे कबूल केले.

बारामतीच्या मोर्चाचे अशा रीतीने सूप वाजलें. मला वाटते, एप्रिलमध्येच आठ किलो धान्य वाटावयास सुरुवात झाली. ही मोर्चाची फलश्रुती आहे, असा प्रचार करण्याची संधी मिळाली.

पाझर तलावांसाठी जिल्हाधिकाऱ्यांनी पैसे मामलेदारांकडे ताबडतोब वर्ग केले. मला वाटते, हेही मोर्चाचेच फलित असले पाहिजे. परंतु डेक्कन इरिगेशनच्या साहेबांची मान्यता न आल्याने काम अडून पडले. आमचे एक पंचायत सदस्य तर आठवड्यातून दोन–दोन चकरा दौंडला मारीत होते. दुष्काळ निवारण समितीच्या सभासदांची पाझर तलावाचे कामासाठी एक उपसमिती कोण्या एका काँग्रेस क्रियाशीलांच्या नेतृत्वाखाली नेमलेली होती. ती समिती कुठलीच 'क्रिया' करीत नव्हती. अशा अवस्थेत उन्हाळा सरत चालला होता. मग उन्हाळ्याच्या शेवटी काम सुरू होऊन, पुरे केव्हा होणार? माणसांना मजुरी कशी मिळणार?......असे अनेक प्रश्न होते. उत्तर एकच होते. लवकरात लवकर प्रत्यक्ष कामाला सुरुवात करणे. पण ज्याला ज्याला या प्रश्नांची माहिती होती ती ती सारी माणसे आपल्या सर्वांच्या वाटा आणि डोळे डेक्कन इरिगेशनकडे लागलेले असले पाहिजेत असा 'उपदेश' करीत होती.

आणि मग एके दिवशी ती भूमिपूजनाची वार्ता अचानक कानांवर आली. आमच्या परस्परच मुहूर्त ठरला होता. हाताच्या बोटांवर मोजता येणाऱ्या वरिष्ठांना आमंत्रणेसुद्धा पाठविण्याचे काम पंचायतीमार्फत सुरू करण्यात आले होते. अक्षय्यतृतीयेचा बेत योजलेला होता. इतके दिवस या पाझर तलावांसाठी कराव्या लागणाऱ्या कष्टांचे चीज झाले म्हणून आनंदाचा स्पर्श होत होता. परंतु हा समारंभ

आमच्या परस्पर ठरविण्यात आल्यामुळे कुठेतरी काही तरी सलत होते. ठसठसत होते. पुण्याच्या मेयरांना बोलाविण्याचा बेत ठरला. त्यांना आधी कल्पना दिलेली नव्हती. वेळ तर फक्त एकाच दिवसाचा राहिलेला. त्यातून मेयरसाहेब आले नाहीत तर दुसऱ्या कोण्या पुढाऱ्याला बोलावू असा विचार करून पुण्याला प्रस्थान केले. मेयरसाहेबांच्या नियोजित कार्यक्रमामुळे त्यांना येता येणे शक्यच नव्हते. मोठ्या मुष्किलीने आमदार बा. न. राजहंस यांनी सहकुटुंब येण्याचे मान्य केले. मोटार-सायकलवर धावत पळत परत गावी आलो तर दुसरेच नाटक रंगत चाललेले. आम्ही नेहमी काँग्रेसवाल्यांना डावलतो असला बिनबुडाचा आरोप जिल्हा परिषदेचे काँग्रेस सदस्यांनी केला. यातून मार्ग काढणे अर्थातच अवघड नव्हते. सुपे येथे दोन पाझर तलावांच्या कामांना मान्यता मिळाली होती. एकाचे भूमिपूजन त्यांनी करावे व एकाचे आम्ही करावे असे ठरले. अर्थातच हा सारा प्रकार हास्यास्पद होता हे सांगण्याची आवश्यकताच नाही.

भूमिपूजनाच्या कार्यक्रमांचे फलक गावातील चौका-चौकांत ठेवण्यात आले. काँग्रेसच्या शरद पवारांच्या नावाची ‘स्पेशल’ जाहिरात केली. परंतु भूमिपूजनाला त्यांच्यापैकी कोणीही आले नाही. उलट त्यांना घेऊन येण्यास गेलेले जि. प. सदस्य तिकडेच अडकून पडल्यामुळे भूमिपूजनाला येऊ शकले नाहीत. त्यानंतर चावडीवर सभा झाली. सभा कसली, बैठकच ती! शेतकऱ्यांनी आपल्या अनेक अडचणी राजहंसांच्या पुढे मोकळेपणाने सांगितल्या. आपल्या प्रयत्नांना शासनाचा दरवाजा ठोठाविण्यात काही यश येते आहे, असा एक नवा विश्वास त्यांच्यामध्ये निर्माण झाला होता.

या सभेच्या समाप्तीनंतर आठवड्याने गंमत झाली. आमच्या पक्षाच्या ‘आंदोलन’ साप्ताहिकात या भूमिपूजनाचा व सभेचा काही वृत्तांत छापून येईल, म्हणून मोठ्या अपेक्षेने अंक हातांत घेतला पण त्यात काही निराळीच टीका होती. अंकात राजहंसांनी तळ्याचे भूमिपूजन केले म्हणून त्यांवर पत्र लिहून ‘तात्त्विक’ टीका इंदूमती केळकर यांनी केली होती. पुढेही याच आशयाचे एक पत्र बार्शीच्या डॉ. वीणा सुराणा यांनीही ‘आंदोलन’मध्ये लिहिले. क्षणभर या लोकांच्यामध्ये निर्माण झालेल्या नव्या ‘पोथीनिष्ठ’पणाची कीव करावी की त्यांचा वेळीच निषेध करावा याचा संभ्रम पडला. हिंदूंच्या पद्धतीचे काहीही असले की, समाजवादी पक्षातील काही ठराविक मंडळींना त्यात कुठेतरी जातीयता दिसू लागते. पुराणप्रियतेचा वास येऊ लागतो. मशिदीत बसून केलेली भाषणे त्यांना पचतात. एवढेच नव्हे तर ‘शीर-खुर्मा’ सारखे समारंभ मात्र पक्षाच्या मंडळींनी इरीशिरीने पार पाडले की, त्यातून त्यांना बंधुभावाचा साक्षात्कार होऊ लागतो. मला तरी वाटते की भूमीच्या पूजेसारखी श्रेष्ठ पूजा जगाच्या संस्कृतीत दुसरी कोणतीच नाही. नाहीतरी ही मंडळी पक्ष पुढाऱ्यांच्या फोटोंची पूजा करीतच असतात की! पुरोगामित्वाची शेखी

मिरविण्यासाठी असले जाहीर शंका-प्रदर्शन खरेच आवश्यक आहे काय ? अनाठायी मुस्लीम प्रेमाचा नवा उमाळा निव्वळ पुरोगामीच नव्हे तर सर्वच समाजवादी चळवळीला निश्चित घातक ठरणारा आहे, असा माझा प्रामाणिक विश्वास आहे.

असा हा गेल्या वर्षाभरातील कामाचा चढउतारांनी भरलेला आराखडा आहे.

तगाईचे, बियाणांचे, दुष्काळी कामावरील मजुरीचे अनेक प्रश्न अद्यापही रेंगाळत आहेत. हे प्रश्न जरी क्षुल्लक वाटण्याचा संभव असला तरी ग्रामीण भागातील जनतेच्या भावी विकासांचा नांगर अनेक कामांतील सरकारी लाल फितीमुळे अडकून पडण्याचा फार मोठा संभव आहे.त्यांतच जीवनाच्या संग्रामात निव्वळ जगण्यासाठीच या मंडळींना एवढा प्रचंड संघर्ष करावा लागत आहे की त्यातून ही माणसे रस काढून फेकून दिलेल्या चोयटीसारखी होऊन पडली आहेत. त्यांच्या दु:खावर, खोलवर समाजजीवन पोखरून काढणाऱ्या दारिद्र्याच्या किडीवर तेवढीच रामबाण मात्रा योजिली गेली पाहिजे. त्यासाठी या रोग्यांविषयी सहानुभूती असलेल्या धन्वंतरीची फार मोठी गरज आहे.

गेली अनेक वर्षे शिवप्रभूंचा परगणा म्हणून ओळखला जाणारा हा भाग शापित भूभाग आहे, असे वाटावे इतके दुष्काळाचे थैमान इकडे चालू असते. ३०० वर्षांपूर्वी छत्रपतींच्या शासनाच्या आरंभालाही या भागांतील देशमुखांनी नव्या युगाची हाक कधी ऐकलीच नव्हती. स्वत: छत्रपतींना जातीने लक्ष घालून स्वराज्याला नख लावणाऱ्या या हरामखोरांचे पारिपत्य करावे लागले. शिवप्रभूंच्या या परगण्याला लोक आता ' हसबनीसांचे सुपे ' अशा नावाने ओळखू लागले आहेत. या भूमीत नवभारताच्या नव्या आकांक्षांचे पीक कसे बहरणार ? अजूनही, या वर्षीदेखील अद्याप पावसाने तोंड काळे केलेच आहे. पहाटेच्या प्रहरी बंडिंगच्या कामावर पोट जाळण्यासाठी जाणाऱ्या शेकडो मजुरांची रांग सहा-सहा मैल रान तुडवीत पळत असते. यांच्या उन्नतीसाठी जेवढे करावे तेवढे थोडेच आहे.

तालुक्याच्या दृष्टीने पाहिले तर सुप्याशिवाय बाकीच्या इतर भागांत दुष्काळी कामांचा खडखडाटच आहे. एका साध्या पत्रकाद्वारे रस्त्यांची कामे बंद करून टाकली गेली. नोकरशाहीच्या या निर्णयामागच्या व्यवहारदक्षतेची तारीफ करावी, की तिच्या व्यवहारशून्यतेची कीव करावी ? तालुक्यातल्या इतर दहा तलावांचे प्लॅन्स् व एस्टिमेटस् फडक्यांनी पूर्ण केल्यावर फडक्यांना 'पुढची कामे बंद ठेवा ' असा सक्त हुकूम ! त्यातच त्यांच्या कष्टांचा दामही अजून शासनाकडे रखडत पडला आहे. दर दुष्काळी मिटिंगला आम्ही ' त्यांना झालेल्या कामाचे पैसे ताबडतोब द्यावेत ' असा ठराव करावयाचा आणि तो मामलेदारांनी दफ्तरी दाखल करवयाचा. याचा समग्र विचार कोण करणार ? तालुक्याच्या दुष्काळी भागांच्या विकासाचा पाच वर्षांचा आराखडा करा म्हटले, तरी निवडणुकीवर डोळे ठेवून तुमची ही सारी धडपड आहे, असा शासनकर्त्यांचा आरोप ठेवलेलाच. पण तो उद्देश आम्हांस चिकटविला तरी मूळ मागणीचे मोल कमी होते काय ? ● ● ●

*अंकारा येथील जर्मन वकि लातीत सिसेरोकडून दोस्तांच्य हालचालींची वित्तंबातमी कळ होती. परंतु परराष्ट्र मं रिबेन्ट्रॉप, जनरल काल्टेन, पॅपे वगैरे सत्तास्पर्धा खेळणाऱ्य मूर्ख अधिकाऱ्यांमुळे जर्मनीच्य मृत्युघंटेचा हा आवाजही मुक ठरला. बर्लिनच्या शंकेखो प्रश्नांच्या सरबत्तीमुळे मी अगद भंडावून गेलो. सिसेरोच व्यक्तिगत माहिती त्यांना हव होती. ब्रिटिशद्वेष्टा सिसेरो त्या बाबत अक्षरही बोलत नसे काळ पुढे धावत होता. जर्म नींच्या क्षितिजावर काळे ढ गर्दी करू लागले होते.*

*आता सिसेरोने गुप्त फिल्म रोलबरोबर ब्रिटिश वकिलाती तील तिजोरींच्या चावींचे ठर आणले होते.*




**एल्. सी. मोझिस**

अनुवाद : **अशोक खरे**

लेखांक : **चवथा**

काळ्याकुट्ट अंधारातील एका अज्ञात मोटारीने केलेला पाठलाग अजूनही माझ्या अंगावर शहारे आणतो. 'ऑपरेशन सिसेरो'ची चाहूल कोणाला तरी लागली यात शंकाच नाही. विचार करण्यात रात्रीच्या रात्री घालवल्या तरी पाठलाग

करणारी व्यक्ती कोण, हे समजले नाही. पण या घटनेनंतरही अनेक आठवडे सिसेरा आपले काम व्यवस्थितपणे करीत होता. त्यावर ब्रिटिशांना तरी सिसेरोच्या फितुरीची अजूनही कल्पना नव्हती.

तो पाठलाग करणारा इसम कोण याचे कोडे थोडक्याच दिवसांत उलगडले एकदा मी जेंकेच्या घरी गेलो होतो. तेथेच एका टर्किश सद्गृहस्थाने मला गाठले व म्हटले,

"हॅल्लो मोझिस, त्या रात्री चालला होतास कुठे इतक्या घाईने? फारच बेदर-कार बुवा तू. अरे, रात्रीच्या वेळी तरी निदान जरा काळजी घे." ती मोटार एका टर्किश पोलीस अधिकाऱ्याची होती.

त्या पाठलाग घटनेचा सिसेरोवर काहीच परिणाम झालेला दिसला नाही. कारण, आजच त्याने फोन करून भेटीस बोलावले. त्याला घेऊन मी मित्राच्या खोलीवर घेऊन गेलो. स्वारी आज बरीच खुशीत होती. सॅन्डविचेस् व सिगरेट्स यांवर तो अगदी आडवा हात मारत होता. मध्येच गाणे गुणगुणे. त्याच्या त्या निष्काळजी व रंगेल मुद्रेवर काव्यमय भाव तरंगलेले पाहून मला तो सिसेरो नसून दुसरीच व्यक्ती असावी असे वाटले. तो गात होता, हृदयाची तार छेडत होता. रात-किड्यांचा किर्र्रर असा आवाज व घोंगावणारा वारा यांमुळे सिसेरोला साथ मिळत होती. संगीताने त्याला उंच उंच नेले. तो अंतराळात तरंगू लागला व त्याच वेळी मी त्याला सांगितले, "यापुढे फिल्म्सचा दर १५,००० पौंडांऐवजी १०,००० पौंड करावा, असा बर्लिनचा आदेश आहे." त्याने त्यास चटकन् मान्यता दिली. माझा कार्यभाग साधला होता.

दोन-तीन दिवस झाले. पुन्हा सिसेरोने एक फिल्म आणून दिली. अनेक कटकटींचे मूळ ठरलेली हीच ती फिल्म. मी ती विकसित केली. त्यावर दोन बोटांचे ठसे दिसत होते. सिसेरो जी आंगठी वापरत असे, त्या आंगठीचाही ठसा फिल्मवर आला होता. सिसेरो फोटो कसा घेई हा वादाचा विषय आहे. तो अनेकदा सांगे की तो एका हातात कॅमेरा धरी व दुसऱ्या हातात कागदपत्र घेऊन त्यांचे फोटो काढी. परंतु हे अशक्य वाटते. त्याने दिलेले फोटो अगदी खरे होते, पण ते फोटो तो मदत-निसाबरोबर काढीत असावा.

बर्लिनला हे समजले तेव्हा जर्मनांनी शत्रूवर इतक्या प्रचंड गोळ्या झाडल्या नस-तील तितक्या प्रचंड प्रश्नांचा मजवर भडिमार केला. त्या प्रश्नांच्या उत्तरासाठी मला सिसेरोस ऑफिसात बोलवणे भाग पडले. तत्पूर्वी बर्लिनमधील काही सुपीक मेंदूतून एक अभिनव युक्ती जन्मास आली. इंग्लिश व फ्रेंच भाषा जाणणाऱ्या एका फोटो-ग्राफीतील तज्ज्ञाला बर्लिनने मायक्रोफोनसकट अंकाराला पाठविले. त्याने एका मोठी प्रश्नमालिका आणली होती. शाळा सोडल्यावर 'काल्टेन्‌गुरुजीं'मुळे एवढे जबर पाठांतर मला करावे लागले.

सिसेरोला ऑफिसात बोलावले व मी अनेक प्रश्न विचारून त्याला भंडावून

सोडले. तो तज्ज्ञ शेजारच्या खोलीत बसून सर्वकाही ऐकत होता. ही उलटतपासणी संपल्यावर त्या तज्ज्ञाने आपले मत व्यक्त केले. तो म्हणाला, " त्याने दिलेली उत्तरे विचारात घेता तो हे फोटो मदतनिसाबरोबर काढतो यात शंकाच नाही. परंतु त्याचे फोटोग्राफीचे ज्ञान लक्षात घेता ही गोष्ट अगदी शंभर टक्के अशक्य नाही. एवढे मात्र निश्चित की, ज्या फोटोवर बोटांचे ठसे आहेत त्याबाबत त्याने चक्क थाप मारली."

तो तज्ज्ञ बर्लिनला निघून गेला व संपली एकदाची ती कटकट.

- अजूनही वादळी डिसेंबर महिना संपला नव्हता. याच्यानंतरची डोकेदुखी खुद्द आमच्या वकिलानेच निर्मिली.

ख्रिसमसच्या अगोदर काही दिवस सिसेरोने जे फोटो आणून दिले त्यांत वायुदल, हवाईदल, भूदल यांत छुपे ब्रिटिश हस्तक घुसवण्यास टर्कीने संमती दिली होती. घुसखोरांची संख्या अतर्क्य होती. फार प्रचंड होती. त्यामुळे मी काल्टेनच्या आज्ञा धुडकावून ती माहिती पॅपेनला दिली.

अँग्लो-टर्किश वाटाघाटींची परिणती कोणत्या थराला पोचली आहे व तिकडचे मूर्ख नेते याची काहीच दखल घेत नाहीत, म्हणून पॅपेनला फार राग आला. या रागाच्या झटक्यातच त्याने टर्किश परराष्ट्रमंत्री न्यूमेन याची भेट घेतली.

पॅपेनने न्यूमेनला स्पष्टच सांगितले की, " तुमची कल्पना असेल की, ब्रिटिशां-बरोबरच्या तुमच्या वाटाघाटींची आम्हांला काहीच माहिती नसेल तर ती अत्यंत चुकीची समजूत आहे. तुम्ही स्वप्नसृष्टीत आहात."

न्यूमेनही बारा गावचे पाणी प्यालेला. त्याने चक्क सांगितले, " तुमचा काहीतरी गैरसमज होतोय. आमच्या व त्यांच्या वाटाघाटी झाल्या परंतु त्यांस इतके महत्त्व देऊ नका."

पॅपेनची अशा रीतीने बोळवण झाली व न्यूमेनने ब्रिटिश वकिलाला बोलावले आणि पॅपेनने उच्चारलेला प्रत्येक शब्द सांगितला. ब्रिटिश वकिलातीत कुठेतरी उच्च पातळीवर फितुरी झाल्याशिवाय जर्मनांना इतकी अचूक माहिती मिळणे शक्य नाही, याबाबत दोघांचे एकमत झाले.

ताबडतोब ब्रिटिश वकील सर ह्यूजने ब्रिटिश परराष्ट्रमंत्र्याला धोक्याचा लाल कंदील दाखवला. ही घटना त्याला सविस्तरपणे कळवली.

पुरे तीस तासही झाले नाहीत पॅपेन-न्यूमेन भेटीला व आता मी ब्रिटिश वकिलाने लंडनला जो संदेश दिला त्याचे फोटो पाहत होतो. अलीकडे सिसेरोच्या कार्यक्षमतेने उच्चांक गाठला होता. ती फिल्म मी बर्लिनला पाठवली. काल्टेनच्या अंगाची आता लाही होईल; कारण पॅपेनला अवाक्षरही कळता कामा नये, असा त्याचा स्पष्ट आदेश होता. ती फिल्म पाठवली व मला मृत्यूचे वॉरंट काढल्याचा भास झाला.

इकडे सिसेरो चांगलाच गोत्यात आला होता. ब्रिटिशांना एकंदर घटनांची चाहूल

लागली होती. पण नवल म्हणजे सिसेरोच्या हे गावीही नव्हते. पॅपेनच्या त्या चुकीने 'ऑपरेशन सिसेरो'वर किती खोलवर परिणाम झाला, हे सांगता येत नाही. ब्रिटिश हेरखात्याची चक्रे फिरू लागली. त्यांनी माझी दुय्यम सेक्रेटरी एलिझा हिलाच फोडली. परंतु त्या घटनेस वेळ आहे अजून.

डिसेंबरच्या मध्यावर आमचा वृत्तपत्र प्रवक्ता मिस्टर सेलर काही कामानिमित्त सोफियास गेला होता. त्याच वेळी सोफियावर अमेरिकनांचे भयानक हवाई हल्ले होत होते. काही कामानिमित्त तो जर्मन वकिलातीत गेला असता सेलरची व एलिझाची भेट झाली. तिचा बाप जर्मन वकिलातीत फार उच्च जागेवर होता. एलिझाही तिथेच थोडे काम करी. तिला हवाई हल्ल्याचे फार भय वाटे. ती मनाने इतकी खचली होती, की तिच्या वडिलांनी अंकारात तिच्यासाठी एखादी नोकरी मिळविण्यासाठी सेलरला विनंती केली.

## एलिझा–प्रवेश

माझे काम हल्ली फार वाढले होते त्यामुळे मलाही दुय्यम सेक्रेटरीची आवश्यकता होती. सेलरने तिच्यासाठी माझ्याकडे शिफारस केली. एलिझाच्या मासिक दौर्बल्याबाबत वाटणारी सहानुभूती व एलिझाच्या वडिलांबद्दल वाटणारा आदर, यामुळे पॅपेननेही या गोष्टीस मान्यता दिली. काल्टेनला हे समजले. त्याने लागलीच एका लाळघोट्यास माझा सेक्रेटरी म्हणून धाडले. अर्थात् त्या लाळघोट्यास ताबडतोब हाकलून दिले.

एलिझाचे पहिल्यांदा ऑफिसात पाऊल पडले जानेवारीच्या सुरुवातीस. तिचे प्रथमदर्शनी व्यक्तिमत्त्व दहशत बसविणारे होते. कदाचित् ते बऱ्याच प्रवासामुळे असेल, अशी मी माझी समजूत केली. इतकी तरुण मुलगी आकर्षक पोषाख करण्याऐवजी गबाळ्यासारखी राहते हे फारच आश्चर्यकारक होते. त्याचे माझ्या पत्नीलाही नवल वाटले. तिला आमच्या न्हाणीघरात स्नान करण्यास सांगितले, पण तिने त्यास स्पष्ट नकार दिला. इतकेच नव्हे तर हात न धुताच ती जेवावयास खुर्चीवर बसली. जेवणाच्या वेळी मूर्खासारखी बडबडत होती. एलिझा म्हणजे गूढ व्यक्ती एवढे खास.

सेलरला तिची वागणूक समजताच त्याला फारच आश्चर्य वाटले. कारण, सोफियात ती अशी कधीच वागली नव्हती. एलिझाने एकच दिवस काम केले असेल ऑफिसात, तोच ती आजारी पडली. तिचे तोंड सुजले होते. आम्ही डॉक्टरला बोलावले, पण त्या मूर्ख मुलीने औषधास नकार दिला. माझ्या पत्नीने तिची लाख वेळा समजूत काढली, पण पालथ्या घड्यावर पाणी.

सुमारे आठवड्यानंतर ती कामावर आली. सुरुवातीला तिला मी भाषांतरासारखे अगदी सोपे काम दिले. भाषेत ज्या मुलीने प्रावीण्य-पदके मिळवली, तिच्या कामात इतक्या असंख्य चुका पाहून मी संतापलो. माझी खात्री झाली की ही मदत-

नीस नसून फार मोठी कटकट ठरणार आहे. आलिया मोगासी. तरीही मी तिचा जास्तीत जास्त उपयोग करण्याचे ठरवले. आता तिला मी विशेष खाजगी कामे देऊ लागलो. जेणकरून तिची आवड वाढावी. माझा तिच्यावर विश्वास आहे, असे वाटावे म्हणून मी फार काळजी घेतली. परंतु तिने कामात कधीच रस घेतला नाही. तसेच जरूर म्हातारीही विशीची तरुणी दिसेल अशी सौंदर्यप्रसाधने तिच्यासाठी आणवली तरी तिचा गबाळेपणा बदलला नाही. मी जास्तच हट्टास पेटलो, तेव्हा तिने आततायीपणाचे दुसरे टोक गाठले. तिने एकदम नटवेपणात जास्त वेळ घालवण्यास सुरुवात केली. एक दिवस एलिझाचे जर्मन सैन्यातून पळून गेलेल्या देशद्रोह्यांबरोबर काही तरी संधान आहे अशी बातमी मला लागली. पण तिने ते प्रियकर असल्याचे भासवले व मीही जास्त लक्ष दिले नाही. तिच्या खाजगी आयुष्यात शिरणे माझे काम नाही, असाच मी विचार केला. अर्थात् या माझ्या निष्काळजीपणाचा परिणाम फार गंभीर झाला.

हल्ली हल्ली ती फारच स्वैरपणे वागत होती. ऑफिसातही एखाद्याच्या भावना उद्दीपित व्हाव्यात अशी ती बसे. कधी मांडया उघडया टाकी तर कधी कधी अतिशय घट्ट असा फ्रॉक घाली. याबाबत एकदा स्पष्ट जाणीव दिली; अर्थात् माझ्याही मनात खळबळ उडालीच. शांतपणे मी तिच्याजवळ गेलो व तिने वर खेचलेला स्कर्ट व्यवस्थित केला. मला वाटते या वेळी तिचा अपेक्षाभंग झाला. तिने माझ्याकडे एक तुच्छतेचा कटाक्ष टाकला व फणकाऱ्यात ऑफिसातून निघून गेली.

## खलनायिका एलिझा

बर्लिनमध्ये तयार झालेल्या चाव्या ब्रिटिश वकिलाच्या तिजोरीस व्यवस्थित लागल्या. सिसेरो आता वरिष्ठ अधिकारी बाहेर गेले की त्यांचे काम करी. या नवीन चाव्या वापरून त्याने नंतर अनेक गुपिते आणली. पण ती इतकी महत्त्वाची नव्हती. कारण ब्रिटिश पूर्णपणे जागरूक होते. फितुरी ब्रिटिश वकिलातीतच आहे एवढे त्यांना समजले होते.

जानेवारीच्या मध्यानंतर लंडनहून एकाएकी अंकारात निरनिराळे मुत्सद्दी येऊ लागले. अर्थात्च ते संरक्षणाच्या व्यवस्थेसाठी आले होते. ब्रिटिश वकिलातीतील सर्व तिजोऱ्यांना आता विशिष्ट प्रकारच्या गजराची सोय केली गेली होती.

आता मात्र सिसेरोचे दिवस भरलेच. कोणताही शहाणा माणूस मिळालेल्या पैशावर समाधान मानता. पण त्या अघाशी माणसाला समाधान कोणते ?

'ऑपरेशन सिसेरो'त सर्वाधिक महत्त्वाचा दिवस १४ जानेवारी १९४४ चा. बर्लिनच्या अमानुष नेत्यांची सिसेरोच्या फिल्म्सबाबत असलेली शंका आता पूर्णपणे फिटणार होती.

तेहरानला दोस्तांची जी बैठक झाली तीत रुमानिया, हंगेरी, बल्गेरिया या जर्मनीच्या बाल्कन देशांवर जोरदार हवाई हल्ले करायचे व पहिला हल्ला

१४ जानेवारीस सोफियावर करायचा. सिसेरोचे आम्ही आभार मानतो; कारण याच हल्ल्याची बातमी केवळ त्याच्यामुळे आम्हांला डिसेंबरातच समजली.

१४ जानेवारीचा दिवस उजाडला. सकाळपासून मी अस्वस्थ होतो. टेलिफोनवरून सोफियाशी संधान बांधण्याचा यत्न केला. परंतु टेलिफोनच्या तारा तुटल्या होत्या. काहीच बातमी न समजल्यामुळे काही सुचत नव्हते.

१५ जानेवारीस सकाळी उठलो तो दोस्तांनी सोफियावर केलेल्या हवाई हल्ल्याच्या बातमीने. ४००० बल्गेरियनांची हत्या झाली होती. या ४००० च्या नरबलीने मला वाटते, रिबेन्ट्रॉप व काल्टेन् ब्रुनर आदी खाटकांचा आत्मा आता शांत झाला असेल. त्या निरपराध बालकांनी आक्रंदनाने सिसेरोस परीक्षेत उत्तीर्ण केले.

फेब्रुवारीपासून सिसेरो पुनश्च आपल्या कार्यात मग्न झाला. मध्यंतरीचे दोन आठवडे तो काहीच करू शकला नाही. एक दिवस तो म्हणाला, "इतके दिवस मी नवीनच बसवलेल्या सुरक्षा यंत्राचे निरीक्षण करीत होतो. एक दिवस वकीलसाहेब व एक अधिकारी याबाबत बोलत बसले होते. तो अधिकारी वकीलसाहेबांना यंत्राचे कार्य समजावून देत होता आणि शेजारच्या खोलीत बसून सर्व काही मी समजावून घेतले. एक दिवस वकीलसाहेबांची तिजोरी उघडेना. शेवटी लंडनहून खास तज्ज्ञ मागवला. तो तज्ज्ञ ती तिजोरी दुरुस्त करीत असता सुदैवाने मीही तिथेच होतो. त्यामुळे तिजोरी कशी उघडायची व बंद करायची हे मला समजले."

मला तर ही दंतकथाच वाटली. सिसेरोला तिथे हजर राहता येणे शक्यच नाही. ब्रिटिश एवढे मूर्ख नाहीत. त्यांची हेर संघटना फार उच्च दर्जाची आहे. सिसेरो पुढे म्हणाला, "त्यांनी सध्या इन्फ्रारेड, इलेक्ट्रो मॅग्नेटिक आदी पद्धतींचा उपयोग केला आहे. त्यामुळे धोका वाढला आहे." तो हे ठासून ठासून सांगत होता. हेतू हा की फिल्मच्या रोलची किंमत वाढवता यावी; अर्थात् मी त्याला विरोध केला.

एक दिवस सिसेरोने मला मोठा रोल आणून दिला. तो मी डेव्हलप् केला आणि पाहतो तो काय ब्रिटिश वकिलातीतील जमाखर्चाची माहिती होती ती. आम्हांला काय करायचे आहे त्यांच्या जमाखर्चाशी. सिसेरोचे राजकारण होते त्याच्यामागे. त्याला वाटले कोणतीही फिल्म् आणली तरी १०,००० पौंडांना मरण नाही. सिसेरो आता पैशाच्या मागे आहे यात शंकाच नाही.

१०,००० पौंड देण्यापूर्वी मी ही गोष्ट बर्लिनला कळवली. कारण त्यांच्या फुकटच्या शिव्या खाणार कोण ! बर्लिनचे उत्तर फारच मजेदार व आश्चर्यकारक होते. "सिसेरोस १०,००० पौंड तत्काळ द्यावेत. फिल्म फारच महत्त्वाची आहे."

त्याप्रमाणे मी सिसेरोस पैसे दिले. तेव्हा तो दात विचकून हसला. खांदे उडवून तो म्हणाला, "यानंतर मात्र मी उच्चतम गुपित, उच्च गुपित वा गुपित अशाच प्रकारच्या फिल्म्स आणीन." तरतमभाव समजण्याएवढा तो इंग्रजीचा जाणकार होता.

आतापर्यंत सिसेरो भानगडीने मी थकून गेलो होतो. हवापालट करण्यासाठी

म्हणून मी जानेवारीच्या शेवटी ब्रुसा येथे गेलो.

या शहराचे सौंदर्य काय वर्णावे ? ती कारंजी, त्यांना भेदून जाणाऱ्या सूर्यकिरणांनी वातावरणात निर्मिलेल्या इंद्रधनुच्या छटा हे पाहून असे वाटे की, एखादी सुंदर युवती नटत आहे. बाहेर तिच्या सख्या वाट पाहत आहेत. त्यामुळे घाईघाईत तिच्या गळयातील मोत्याची माळ तुटून सर्वत्र विखुरली गेली आहे. परंतु या सौंदर्याचा आस्वाद घेणे माझ्या नशिबी नव्हते.

दोन दिवस झाले असतील ब्रुसाला येऊन. मला इस्तंबूलच्या वकिलातीतून एक अधिकारी फितुर झाला असल्याची बातमी लागली. इस्तंबूलच्या वकिलातीचा वरिष्ठ अधिकारी माझा चांगला दोस्त. त्यामुळे अत्यंत दुःखद मनःस्थितीत मला अंकाराला परतावे लागले. तो फितुर अधिकारी बायकोच्या ताटाखालचे मांजर होते, पण जाता जाता आमच्या शत्रूला उपयोगी अशी माहिती तो घेऊन गेला. हे त्याला शक्य झाले. कारण हेर खात्यात तो एक उच्च अधिकारी होता.

## बर्लिनचा आडमुठेपणा

असेच काही दिवस गेले व पुन्हा फितुरीच्या बातम्या आल्या. एलिझाने असल्या माणसांवर भयानक टीकास्त्र सोडले. ती म्हणाली, " जर्मनीच्या जीवनमरणाचा लढा चालू असताना हे लोक असे कृत्य करण्यास धजावतात तरी कसे ? "

एलिझाच्या या आवेशपूर्ण वक्तव्याने मी तोंडात बोट घातले. कशातही रस न घेणाऱ्या एलिझात झालेला हा बदल मला फार आवडला. आता ती बडबड करू लागली. तिने मला आघाडीवर लढणाऱ्या तिच्या दोन भावांची माहिती सांगितली.

" प्रत्येक अंतर्गत आघाडीवर आपण परिश्रम केले पाहिजेत. पिछाडी मजबूत तर आघाडी शाबूत. फ्यूरर व पितृभूसाठी जे नवजवान आपल्या हातावर शिरकमले घेऊन लढत आहेत. त्यांना मदत करणे आपले परमकर्तव्य आहे. त्यांचे ते बलिदान व्यर्थ न हो. " ती हातवारे करून बडबडत होती. तिचे हे भाषण आमचा प्रचारयोद्धा डॉ. गोबेल्स याला फार आवडले असते. आता एलिझाच्या डोळयांत बावळटपणाची, मंदपणाची झाक नव्हती तर रणमर्दिनीची चमक होती. आता ती माझ्या घरी वरचेवर येऊ लागली. मला वाटले पोरगी सुधारली.

एकदा आम्ही ऑफिसात दोघेच बसलो होतो. मी तिला भाषांतराचे नेहमीचे काम दिले. एकाएकी ती उठली व म्हणाली,

" साहेब, जर्मनी युद्ध जिंकेल असे तुम्हांला अजूनही वाटते काय ?"

" अर्थात्. " काहीशा त्रासिकपणे मी उत्तर दिले.

" मला नाही वाटत. कारण, सर्व आघाडयांवर दैवाचे फासे उलटे पडत आहेत. "

माझी तंद्री भंगली. मी तिच्याकडे निरखून पाहू लागलो.

" होय. असे आहे खरे. तत्त्वतः अमेरिकन रणसाहित्य व रशियन मनुष्यबळ यांच्यापुढे आम्ही युद्ध हरलो आहोत. आता फक्त दोनच आघाडया शिल्लक.

लष्करी मुत्सद्यांचे मेंदू व राजकारण्यांचे मेंदू. पण तरीही विजयी आम्हीच होऊ."

"आणि त्यातही हरलो तर काही सुटकेचा मार्ग ?"

"फार बिकट अवस्था आहे. आपण खोल दरीकडे वेगाने निघालेल्या गाडीत बसलो आहोत. गाडीतून उडी मारल्यावरही भीतीच."

"ती गाडी थांबवण्याचा प्रयत्न केला तर ?"

"ही गाडी नसून जगन्नाथाचा रथ आहे. चालू झालेला रथ थांबतो अनेकांचे बळी घेऊन. पण तसे असले तरी इतर हजारो लोक मृत्युमुखी पडत असता मी सुटकेचा मार्ग माहीत असूनही चोखाळणार नाही."

उत्तर विशेष चांगले नव्हते. पण त्याने संभाषण मात्र थांबले. एलिझा पुन्हा टेबलाकडे गेली. मी तिच्याकडे अर्थपूर्ण नजरेने पाहत होतो. ती पटकन् वळली व तिने विचारले,

"इस्तंबूलच्या फितुरीबद्दल तुम्हांला काय वाटते ?"

"ते भ्याडपणाचे लक्षण आहे. बरं, भ्याडपणात जरा डोके वापरायचे ! त्यांच्यापेक्षा मी शत्रूला जास्त किंमत देतो. त्यांच्या हेतूंबद्दल मला काही माहीत नाही. या फितुरांच्या मागे कोणती कारणपरंपरा आहे, त्याचा बर्लिनने अजूनही विचार केलेला नाही."

एलिझा विचारचक्रात मग्न होती. अजूनही तिच्या वागणुकीला कशी कलाटणी मिळेल, हे सांगणे अत्यंत कठीण. कधीकधी तर सबंध दिवस रडण्यातच घालवी तर कधीकधी अत्यंत आनंदी. आणि यांतच माझे दुर्दैव असे की, कधीही आजारी न पडणारी मिसेस् स्नुर्शेन आजारी पडली. त्याचे तिलाही फार वाईट वाटले. मला कबूल केले पाहिजे की स्नुर्शेनच्या अनुपस्थितीत एलिझाने जबाबदारी चांगल्या प्रकारे सांभाळली.

एक दिवस एलिझाने रात्री काम करण्याबद्दल मला विचारले. मीही फार थकलो होतो. तिला ऑफिसच्या व तिजोरीच्या चाव्या दिल्या आणि मी घरी आलो. कितीही प्रयत्न केला तरी झोप लागेना. बिछान्यावर तळमळत होतो मी. डोळे मिटताच तिजोरीतील फोटो चोरीला गेल्याचा भास होई. मी ताड्कन उठलो व ऑफिसात आलो. ऑफिसात अजूनही दिवा जळत होता.

मी खोलीत घुसलो. ती अजूनही टंकलेखन करीत होती.

"एलिझा, अशा रात्रीचे वेळी तुझ्यासारख्या तरुणीने झोपणे हिताचे आहे. काम झाले नसल्यास हरकत नाही, उद्याची सकाळ आहेच की."

"पण मला रात्री काम करणे आवडते. मी जरासुद्धा थकलेली नाही."

मला वाद घालायचा नव्हता. मी तिच्याकडे चावी मागितली. तिच्या हातांतून मी ती हिसकावलीच.

"अजूनही माझ्यावर विश्वास नाही तुमचा ? स्नुर्शेनला तर तुम्ही नेहमी चावी

देता " तिच्या डोळ्यांतून दोन अश्रूबिंदू खाली घसरले. काही न बोलता आम्ही बाहेर आलो. तिला घरी पोचवण्याची मी तयारी दर्शवली. परंतु त्यास तिने नकार दिला.

नंतर काही दिवस विशेष असे काहीच घडले नाही. परंतु एक दिवस दुपारच्या जेवणाच्या वेळी तिने दोन पत्र मजकडे आणली व मला वाचावयास सांगितले. ती चांगलीच आनंदात होती. जी पत्रे माझी नाहीत, ती मी कशास वाचू ? परंतु एलिझाची मनोव्यथा जाणून नाखुशीनेच ती पत्रे वाचली. ती पत्रे तिच्या भावांची होती. पुष्कळशा सैनिकांची पत्रे रटाळ असतात. परंतु ही पत्रे त्याला अपवाद होती. या पत्रांतून जबर कर्तव्यनिष्ठा, देशप्रेम व देशाच्या भविष्याची रास्त चिंता दिसत होती. माझे हृदय हेलावले त्यामुळे. इकडे एलिझाच्या डोळ्यांत अश्रू जमा झाले होते. पुढील दोन दिवस असेच गेले.

असे प्रसंग नेहमीच घडत राहणे फायद्याचे नव्हते. मी हे सर्व पॅपेनला सांगितले.

" 'ऑपरेशन सिसेरो 'सारख्या महत्त्वाच्या कामगिरीत मी व्यग्र असताना एलिझासारखी मूर्ख मुलगी माझ्या खात्यात ठेवण्यात आपण एकप्रकारचा धोका पत्करत आहोत. "

समोरच्याच टिपकागदावर वर्तुळे काढीत ते म्हणाले, " तसे असेल तर ती कामास योग्य नसल्याचे मी कळवीन. पण मला वाटते. त्यापेक्षा मी तिच्या आईवडिलांना कळवीन की. तू बर्लिनला कळव की, ती आजारी असून वैद्यकीय उपचारार्थ काम सोडून जात आहे. "

हा तोडगा मला पसंत पडला व मी बर्लिनला कळवले.

मध्यंतरी सिसेरोने जी एक फिल्म दिली त्यात ' ऑपरेशन ओव्हरलॉर्ड ' हा नवीनच शब्द माझ्या नजरेस आला. या सांकेतिक शब्दाचा अर्थ काय असावा म्हणून मी खूप विचार केला. कोणतीही किंमत देऊन ' ऑपरेशन ओव्हरलॉर्ड ' ही काय मानगड आहे ते शोधा, असे सर्व वकिलातींना तातडीचे संदेश दिले.

माझ्यापरीनेही मी प्रयत्न करीत होतो. एक दिवस असाच मागील फाईल्स चाळीत बसलो असता, या शब्दाचा अर्थ अचानकपणे लागला. लंडनने अंकारातील ब्रिटिश वकिलातीला असा संदेश दिला होता की अँग्लो–टर्किश वाटाघाटी १५ मे पूर्वी फलद्रूप करा. त्याचप्रमाणे मॉस्को व तेहरान येथे दोस्तांच्या ज्या बैठकी झाल्या त्यांनुसार स्टॅलिनच्या दबावाखाली चर्चिलने दुसरी आघाडी उघडण्यास मान्यता दिल्याची माहिती मिळाली होती.

या सर्व घटनांचा विचार करता ' ऑपरेशन ओव्हरलॉर्ड ' हे युद्धाला निर्णायक कलाटणी देणाऱ्या योजनेचे नाव होते, हे स्पष्ट झाले.

मी तत्काळ बर्लिनला संदेश दिला. बर्लिनने नेहमीचेच तोऱ्यात उत्तर दिले, " शक्य आहे. पण शक्यता फारच कमी. "

या सांकेतिक भाषेचा अर्थ बर्लिनच्या ध्यानी येण्यास ६ जून १९४४ हा दिवस उगवावा लागला. त्याच दिवशी अँग्लो–अमेरिकनांचा प्रचंड युद्धताफा नॉर्मंडीच्या किनाऱ्यावर उतरला व जर्मनीला मृत्युचे वेध लागले.

सिसेरोने दिलेली ही शेवटची फिल्म. आजपर्यंत सिसेरोला ३,००,००० पौंड मिळाले. पण त्याने त्याची पैशाची हाव शमली की नाही ते समजत नाही. यानंतर तो मला कधीच दिसला नाही. त्या विलक्षण माणसाचा ठावठिकाणा समजून घेण्याचा मी प्रयत्न केला. पण काहीच समजले नाही. त्या माणसाच्या सहवासातील घटनांच्या स्मृती माझ्या मन:पटलावर कायम राहतील. त्याची मी चातकासारखी वाट पाहत असूनही माझी त्याची भेट होणे जास्तच जास्त दुरापास्त होत आहे. कोणी सांगावे कदाचित् तो या जगात आजमितीस नसेलही. आपल्या बापाच्या खुनाचा बदला घेणाऱ्या त्या माणसास आतातरी समाधान लाभले असेल का ? मला वाटते जिवंत असल्यास जर्मनांना लाखोली वाहत असेल व इंग्रजांविषयीचा द्वेष वाढलाच असेल. [ अपूर्ण ]

.. प्रकाशनाच्या वाटेवर ..

नाझी भस्मासुराचा उदयास्त

लेखक :

रा. म. शास्त्री

# आणि ड्रॅगन जागा झाला

लेखांक दहावा

अरुण साधू

रात्र अंधारी होती आणि चुह तेह्च्या छोटयाशा लाल सैन्याचा तळ दोन डोंगरांच्या मधून कापीत जाणाऱ्या पुराने फुगलेल्या एका नदीकाठी पडला होता. वसंत ऋतू सुरू झाला होता आणि डोंगरावरचे बर्फ वितळू लागले होते. नद्या भरभरून वाहत होत्या. वाहत्या तराफांच्या पुलावरून ती लाल सेना दुसरे दिवशी ती फुगलेली नदी ओलांडणार होती.

झुडपांचे आडोसे बघून स्वयंपाक्यांनी विस्तव पेटवून भात शिजविणे सुरू केले होते. जाळ दूरवर कुठे दिसणार नाही ना, याची खबरदारी घ्यावी लागत होती. तांदूळ अपुराच होता, त्यामुळे जवळ जवळ साऱ्याच सैनिकांना अर्धवट उपाशी-पोटीच झोपेसाठी गवतावर पडावे लागले होते.

तेवढयात हेरांनी बातम्या आणल्या. हुनान-कियांगसी सीमेवरील त्या प्रदेशाच्या सर्वच बाजूंनी लष्करी सुभेदारांची आणि कोमिन्टांग सरदारांची सैन्ये पसरली होती. त्यांच्यापैकी कुणालाही लाल सैन्याचा सुगावा लागला असता तरी ते त्यावर तुटून पडले असते.

" च् च्... " गवतावर पडलेला एक तरुण सैनिक युकुंग आपल्या सोबत्याला म्हणाला. " आपण जवळ जवळ ५० मैल चालून आलो आहोत. नुसते पळतो आहोत. एक मैलही रक्तपाताशिवाय गेला असेल तर शपथ...अगदी सरळ चिंग-काशानपर्यंत जाता आलं असतं तर किती चांगलं झालं असतं... "

" हं ! ... युद्ध...युद्ध " त्याच्या शेजारचा एक प्रौढ सैनिक म्हणाला. " हे

लष्करी सरदार ढेकणासारखं आपलं रक्त शोषत आहेत...ठीक आहे...एकदा चिंग-काशानवर पोचल्यावर आपलं सैन्य दुप्पट होईल...मग बघू..."

"शूऽऽ..." जवळून जाणारा दुसरा एक अधिकारी ओरडला. "सारं सैन्य जर एवढ्या मोठ्यानं बोलायला लागलं तर शत्रूला आपला पत्ता लागायला वेळ लागणार नाही..."

सर्वत्र शांतता पसरली. हळूहळू ते हजारो सैनिक अस्वस्थपणे झोपेच्या आधीन होऊ लागले. जखमी सैनिक मधूनच विव्हळत होते आणि क्षय व इतर रोगांनी ग्रस्त झालेले आजारी सैनिक अधूनमधून खोकत होते. एवढाच काय तो आवाज येत होता. दिवसभराच्या धावपळीने, लढायांनी ते सारेच सैन्य दमून गेले होते.

**वाटेतील चकमकी**

मध्यरात्रीनंतर एखादाच प्रहर उलटला असेल नसेल तेवढ्यात एकाएकी बंदुकां-मधून गोळ्या सुटल्याच्या आवाजाने त्या निद्रिस्त सैन्याला खडबडून जाग आणली. त्या खिंडीच्या दुसऱ्या टोकाला शत्रूचे मोठे सैन्य जमा झाले होते. डाव्या कोमिन्टां-गच्या लष्करी सरदारांच्या त्या सैन्याजवळ भरपूर बंदुका आणि अवजड मशीनगन्स दिसत होत्या. आणि ते सैनिक भराभरा संरक्षक फळीसाठी खंदक खोदत होते. ते बघून पहाऱ्यावर असलेल्या लाल सैनिकांनी इशाऱ्यासाठी गोळ्या सोडल्या होत्या.

घडपडत सारे लाल सैनिक उठले. आपापली शस्त्रे त्यांनी घट्ट पकडली. भराभर आज्ञा सुटू लागल्या. खंदक खणले जाऊ लागले. मशीनगन्स पवित्र्यात बसविल्या जाऊ लागल्या. लाल सैनिकांच्या छोट्या छोट्या तुकड्या बाजूच्या गर्द झाडीतून शत्रुसैन्याच्या रोखाने हळू हळू सरकू लागल्या. काही काही तुकड्या शत्रूच्या इतक्या जवळ जाऊन पोचल्या की, त्यांना तेथील अधिकाऱ्यांचे हुकूमही स्पष्ट ऐकू येत होते.

हुकूम सुटले आणि बंदुकांच्या फैरी झडू लागल्या. दोन्हीकडे प्रेते पडू लागली. कोमिन्टांगच्या तुकड्या मशीनगन्ससह पुढे पुढे येऊ लागताच बाजूच्या डोंगरांतून पुढे गेलेल्या लाल तुकड्यांनी मागच्या बाजूवर मारा सुरू केला, त्यामुळे पुढे सरक-लेल्या कोमिन्टांग तुकड्यांना पळत परत यावे लागले. थोडा वेळ बंदुकांच्या फैरी थांबताच लाल सैनिक मोठ्याने ओरडत, "या...या... सैनिकांनो आमच्याबरोबर या...तुम्ही कुणासाठी लढता आहात...? आम्ही तुमचे भाऊच आहोत. आम्ही लढतो आहोत गरिबांसाठी–तुम्हा-आम्हासाठी..."

आणि पुन्हा बंदुकांच्या गोळ्या सुटू लागत. कोमिन्टांग सैनिक अगदी जवळ आले की राखीव लाल सैनिक त्यांच्यावर हातातील तलवारी-फरशांसकट तुटून पडत. कधी कधी कोमिन्टांग सैनिकांचे काही गट हात वर करून पुढे येत आणि मोठ्याने ओरडत, "मारू नका...आम्ही तुमच्या बाजूनेच येत आहोत." काही काही धाडसी सैनिक सुसाट सुटणाऱ्या गोळ्यांच्या वर्षावातून धावत जात आणि मरून पडलेल्या कोमिन्टांग सैनिकांजवळील शस्त्रे व दारूगोळा उचलून पुन्हा पळत परत येत. या

घाडसामध्ये काहीजण आपला जीवही गमावीत होते.

थोडयाच वेळात कोमिन्टांग सैनिकांचे धैर्य खचले. एक एक सैनिक हळू हळू माग परतू लागला आणि पाहता पाहता सारे सैन्यच गोळचा झाडीत झाडीत मागे परतू लागले. ते पाहताच लाल सैनिकांना अधिकच चेव आला आणि विजयाच्या आरोळ्या ठोकीत ते शत्रूचा पाठलाग करू लागले. शत्रूच्या खंदकातील बराच दारूगोळा आणि कित्येक मशीनगन्स त्यांच्या ताब्यात आल्या.

तेवढयात कमांडर चुह तेहचा हुकूम आला. पाठलाग पुरे. संपूर्ण एक दिवस गोळागोळीत गेला होता. दुसऱ्या दिवशीच्या संध्याकाळी गोळीबार पूर्णपणे थांबला.

## शत्रुसैनिकांची पाठवणी आणि मिळवणी

लाल सैन्याचे अधिकारी आपापल्या तुकडयांच्या हानीची मोजदाद करू लागले. जवळजवळ ५० लाल सैनिक या हातघाईच्या लढाईत ठार झाले होते. कित्येक घायाळ झाले होते. त्याचबरोबर शत्रू सैन्यातले बरेच सैनिक आपल्या शस्त्रांसह शरण आले होते. हे सैनिक म्हणजे कोमिन्टांगने आपल्या मार्गात आलेल्या खेडयांतील जबरदस्तीने भरती केलेले शेतकरी आणि हमाल होते. या नव्या लाल सैनिकांकडे ते कुतूहलाने बघत होते. कमांडर चुह तेह त्यांना उद्देशून म्हणाला, "कॉम्रेड्स्, तुम्हांला आपापल्या घरी जायचे असेल तर तुम्ही खुशाल जाऊ शकता. आम्ही तुमच्यापैकी प्रत्येकाला एकेक डॉलर आणि थोडे तांदूळ परतीच्या प्रवासासाठी देऊ. आमच्याजवळ स्वतःपुरतेच पुरेसे तांदूळ नसल्याने आम्ही तुम्हांला जास्त देऊ शकणार नाही. तुमच्यापैकी ज्यांना आमच्याबरोबर राहून क्रांतिलढ्यात भाग घ्यायचा असेल त्यांचे आम्ही स्वागत करू."

एक म्हातारा शेतकरी म्हणाला, "मला माझ्या कुटुंबाची काळजी आहे. घरी गेलेच पाहिजे." दुसरा म्हणाला, "काही उपयोग नाही. माझं गाव इथून खूप लांब आहे. रस्त्यात मला पुन्हा कोमिन्टांग सैनिक पकडून हमाली करायला लावतील. त्यापेक्षा यांच्याबरोबरच राहिलेलं काय वाईट ?"

काही सैनिक परत गेले आणि बरेचसे लाल सैन्यातच राहिले.

दुसरे दिवशी सकाळी लाल सैन्याने ती दुथडी भरून वाहणारी नदी ओलांडण्यास सुरुवात केली. बांबूचे छोटे छोटे तराफे एकमेकांना बांधून पाण्याच्या प्रवाहातच एक हलता पूल आजूबाजूच्या शेतकऱ्यांनी रातोरात मोठया कष्टाने तयार केला होता. नदी वेगाने वाहत होती आणि तो मोडका पूल हादरत होता. एकामागून एक लाल सैनिक तराफांवरून उडया मारीत जात होते. काही सैनिकांच्या उडया चुकत होत्या. काही घाबरून नदीत पडत होते. काठावरचे सैनिक पडलेल्या सैनिकाला वाचवण्यासाठी काठावरच्या काठावर धावपळ करीत. पण अंधारात काही दिसत नव्हते. घोंघावणाऱ्या नदीच्या आवाजात दुरून ऐकू आलेली आरोळी त्या पडलेल्या सैनिकांचे काय झाले हे सांगायला पुरेशी असे. पलीकडच्या काठावर पोचलेल्या तुकडया

पूर्वेच्या दिशेने पुढे चालू लागल्या होत्या. शोधात अधिक वेळ घालविणे शक्य नसे. नि:श्वास सोडून शोधायला गेलेले सैनिक परत आपापल्या तुकड्यांत जाऊन पुढे चालू लागत.

थंडी पडलेली होती. दोन दिवसांच्या युद्धाचे श्रम अंगावर होते आणि आदल्या रात्री खाल्लेला भात तेवढाच पोटात होता. पण तशाही थकलेल्या म्लान अवस्थेत लाल सैन्याला पुढे जाणे भाग होते. नाहीतर मागून अधिक संख्येसह येणाऱ्या कोमिन्टांग सैन्याच्या हल्ल्याला बळी पडावे लागले असते.

आणि असेच चुह तेहचे लाल सैन्य पुढे जात होते. कोमिन्टांगच्या छोटया तुकडयांवर हल्ले करीत, मोठया सैन्याला टाळीत, रात्रीतून प्रवास करीत, गवतावर झोपीत, शेतकऱ्यांच्या औदार्यावर जगत, अर्धपोटी, उपाशी भटकत होते. हुनान-कियांगसी सीमेवरील त्या डोंगराळ जंगली भागात सैन्याची प्रसिद्धी चांगलीच झाली होती. लाल सैन्य जवळ आले म्हणताच जमीनदार चंबूगबाळे आवरून पळ काढू लागत होते. शेतकऱ्यांजवळ भिण्यासारखे काही नसे. त्यामुळे त्यांना लाल सैन्याची भीती नव्हती. आणि लाल सैनिकांचे शिस्तबद्ध वर्तन बघून ते आपणहून त्यांचा पाहुणचार करीत.

नानचांगच्या क्रांतीनंतर कोमिन्टांगमधून फुटून निघालेला जनरल चुह तेह आपल्या वाचलेल्या सैन्यानिशी भटकत होता. त्याच्या सैनिकांच्या अंगावर अजूनही तेच जीर्ण झालेले कोमिन्टांगचे गणवेश होते. सैन्याची परिस्थिती वाईट होती. त्यामुळे काही काही सैनिक गळतही होते. पण दूर कॅन्टॉन येथे घडत असलेल्या क्रांतिकारक घडामोडींनी सैन्याला उत्तेजन मिळत होते. आणि अस्तित्वासाठी ते अधिक जोषाने लढत होते.

## लाल सैन्याच्या घोषणा

१९२८ च्या मार्च महिन्याच्या दुसऱ्या आठवडयात चुह तेहचे सैन्य मिचेनटोव या गावाजवळ आले. गावातील सारे जमीनदार, दुकानदार भीतीने पळून गेले होते. त्यांची दुकाने लाल सैनिकांनी फोडली. साठविलेले धान्य गावातील लोकांना आणि सैनिकांना वाटून दिले. कपडे जप्त केले आणि जमीनदारांच्या आणि दुकानदारांच्या घरांवर जप्तीच्या घोषणा चिकटविल्या.

घोषणापत्रकात लिहिले होते —

"क्रांतीसाठी लढणाऱ्या कामकऱ्यांच्या आणि शेतकऱ्यांच्या या लाल सैन्याने गरिबांना छळणाऱ्या या श्रीमंत इसमांच्या घरांतील साठविलेले तांदूळ, मीठ, औषधे, जोडे, पैसे आणि कपडे जप्त केले आहेत. या जप्तीचा क्रांतीसाठी उपयोग करण्यात येईल.

"शेतकरी संघटना अमर रहे." "जमीनदार, व्यापारी मुर्दाबाद," "शेतकऱ्यांची जमीन शेतकऱ्यांना", "कर भरू नका, भाडी देऊ नका आणि कर्ज फेडू



SATHE
SATHE Maltex BISCUITS
अभिरुचीचें संपूर्ण समाधान
साठे माल्टेक्स बिस्किटें मुख्यतः लहान मुलें व अशक्त माणसें ह्यांसाठीं खास तयार करण्यांत आलीं आहेत. मधुर स्वादयुक्त आणि पचनास हलकीं अशीं ही बिस्किटें शक्ति आणि उत्साह वाढवितात. प्रत्येक घरीं 'आवश्यक' असणारीं हीं 'माल्टेक्स' बिस्किटें.
साठे बिस्किट ॲण्ड चॉकोलेट कं. लि. पुणें-२.
साठे
बिस्किटें
बिस्किटाचा प्रत्येक पुडा समाधानाचा व सौख्याचा जणूं ठेवा !
heros' SBC-265 MAR

नका," अशा तऱ्हेच्या घोषणाही चिकटविण्यात आल्या.

लाल सैनिकांनी स्नाने केली, रात्रभर सुखाची झोप घेतली, दुसरे दिवशी भरपूर भात खाल्ला. जखमांवर औषधोपचार केले, जप्तीत मिळालेले नवे कपडे आणि जोडे चढविले आणि आपल्याबरोबरचे सामान, छपाईची यंत्रसामग्री, इतर यंत्र-सामग्रीबरोबर घेऊन पुन्हा पुढे आगेकूच करण्यास या लाल सैन्याने सुरुवात केली.

एकाच ठिकाणी जादा काळ थांबणे धोक्याचे होते. कोमिन्टांगचा मोठा हल्ला केव्हाही येण्याचा संभव होता.

दोन दिवसांनंतर लाल सैन्य निनकांग या बाजारपेठेच्या सीमेवर पोचले. निनकांगच्या पलीकडेच केवळ काही तासांच्या चालीच्या अंतरावर एक उंच शिखर वर आलेले दिसत होते. तो पर्वत होता चिंगकाशान आणि तेथेच या लाल सैन्याला पोहोचावयाचे होते.

निनकांगमध्ये कोमिन्टांग सैनिकांची एक तुकडी आणि काही जमीनदारांची घरे होती. लाल सैन्य जवळपास आलेले पाहताच शहरातील धोक्याची घंटा वाजविण्यात आली. "दरोडेखोर येत आहेत, गावच्या संरक्षणासाठी सावध व्हा," असे इशारे देण्यात आले. पण गावातील शेतकरी आणि कामगार थंड बसून होते. लाल सैन्य येणार हे त्यांना अगोदरच माहीत होते. लोकांची ही शांतता बघून जमीनदारांनी परिस्थितीचा अंदाज घेतला आणि रातोरात कोमिन्टांग तुकड्यांसह त्यांनी कियांगसी शहराचा रस्ता सुधारला. दुसरे दिवशी सकाळी बंदुकीची एकही गोळी न झाडता लाल सैन्याने निनकांग शहराचा ताबा घेतला.

लाल सैन्याने लगोलग शहरात आणि आजबाजूच्या खेड्यांत वेगवेगळ्या संघटना उभारण्यास सुरुवात केली. पायाची नैसर्गिक वाढ झालेल्या स्त्रियांना बंदुका देण्यात आल्या. बाजूच्या जमिनींचे पुनर्वाटप करण्यात आले.

एप्रिलच्या मध्यापर्यंत चुह तेहचे लाल सैन्य निनकांगमध्ये होते. त्याच सुमारास माओ-त्से-तुंगकडून संदेश आला. माओचे शेतकऱ्यांचे सैन्य चिंगकाशान तळावर चुह तेहच्या लाल सैन्याची वाट पाहत होते.

शहरात बिगुल वाजू लागले. लाल सैनिक गोळा होऊ लागले आणि शहराच्या रक्षणासाठी एक लहानशी तुकडी ठेवून आपले लाल ध्वज फडकावीत चुह तेहच्या सैन्याने चिंगकाशान शिखराच्या दिशेने मार्गक्रमण सुरू केले. शहराबाहेर सैन्य पडले तेव्हा ते नवे ताज्या दमाचे सैन्य दिसत होते. निनकांगमधील महिन्याभराच्या मुक्कामात सैनिकांना साधारण पोटभर खायला मिळाले होते, त्यांचे फाटलेले गणवेष धुऊन पुन्हा शिवण्यात आले होते. जखमा बऱ्या झाल्या होत्या. काहींच्या पायांत नवे जोडे आले होते. जिंकलेल्या बंदुका, धान्य, आपली यंत्रसामग्री घेऊन हे सैन्य हळूहळू नागमोड्या वाटेने चिंगकाशानच्या दिशेने चालू लागले.

## चिंगकाशानचा पायथा

संध्याकाळचा अंधार पडला असतानाच लाल सैन्याने एका टेकडीला वळसा घातला आणि एकदम ते चिंगकाशानच्या पायथ्याशी आले. चुह तेह थांबला. एका हेराने अंगुलिनिर्देश केलेल्या पर्वताच्या कोपऱ्यावर त्याने आपली दुर्बीण लावली आणि तो न्याहाळून बघू लागला. हळूहळू त्याला दिसू लागले. गणवेशातील सैनिक तेथे दिसत होते. काही जमिनीवर पडून विश्रांती घेत होते तर काही बसून होते. एका ठिकाणी एका उंच काठीवर लाल ध्वज फडकत होता. माओ-त्से-तुंगच्या शेतकरी-कामकरी सैन्याचा तो ध्वज होता. चुह तेह आणि त्याचे लाल सैन्य उत्सुकतेने पुढे चालू लागले.

थोड्याच वेळात एक लहानशी तुकडी त्या लाल सैन्याचे स्वागत करण्यासाठी सामोरी आली. त्या तुकडीच्या आघाडीला उंच बांध्याचा, हडकुळा, खोल लाल डोळयांचा, भव्य कपाळाचा, वाढलेल्या केसांचा आणि फाटके कपडे घातलेला माओ-त्से-तुंग होता. चुहच्या लाल सैनिकांनी आतापर्यंत माओबद्दल नुसते ऐकले होते. आता ते माना उंच करीत माओकडे उत्सुकतेने बघत होते.

माओच्या बाजूला चिंगकाशान तळावर आधीपासून असलेले वाँग आणि युआन हे दोघे दरोडेखोर पुढारीही उभे होते. तेही स्वागतासाठी चिंगकाशानहून खाली उतरून आले होते.

पौर्णिमेचा चंद्र वर आला आणि चुहचे लाल सैन्य चिंगकाशानवर चढू लागले. चढ फार मोठा आणि कठीण होता. दुसरे दिवशी पहाटे ते एका सपाट थोड्याशा उताराच्या जागेवर जाऊन पोचले. हाच चिंगकाशानचा तळ होता. माओच्या सैन्याने याच ठिकाणी एक वर्ष काढले होते.

## चुह-माओ

चुह तेहच्या सैन्याच्या मागोमाग चिंगकाशान तळावर चीनमधून ठिकठिकाणांहून महत्त्वाकांक्षी असंतुष्ट तरुण, कामगार, बुद्धिजीवी, साऱ्या प्रकारचे लोक येऊ लागले. त्यांमध्ये स्त्रियाही होत्या. कोमिन्टांगच्या व सरदारी सुभेदारांच्या जाचाला कंटाळलेले चिनी क्रांतीची ईर्षा मनात धरून आलेले हे सारे ध्येयवादी लोक कम्युनिस्टच होते असे नव्हे.

तळावर येणाऱ्यांमध्ये शांघाय आणि हँकोव् येथील औद्योगिक कामगार, पेकिंग आणि इतर शहरांतील तरुण विद्यार्थी, प्राध्यापक आणि ठिकठिकाणचे बंडखोर शेतकरीही होते, येताना आपल्याबरोबर ते मिळतील ती शस्त्रे आणीत होते. वांबूच्या तलवारीपासून तो अमेरिकन मशीनगन्सपर्यंत अशा विविध शस्त्रांचा मोडका-तोडका साठा चिंगकाशान तळावर गोळा होत होता.

चुह तेह आपल्या सैन्यासह चिंगकाशानवर आल्यानंतर माओ-त्से-तुंगने लष्कराची सारी व्यवस्था त्याच्यावरच सोपविली. आणि राजकीय संघटनेचे काम स्वतःकडे

घेतले. तेव्हापासूनच लाल सैन्यामध्ये चुह-माओ ही जोडगोळी प्रसिद्धीला आली. त्या दोघांच्याही नावाचा चुह-माओ असा एकत्रच उच्चार होत असे; इतका की चुह-माओ नावाची एकच व्यक्ती आहे, असे कुणालाही वाटावे. चुह-माओची ही मैत्री आणि कामाचे वाटप पुढे कम्युनिस्ट चळवळीत शेवटपर्यंत टिकले. १९४९ साली चीनमध्ये कम्युनिस्टांनी सत्ता काबीज केल्यानंतरही चुह तेह हाच लाल सैन्याचा सरसेनापती आणि चीनचा संरक्षणमंत्री झाला. पुढे वार्धक्यामुळे आणि खरोखरीच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे चुह तेह स्वतःच निवृत्त झाला आणि त्याची जागा पेंग तेह हुई या दुसऱ्या एका सुप्रसिद्ध कम्युनिस्ट सेनानीने घेतली.

चिंगकाशान तळावर माओने जनरल चुहशी हातमिळवणी केली हे त्या वेळच्या बऱ्याच कर्मठ कम्युनिस्टांना पटले नाही. कारण त्यांच्या दृष्टीने जनरल चुह तेहचा भूतकाळ काहीसा संशयास्पद होता. तो पूर्वीचा एक नावाजलेला सरदारी सुमेदार होता. त्याच्यावर संपूर्ण विश्वास टाकणे कम्युनिस्ट कर्मठांना मान्य नव्हते.

परंतु या सरदारी सुमेदाराचा एक भाविक आणि निष्ठावान कम्युनिस्ट होणे ही गोष्ट जरी अशक्य वाटत असली तरी ती खरी होती. चैनी, विलासी, भ्रष्टाचारी जीवनाचा त्याग करून चुह तेहने हे कम्युनिस्टांचे असिधाराव्रत कसे पत्करले, तो एक कडक शिस्तीचा लाल सैनिक कसा बनला ही गोष्ट कर्मठ कम्युनिस्टांना जितकी संशयास्पद आणि अविश्वसनीय वाटत होती तितकीच रोमहर्षक होती. [अपूर्ण]

## □ घोष-प्रार्थना ! !

लाल सैन्यामध्ये वेगवेगळ्या घोषणांना असामान्य महत्त्व होते. त्या घोषणांना काही वेगळाच अर्थ होता. सारे लाल सैनिक या घोषणा पाठ करीत व रोज त्या प्रार्थनेप्रमाणे म्हणत.

या घोषणांचा खेड्यातील शेतकऱ्यांवर फार अनुकूल परिणाम होत असे. पुढे जपानने जेव्हा चीनवर आक्रमण केले तेव्हा त्यांनी अगदी दग्धभूचे धोरण स्वीकारले. "सर्वांना मारा, सारे काही लुटा आणि सारे जाळून टाका." ही जपान्यांची उघड घोषणा होती. त्याला उत्तर म्हणून कम्युनिस्टांनी पुढील घोषणा दिली—

शत्रू जाळपोळ करीत असेल तर आम्ही त्या आगी विझवू.
शत्रू लुटालूट करीत असेल तर आम्ही त्यावर हल्ला करू.
शत्रू पाठलाग करीत असेल तर आम्ही लपून राहू.
शत्रू निघून गेला की आम्ही परत येऊ. ●

# आचार्य अत्रे यांचा 'म्युनिसिपल' मंत्री

भारतीय स्वातंत्र्याच्या नौबती १९४६ पासून झडू लागल्या. देशाला स्वातंत्र्य मिळणार, याची खात्री ज्या वेळी संस्थानिकांना वाटू लागली, त्या वेळी काल-प्रवाहाचा ओघ ओळखून शासनात लोकांना प्रतिनिधित्व देण्याच्या दृष्टीने पावले टाकली गेली नाहीत तर आपले अस्तित्व धोक्यात येईल, याची जाणीव काही संस्थानिकांना झाली.

सोनापूरचे अधिपती हे अशांपैकीच एक असल्याने आपल्या राज्यात त्यांनी नुकत्याच निवडणुका घेतल्या आहेत. 'संभाजी विडी'चे कारखानदार सोन्याबापू सोनटक्के 'जनता पक्षा'चे नेतृत्व स्वीकारून निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. आणि त्यांच्या घराच्या दिवाणखान्यात त्यांचा चिटणीस लखोबा लफंगे व त्यांच्या पत्नी गोजाबाई आकाशवाणीवरून येणाऱ्या वार्तेकडे डोळे लावून बसले आहेत. आकाशवाणीवरून जनता पक्षाला हुकमी बहुमत मिळाल्याची व या पक्षाचे नेते सोन्याबापू ऊर्फ 'बापूजी' सोनटक्के राज्याचे मुख्यमंत्री झाल्याची घोषणा करण्यात येते.

केवळ या वार्तेनेच घरातील प्रत्येकाला सत्तेचा कैफ चढतो. मुख्यमंत्र्यांचे चिरंजीव चंद्रकांत सोनापूरचे टाटा-बिर्ला होण्याची स्वप्ने पाहू लागतात. मदिरा व मदिराक्षी यांच्या मोहक जाळ्यात गुंतलेल्या या चिरंजीवांवर घरातील कोणाचेच नियंत्रण नसते. परिणामी बबलू बार्शीकरीण या तमाशाच्या फडावर नाचणारणीला पत्नी म्हणून चंद्रकान्त घरात आणतो. नाचणारणीला अंधेरगड नावाच्या बनावट संस्थानाची राजकन्या बनवून लखोबा वेळ मारून नेतो. बबलूच्या नृत्यावर खूष झालेल्या या लांडग्याचे मन साफ नसते.



अशी कशी ही हो लोकशाही !

घरात त्यातल्या त्यात समज असणारी व सरळ वागणारी एकमेव व्यक्ती म्हणजे चंद्रकान्तची बहीण चंद्रकोर. युवराज या कन्येला मागणी घालतात, त्याचा आधार घेऊन अत्र्यांनी तिला गुंतवून ठेवली आहे. बिचारीला युवराज मिळतात ते थेट तिसऱ्या अंकात.

एक अशिक्षित, असंस्कृत कारखानदार मुख्यमंत्री झाला, म्हणून काय वागणुकीत थोडाच फरक पडणार! बेट्याला घरचं थोडं वाटतं म्हणून की काय मंत्रिगण असे निवडतो की, हां हां म्हणता शासनाचा बोजवारा उडावा; शिक्षणाचा दुरूनही गंध नसलेला आणि पिढ्यान पिढ्या दारू विकत आलेला गुंडाप्पा पहिलवान दारू-बंदी व शिक्षण मंत्री, सुंदराबाई वाघमारे (व्यवसायाने गवळी) आरोग्य मंत्री, तर सांगायचे तत्त्वज्ञान चरख्याच्या चक्राआड दडवून सदाचार आश्रमाच्या पाटीखाली दुराचाराचे थैमान घालणारा वाटाणे गुरुजी गृहमंत्री, राहिलेली खाती साक्षात् मुख्यमंत्र्यांच्या हातात.

वाटाणे गुरुजींची त्यांच्या शिष्येशी–बिबाशी–भानगड, मुख्यमंत्र्यांच्या पोराचे नाचणारणीशी झालेले लग्न, त्याचा चोरटा व्यापार, गुंडाप्पाच्या पोराने न काढ-लेल्या कारखान्यासाठी घेतलेले पैसे, या वार्तांनी जनतेत प्रक्षोभ माजतो. मुख्यमंत्री व्यक्तिशः कशाला जबाबदार नसूनही त्याच्या राजीनाम्याची मागणी येते. दारिद्रय, अन्न दुर्भीक्ष्य, यांनी त्रासलेल्या जनतेचा मोर्चा येतो. गोळीबार होतो. स्वतःच्या विडी कारखान्यातले कामगार उलटलेले पाहून बापूजींची खात्री पटते, आपलेच चुकले. राजकारण हे आपले क्षेत्र नव्हे. आपण मूळ कोण, आपल्या महत्त्वाकांक्षेची उडी कोठवर असावी याचा ते विचार करू लागतात. सुखी संसाराच्या जुन्या आठवणी, कष्टाने संपादिलेले व्यावसायिक यश, या सर्व स्मृतींना उजाळा देत अस-ताना ते स्वतःलाही विसरून जातात. आपले हरवलेले कौटुंबिक सुख ते पुन्हा मिळवण्यासाठी मंत्रिपदाचा राजीनामा देतात. लोकशाहीवर बबलूची फर्मास लावणी होते. इन्स्पेक्टर जनरल गायतोंडेसुद्धा गातात आणि नाटक संपते.

## पुरानी बोतल नई शराब

आचार्य अत्रे यांनी ज्या पद्धतीने नाटकाचा विषय हाताळला आहे, त्यात नावीन्य नाही. त्यांच्या स्वतःच्या 'मी उभा आहे' व कै. जोशी यांच्या 'म्युनिसिपालिटी'पेक्षा या नाटकात खास नवीन काही नाही. नाटकातील संवादावरून व कालबंधने झुगा-रून अत्र्यांनी काही ठिकाणी केलेल्या लिखाणावरून त्यांना वास्तविक ५५ नंतरच्या राजकारणाच्या हिणकस बाजू उजेडात आणायच्या आहेत असे वाटते. परंतु प्रत्यक्षात मात्र नाटक स्थानिक राजकारणाची पातळी ओलांडूच शकत नाही. एखाद्या म्युनिसिपालिटीतील कारभाराचे चित्रण आपल्या डोळ्यांसमोर उभे राहते. २५ सभासद असलेल्या सभागृहाला विधानसभा म्हणण्यापेक्षा म्युनिसिपालिटी

संबोधणेच योग्य वाटते. गवळीण, दारूवाला, विडीवाला ही मंडळीही स्थानिक राजकीय पातळीवरील वाटतात, हा नाटकाचा एक प्रमुख दोष म्हणावा लागेल.

पहिल्या अंकाचा सुरुवातीचा भाग सोडल्यास पहिल्या दोन अंकांत कथेला गती नाही. मात्र वाटाणे गुरुजींच्या तोंडून गांधींच्या नावाचा दांभिक जयजयकार, ऊठसूट संदेश देणाऱ्या मंत्र्यांचे संदेश–प्रसंगांतून विडंबन, सरकारी कर्जाची उपहासात्मक थट्टा, सफेद खादी टोपी घालून काळ्याकुट्ट अंतःकरणाने वावरणारा लखोबा आदी बाबी आचार्यांनी परिणामकारकरीत्या सादर केल्या आहेत. गुंडाप्पा व सुंदरा यांच्यामधील संवाद, सुंदराबाईला होणारी मारहाण आणि प्रत्येक गोष्टीवर त्यांनी विचारावयाचे स्पष्टीकरण यामुळे नाटकाचा तोल ढासळला आहे. मंत्रिमंडळाच्या वारंवार होणाऱ्या बैठकी कमालीच्या कंटाळवाण्या व नाट्यहीन आहेत. बबलूचा नाच नसता तर दुसरा अंक बघणेही कठीण गेले असते. बिचारी नाचते म्हणून अंक सावरतो.

## तिसरा अंक दर्जेदार

राजकारणाचा उकिरडा फुंकण्यात आपण केलेला गाढवपणा बापूजींना उमगल्यानंतर त्यांचे व्यक्तिचित्रण आचार्यांनी ज्या पद्धतीने केले आहे त्याला तोड नाही. विशेषतः, मुख्यमंत्र्यांच्या बाबतीत प्रेक्षकांना सहानुभूती राहील याची दक्षता आचार्यांनी सुरुवातीपासून घेतली असल्याने प्रेक्षकांना प्रामाणिक परंतु राजकीय दृष्टिकोनातून सामान्य वाटणाऱ्या बापूजींबद्दल कणव वाटू लागते. विरोधी पक्षात जाऊन मुख्यमंत्रिपद टिकवण्याची संधी न स्वीकारता बापूजी राजीनामा देतात. या अंकातील गोजाबाई व बापूजींचे प्रवेश कमालीचे भावस्पर्शी झाले आहेत. आपल्या राजकीय जीवनाच्या शोकांतिकेचे भाष्य बापूजींनी केल्यावर बबलूने अचानक 'अशी कशी ही हो लोकशाही ?' म्हणून लोकशाहीची लावणी म्हणणे आणि कलावंतांच्या संपूर्ण जथ्याने 'वंदे मातरम्' पद्धतीने रंगमंचावर उभे राहून तिला साथ देणे हा सर्व प्रकार हास्यास्पद व नाटकाच्या परिणामासही मारक वाटतो.

लोकशाहीच्या भवितव्याबाबत भाष्य करताना आचार्य अत्रे बापूजींच्या तोंडून म्हणतात, "लोकशाहीत कोणत्या माणसाने केवढ्या महत्पदावर आणि किती उंचीवर जाऊन बसायचे याला कायद्याने काही तरी बंधन घातले पाहिजे. आणि नालायक, महत्त्वाकांक्षी माणसांना लोकशाहीने खड्याप्रमाणे निवडून बाजूला काढले पाहिजे. विद्वत्ता, पात्रता आणि चारित्र्य यांना लोकशाहीत स्थान मिळेल तेव्हाच भारताचे कल्याण होईल."

आचार्यांचे हे तत्त्वज्ञान कथा-सूत्राशी इतके एकजीव होऊन येते की लोकशाहीच्या भवितव्यासंबंधीचे हे उद्गार बापूजी स्वानुभवातूनच काढत आहेत याची प्रचीती येते.

**प्रयोगाचे यश**

नाटचलेखनाच्या दृष्टिकोनातून विचार करता पहिला अंक सुरुवातीस समाधानकारक व नंतर सामान्य, दुसरा अंक भिकार, तर तिसरा अंक उत्कृष्ट आहे. परंतु असे असूनही तिसऱ्या अंकाची उंची पुष्कळच वाढल्याने नाटकाचा एकत्रित परिणाम पुष्कळच वरच्या दर्जाचा होतो.

अत्र्यांच्या या नाटकाच्या यशामध्ये दिग्दर्शक व नट म्हणून श्री. बाबासाहेब वैशंपायन यांचा वाटा फार मोठा आहे.

वैशंपायनांचा मुख्यमंत्री आणि बापूराव माने यांचा वाटाणे गुरुजी या भूमिकांना जोड नाही. वाटाणे गुरुजींच्या संवादांतून व अभिनयातून बापूरावांनी किती तरी जागा अचूक टिपल्या आहेत.

फार मोठ्या गुणवत्तेने यशस्वी झालेले आणखी एक पात्र म्हणजे गणेश सोळंखींचा लखोबा लफंगे. उत्कृष्ट बेअरिंग व भूमिकेची अचूक समज, यांमुळे त्यांनी आपल्या कामात वेगळीच रंगत आणली आहे. बाळकराम दिसतात बरे, ( वाढते वय सोडून ) गातात ठीक, परंतु संवाद बोलताना जीभ जड असल्याचे जाणवते.

मेघमाला विभूते यांची नृत्ये तर चांगली आहेतच, परंतु त्यांची अभिनयाची समजही वाढती आहे, प्रेक्षकांचा उदार आश्रय लाभलेल्या ' अत्रे थिएटर्स प्रा. लि. ' चा आधार असल्याने त्यांच्या गुणांचे मोठे चीज होत आहे.

दुय्यम भूमिकांत किसन पट्टेवाला ( रघुनाथ पराडकर ) छाप मारून जातो. नाटकाची निर्मितीमूल्ये समाधानकारक आहेत. मंत्र्यांची मिरवणूक व विरोधकांचा मोर्चा या दोन्ही प्रसंगी टेपचा उत्कृष्ट वापर केला आहे. तिन्ही लावण्या चाल व रचना या दृष्टीने प्रथमश्रेणीच्या असून मेघमालाच्या आकर्षक नृत्यांनी त्यांना जिवंतपणा आला आहे. नाटचप्रयोगाचे यश पाहता नाटकाच्या साहित्यिक यशापेक्षा त्यांचे प्रायोगिक यश सरस वाटते. आणि अत्र्यांच्या नाटकाबाबत असे वाटणे हा कलावंतांचा मोठा विजय होय.

नाटकाच्या सुरुवातीला आचार्य अत्रे नाटकाचे सार सांगतात. जे सांगावयाचे ते नाटचद्वारा पुरेसे पोचू शकत नाही, असे आचार्यांना वाटते काय ? अन्यथा त्याची काय गरज होती ते समजत नाही.

**—शरद गोखले.**



# भिंतीच्या तुकड्या

सुधाकर राजे

## □ डी·लक्स परलोक–प्रवास

माणसाने थाटात जगावे यात वाद नाही. पण माणसाने थाटात मरावे, यातदेखील वाद नसावा. अस्मादिकांनी अमेरिकेच्या वारीत शवपेटिकांचे एक दुकान पाहिले. त्यातल्या अलिशान शवपेटचा पाहून वाटले, " फिरूनी जन्मा आले तरी अमेरिकेत मरावे. " अर्थात एकेका शवपेटीची दहा-दहा हजार रुपये किंमत पाहून माझ्यासारखा माणूस हार्टफेल होऊन मरायचा ही गोष्ट वेगळी. पण त्या शवपेटचांतल्या मखमली गाद्या अन् रेशमी दुलया पाहून या मंडळींची परलोकयात्रा अगदी फर्स्ट क्लासने होत असली पाहिजे, याची खात्री पटली. आता तर हा फर्स्ट क्लासचा प्रवास एअर-कंडिशन्ड आरामातदेखील व्हावा, अशी व्यवस्था झाली आहे. एका फ्रेंच इंजिनिअरने एक एअर-कंडिशन्ड शवपेटी तयार केली असून तिला काचेची खिडकीदेखील लावली आहे. घ्या ! आता एअर-कंडिशन्ड डी-लक्स गाडीने केलेल्या दिल्ली-मुंबईच्या प्रवासात अन् या डी-लक्स शवपेटिकेत आरामशीर लोळत केलेल्या स्वर्गाच्या सहलीत फरक तो काय राहिला ? शिवाय वाटेत ' साइट सीइंग 'साठी खिडकीची सोय! आता स्वर्गाच्या वाटेवर कुठली प्रेक्षणीय स्थळे आहेत याची एकदा आकाशातल्या बापाच्या टूरिस्ट डिपार्टमेंटने जाहिरात केली की बुकिंगची हीऽऽ झुंबड उडणार !

निदान तशी उडावी अशी आपली माझी भोळी समजूत होती. पण काय आश्चर्य, न्यूयॉर्कच्या एका प्रदर्शनात ही शवपेटी मांडली तर एक माणूस ती पाहावयाला तयार होईना–घेणे दूरच! म्हणजे कमाल आहे की नाही ? आधीच साहेब प्रवासाचा शोकीन; त्यातून प्रवासाला निघायचे म्हणजे प्रत्येक सुखसोय आहे की नाही याच्याकडे जातीने लक्ष पुरविणारा. पण जगाच्या प्रवासाची काळजी घेणारा हा माणूस दुसऱ्या जगाच्या प्रवासाची इतकी छान सोय झाली तर तिच्याकडे पाठ फिरवतो. याचा अर्थ एकच–देवाचे टूरिस्ट खाते भारत सरकारच्या टूरिस्ट खात्यापेक्षादेखील भोंगळ असावे. नाहीतर ' व्हिजिट काश्मीर 'च्या धर्तीवर ' व्हिजिट हेवन

इन्‌एअर-कंडिशन्ड कम्फर्ट ' अशी पत्रके जगभर वाटली गेली असती, अन् स्वर्गात काय काय चैन आहे याची खुसखुशीत वर्णनें पृथ्वीवर वाचायला मिळाली असती.

साहेबाच्या दृष्टीने स्वर्गातली पहिली मोठी सोय म्हणजे तेथे दारूबंदी नाही. सगळीकडे सोमरसाचे बार ! त्यातल्या त्यात दर्दी मंडळींसाठी इम्पोर्टेड अमृत ! दुसरे म्हणजे 'नाइट लाईफ' भरपूर–मिस् रंभा, मिस् उर्वशी, मिस् मेनका यांचा रोज ढंगदार 'काबारे' ! तिसरे म्हणजे जवळपास साहेबाच्या कॅमेऱ्याला भरपूर वाव–एकीकडे कुबेराचा बकिंगहॅम पॅलेस तर दुसरीकडे शंकराचा हॉलिडे ऑन् आईस ! अन् कळस म्हजे पृथ्वीपासून स्वर्गापर्यंत आरामशीर पहुडल्या पहुडल्या स्पेस-ट्रॅव्हल! मग एवढे झाले असताना शवपेटी का बरे लोकप्रिय ठरू नये? कदाचित् एकच लहानशी अडचण असावी–रिटर्न तिकिट नाही !

## ☐ वेडाचे (लेखन) प्रकार

एखाद्या माणसाला काय मानसिक रोग झाला आहे, हे त्याच्या हस्ताक्षरावरून ओळखू शकणारे यंत्र रशियात तयार झाले आहे. मला वाटते, माणूस कसे लिहितो याच्यापेक्षा तो काय लिहितो याच्यावरून त्याच्या डोक्यात कुठला बिघाड आहे हे ओळखणे अधिक सोपे असावे. उदाहरणार्थ, आतापर्यंत मोरोपंतांच्या आर्या घडाघड म्हणून दाखविणाऱ्या माझ्या एका मित्राने अचानक निर्यमक कवितेचे विग्रह तयार केले तेव्हाच मी ओळखले की " श्लोकार्धेन प्रवक्ष्यामि यदुक्तं ग्रंथ कोटिभि: " असा भ्रम स्वारीला झाला असावा. दुसरा एकजण नेहमी सौंदर्यशोध व आनंदबोध असल्या विषयांवर गहन (म्हणजे त्याच्यासकट कुणाला न समजणारे) लेखन करायचा. त्याने एकदम् प्रेमकथा लिहिली. याचा अर्थ उघड आहे, तो म्हणजे स्वारीला अखेर फेसपावडर, लिपस्टिक इत्यादींनी सजलेल्या सौंदर्याचा शोध लागल्यामुळे अननुभूत आनंदाने हर्षवायू झाला होता. काही काही लेखन-प्रकारांवरून तर मेंदूचा कुठला भाग बिघडला आहे, यांचे कोष्टकच मांडता येईल. उदाहरणार्थ, खरमरीत पुस्तक-परीक्षण म्हणजे " आपल्याला साले असे पुस्तक का लिहिता येऊ नये ? " असा अनावर न्यूनगंड. चतकोर कविता म्हणजे वाङमयीन उपासमार. न-नाट्य म्हणजे " नाटक, नाटक काय, च्यायला मी पण लिहून दाखवितो, " अशा आत्मविश्वासाचा घसरलेला पाय. श्रुतिका म्हणजे जे वाचायला रद्दी वाटते ते ऐकायला चांगले वाटेल अशी वेडसर समजूत. अग्रलेख म्हणजे स्वत:ला " आम्ही " म्हटले की जगातले सगळे शहाणपण खिशात पडते, अशी बालिश खात्री. आणि विनोदी स्तंभ म्हणजे ?–आपणच काय ते ' माणूस 'कीचे आधारस्तंभ आहोत, अशी विनोदी कविता !

• • •

# राशी भविष्य : श्री. बी. डी. घाणेकर : भृगुसंहितातज्ज्ञ

## दिनांक १५ ऑक्टोबर ते २२ ऑक्टोबर १९६६

**मेष** – या सप्ताहात आपला राशिस्वामी शुभस्थितीत आहे. त्यामुळे मानसिक सौख्य व आर्थिक स्थिती पण बरी राहील. परंतु दिनांक १७ पासून २१ तारखे-पर्यंत रवी आणि शुक्र हे दोन्ही ग्रह प्रतिकूल असल्यामुळे स्वतःच्या व पत्नीच्या प्रकृतीस त्रास. नोकरीमध्ये वरिष्ठांपासून त्रास व मानहानी आणि वादविवाद होण्याचा योग. कुटुंबात कोणी ना कोणी आजारी पडून द्रव्यखर्च होण्याचा संभव. प्रवास शक्यतो करू नये. दि. १७, १८ वाहनांपासून व चतुष्पाद जनावरांपासून त्रास. मनाविरुद्ध घटना घडून मानसिक त्रास होईल. व्यापारात, भागीदारीत तंटे होतील. नवीन असे कोणतेही व्यवहार करू नयेत.

**वृषभ** – आपला राश्याधिपती नीच स्थितीत आहे व त्याच्या जोडीला मंगळही प्रतिकूल आहे. त्यात रवीपण प्रतिकूल आहे. त्यामुळे प्रत्येक व्यवहारात अडी-अडचणी निर्माण होतील. ज्यांना कोणी तुम्ही आपले म्हणता ते ऐन वेळी धोका देतील. आर्थिक, कौटुंबिक व आरोग्यविषयक सौख्यात दक्षता घ्यावयास पाहिजे. आपण योजलेल्या कार्यांत या सप्ताहात यश प्राप्त होणार नाही म्हणूनच ती लांबणी-वर टाकावीत. आपण कितीही एकनिष्ठ, प्रामाणिक, सत्यप्रिय असलात तरी लोक त्यावर विश्वास न ठेवता दूषण देतील. अचानक प्रवासाचा योग येईल. दिनांक १९,२० न्ही तारखा आपणांस प्रतिकूल आहेत. या दिवशी कोणतीही नवीन कार्ये, गाठीभेटी घेऊ नयेत. कलाकारांना आठवडा चांगला नाही. कारण ठरलेल्या कामात अडथळा.

**मिथुन** – पराक्रमात मंगळ व पंचमात राश्याधिपती व धनस्थानात गुरुमहाराज, अशी आपणांस ग्रहांची अनुकूलता आहे. आपल्याला या सप्ताहात त्यामुळे प्रयत्नांस चांगलाच वाव आहे. धडाडीने कोणतेही कार्य घेतल्यास त्यात यशप्राप्ती होईल. नोकरीत बढती. मित्रांचे चांगले सहकार्य मिळेल. बरेच दिवस आपल्या कार्यामध्ये विघ्ने येत आहेत ती नष्ट होऊन आपल्या कार्यास मूर्त स्वरूप येईल. प्रपंचात नवनवीन वस्तूंची भर पडेल. संसारसौख्य चांगले मिळेल. लेखक, चित्रव्यवसायिक, नाटककार यांना हा सप्ताह फारच शुभ आहे. ग्रहांची अनुकूलता जोडीला असूनही त्याच्या जोडीला आपण जगन्मातेची उपासना केल्यास आपले मनोरथ पूर्ण होतील.

**कर्क** – आपल्या चंद्राजवळ गुरू आणि पराक्रमात रवि–शुक्र, अशी ग्रहांची अनु-कूलता दि. १७ पर्यंत आपणांस आहे. बरेच दिवस पडलेली कामे आता मूर्त स्वरू-पात येतील. नोकरीमध्ये वरची जागा मिळेल. दिनांक १७ नंतर मात्र कुटुंबात आरोग्याबाबत द्रव्यखर्च होईल. दिनांक १७ व २१ आपणांस अनुकूल आहेत. या तारखांस मनाजोगत्या घटना घडून येतील. घरातील थोर व्यक्तींस तब्येतीस त्रास.

प्रवास शक्यतो करू नये. आर्थिकदृष्टया तारांबळ उडेल. विद्यार्थ्यांची मात्र विद्याभ्यासात प्रगती होऊन चांगले यश मिळेल. व्यापाऱ्यांनी नवीन देवीघेवीचे व्यवहार करू नयेत. कुटुंबात शुभकार्य होऊन द्रव्यखर्च होईल.

सिंह – आपणांस बारावा गुरू आहे व लग्नी मंगळ आहे. त्यामुळे कोणत्याही व्यवहारात अडचणी निर्माण होऊन मानसिक ताण वाढेल. आपण प्रयत्नांची कितीही पराकाष्ठा केलीत तरी त्यात यश मिळणे कठीणच. विद्यार्थ्यांनी विद्याभ्यासात या वर्षी फारच दक्षता घ्यावयास पाहिजे. दिनांक १७ पासून आरोग्यास जपावे. कोणतेही नवीन व्यवहार करू नयेत. ज्या भगिनींचा प्रसूतिसमय या काळात असेल त्यांनी विशेष काळजी घ्यावी. अकारण द्रव्यखर्च होईल. मनस्ताप वाढणाऱ्या पुष्कळशा घटना घडतील; परंतु मन शांत ठेवा. कोणत्याही लोभ-प्रलोभनांवर विश्वास न ठेवता सतत प्रामाणिकपणे कार्य करीत राहा. मनावर संयम ठेवा.

कन्या – मंगळासारखा प्रखर ग्रह व्ययस्थानातून परिभ्रमण करीत आहे. त्यामुळे उष्णता व कातडीच्या विकारांपासून त्रास. तुमचे खास म्हणणारे मित्र ऐन वेळी दगा देतील. दि. १७ पासून आपली आर्थिक स्थिती बिघडेल. खर्चावर नियंत्रण ठेवा. वेळप्रसंगी कर्ज काढावे लागेल. आपला मूळ स्वभाव शांत व हळुवार असा असून मनाविरुद्ध घटना घडल्यास आपल्या रागाचा पारा चढेल. गुरुमहाराजांची मात्र कृपा असल्यामुळे आपण सर्व संकटांतून यथास्थित तरून जाल. काही दिवसच आपणांस प्रतिकूल अवस्थेत काढावे लागतील. आगामी ग्रहमान आपणांस अनुकूल येणार आहे. त्यामुळे निराश होऊ नका. दिनांक १७ व २१ ह्या तारखा शुभ आहेत.

तूळ – या सप्ताहात गुरु-मंगळ अनुकूल असून रवि-मंगळही अनुकूल येत आहेत. त्यामुळे आपणांस सर्व कार्यांत यश प्राप्त होईल. प्रवासाचा योग आहे. पत्नी मनाजोगी वागून आपल्या अर्ध्या वचनात राहील. फक्त आपला राश्याधिपती प्रतिकूल असल्यामुळे तब्येतीबद्दल थोडासा त्रास होईल. तरी विशेष लक्ष द्या. दिनांक १९ फार शुभ आहे. अकस्मात शुभ घटना घडून येतील. व्यापाऱ्यांना भागीदारांपासून चांगले सहकार्य मिळेल. विद्यार्थ्यांना विद्येत यशप्राप्ती. नोकरी करणाऱ्यांना बढतीचा योग व अचानक अर्थप्राप्ती. कोर्ट-दरबारी किंवा स्थावराची कामे लांबणीवर टाकावीत. दूरचा प्रवासही घडेल. तीर्थयात्रेचा संभव आहे.

वृश्चिक – दशमात मंगळासारखा तेजस्वी ग्रह व भाग्यात गुरू अशी आपणांस ग्रहांची अनुकूलता आहे. आपणांस करायची विशेष कामे १७ तारखेच्या आतच उरकून घ्या. कारण ग्रहमान पुढे इतके जोरदार नाही. प्रकृतीसही त्रासाचा योग आहे. आर्थिकदृष्ट्या मात्र आपणांस हा सप्ताह निश्चितच चांगला आहे. मनाजोग्या घटना घडून येतील. दि. १७, २१ ह्या तारखा आपणांस जास्ती शुभ. विद्यार्थ्यांना विद्याभ्यासात यशप्राप्ती मिळेल. तसेच या राशींना या वर्षांत पुत्रप्राप्तीचा योग आहे. नोकरी व्यवसायात बढती. दिनांक १६ मात्र प्रतिकूल आहेत. या सप्ताहात आपण पत्नीच्या नावे काही व्यवहार केल्यास शुभलाभ.

**धनू** – या सप्ताहात आपणांला मंगळ अनुकूल आहे. त्याचप्रमाणे रवी, बुध, शुक्राचीही सहायता आहे. त्यामुळे आपल्या परिस्थितीत हळूहळू सुधारणा होईल. गुरुमहाराज प्रतिकूल असल्यामुळे अडीअडचणी मात्र येतील. दूरचा प्रवास व तीर्थयात्रा घडेल. आरोग्यविषयक मात्र अधून मधून त्रास राहील. दिनांक १७।१८ प्रतिकूल दिवस असल्यामुळे मनाविरुद्ध घटना घडतील. एकंदरीत ग्रहाच्या स्थितीचा विचार करता आपणांस १६ आणे ग्रहमान अनुकूल नाही. परंतु गेले २ महिने आपण जो त्रास सोसलात त्या मानाने हा सप्ताह बराच चांगला आहे, असे म्हणता येईल. १७ नंतर संततीच्या प्रकृतीबद्दल मात्र दक्षता घ्यावयास पाहिजे. तसेच सदर तारखेपासून आर्थिक व्यवहार जपून करावेत.

**मकर** – आपल्या राश्याधिपती वक्री आहे व अष्टमस्थानातून मंगळाचे परिभ्रमण चालू आहे. त्यामुळे वैयक्तिक व कौटुम्बिक अडचणी निर्माण होतील. आरोग्यविषयक त्रासपण उद्‌भवण्याचा संभव आहे. म्हणून काळ जपूनच काढावा. चतुःष्पाद जनावरे, अग्नी व वाहने यांचेपासून सावध राहावे. धोक्याचा संभव. दिनांक १९–२० ह्या दोन्ही तारखा प्रतिकूल आहेत. मानसिक स्वास्थ्य बिघडणाऱ्या घटना घडतील. परंतु चित्तवृत्ती शांत ठेवावी. विद्यार्थ्यांना विद्याभ्यासात अडीअडचणी निर्माण होतील. व्यापाऱ्यांस हा सप्ताह जरा जपूनच काढला पाहिजे. नवीन उलाढालीचे व्यवहार करू नयेत. कारण प्राप्तीत कमतरता. दिनांक १७ आणि २१ ह्या तारखा सामान्यतः अनुकूल.

**कुंभ** – रवि-मंगळासारखे तेजस्वी ग्रह आपणांस प्रतिकूल आहेत. त्यामुळे नोकरीत अडचणी, मानहानीचा प्रसंग. कुटुंबात कोणी ना कोणी आजारी. औषधपाण्याचा खर्च होईल. आपणांस काल प्रतिकूल असल्यामुळे बोलण्यात संयम ठेवावा. अन्यथा वैमनस्य निष्कारण वाढेल. दिनांक १७ पासून मात्र थोडीथोडी सुधारणा होईल. स्थावर आणि कोर्टकामात अडचणी. सध्या कोणत्याही नवीन कामाच्या भानगडीत पडू नका. ग्रहमान प्रतिकूल असल्यामुळ कोणतीही गोष्ट करायची लांबणीवर टाकणेच सोयीस्कर. कनिष्ठ लोकांपासून त्रासाचा संभव. अकारण भीतियुक्त व द्रव्यखर्चाचा पण योग आहे. दिनांक २०।२१ प्रतिकूल.

**मीन** – आपणांस गुरुमहाराजांची पूर्ण सहायता आहे. त्यामुळे आपली कार्ये सुरळीत चालतील. कोणतीही महत्त्वाची कामे दि. १७ च्या आतच करून घ्या. नंतर आर्थिक व आरोग्याच्या दृष्टीने त्रासाचा योग आहे. दिनांक १७ व २१ ह्या तारखांस कोणतेही महत्त्वाचे पत्रव्यवहार करणे, गाठीभेटी घेणे, तसेच आर्थिक व्यवहार करण्यास शुभ आहेत. विद्यार्थ्यांना विद्याभ्यासात चांगल्या तऱ्हेने यशप्राप्ती होईल. या सप्ताहात [ पहिल्या पूर्वार्धात ] कोर्टकामांत यश. कुटुंबामध्ये शुभकार्याबद्दल वाटाघाटी होतील. अविवाहितांचे विवाहाचे दृष्टीने अनुकूल वातावरण आहे. शनि-मंगळांच्या प्रतियोगामुळे अप्तस्वकीयांशी तंटे उद्‌भवतील. ●

## आपण आपला अंक कोठून घेणार ?

स्थानिक विक्रेत्यांकडून घेतला तरी हरकत नाही.
पण वर्गणीदार होण्याचे ठरवत असाल तर
या आकर्षक सवलतीचा आपण विचार करू शकता.

'माणूस' साप्ताहिकाची दिवाळी अंकासहित
वार्षिक वर्गणी आहे रुपये वीस.

# १००

पाच वर्षांची वर्गणी होते रुपये शंभर. आपण पाच वर्षांची शंभर रुपये वर्गणी 'माणूस'कडे एकदम भरली तर सहा वर्षे– **एक वर्ष अधिक**


माणूस साप्ताहिकाचे अंक आपल्याला घरपोच मिळतील.
म्हणजेच वर्गणीत वीस टक्के सवलत मिळून आपली
वीस रुपये बचत होईल.
आपण मनात आणले तर ही

## माणूस पंचवार्षिक ग्राहक योजना

यशस्वी करणे आपल्याला मुळीच अवघड नाही.
स्वावलंबनाचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून,
अधिक अन्नासाठी, अधिक पाण्यासाठी—
'माणूस'ने सव्वा लाखाचे हे प्रस्थान ठेवले आहे.
आपणही या प्रस्थानयात्रेत सहभागी होऊ शकता.
हा प्रजासूय यज्ञ सिद्धीस नेऊ शकता.



*रामायणातल्या*
*त्या छोटया खारीइतका*
*पुण्य संचय करू शकता.*




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर.